म. ग्रं. सं.
विषय
सं. नं.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
पुस्तकाचें नांव
सन

69.
79
ग्रं. क्र.

आशीर्वाद मंत्राविषयी चर्चा
सुदर्शन.
(धर्म)

लेखक: महादेव गंगाधर मुळे

सन् १८८९

[illegible]

ता. ........

आ. नं.

लेखकः

[illegible] गंगाधर [illegible]

सन १८८२



ाची
मंत
ासे
ञ
हि
वी
ची
व
वै
ार
ां
ग-
रर
ति.
चारी
ान यांत

॥ श्री ॥

# आशीर्वादमंत्राविषयीं चक्षुषी सुदर्शन.

( उपोद्घातासह सूचना. )

प्रस्तुत प्रथम वर्णांत परदेशस्थ विद्येचा प्रसार जाहल्यानें वेदविद्येचा तर ऱ्हास जाहलाच आहे. जे कांहीं वेदपारग अवशेष आहेत त्यांतही स्वस्वमताभिमानानें जो तो आपला मंत्र प्रथम व्हावा असें उपस्थित करून तंटे होऊं लागले. याकारणानें मंत्रजागर नाहींसे होऊन मंत्रश्रवणाचीसुद्धां वानवा जाहली आहे.

या दृष्टि वैदिकांस शास्त्रावांचून अन्य शास्ता नसून तशी शास्त्रार्थाचा ग्रंथ उपलब्ध नाहीं व कोणी शास्त्रज्ञ विद्वान श्रम करून मूळ शास्त्रार्थही प्रसिद्ध करीत नाहींत ही मोठी शोचनीय गोष्ट आहे; असें मनांत आणून या ( चक्षुषी सुदर्शन ) प्रबंधाची रचना केली आहे.

हा प्रबंध शुक्ल यजु माध्यंदिन शाखेत उत्पन्न जाहला ह्मणून शाखाभिमानानें त्याची स्वकपोल रचना केली नाहीं.

यांत जी रचना जाहली ती फक्त ज्यानें या देहासहीत आंतील चैतन्याची स्फूर्ति व तज्जनित परिणामाचें ज्ञान प्रगट केलें, त्या सच्चिदानंद परमात्म्यास अनन्य भावें शरण जाऊन व त्यास स्मरून त्याचेच कृपेनें त्यानें जें ज्ञान दिलें त्या मागें विचार केला आहे. त्यांत कोणत्याही प्रकारें कोणाचा पक्ष न धरितां जें यथार्थ दिसून आलें तेंच ग्रहण करून व त्याविषयीं श्रुतिस्मृत्यादि वाक्यें घेऊन रचना केली आहे.

तत्रापि त्याविषयीं आणखी असें कळवितों कीं, या प्रबंधांत यदा कदाचित कोणताही भाग अयोग्य किंवा मिथ्या दिसेल तर तो किंवा या निबंधाच्या दृढीकरणार्थ जर कोणास कांहीं ग्रंथाधार सुचविणें असतील तर ते त्यांनीं निःपक्षपातानें लिहून कळवावें. ह्मणजे त्याच्या युक्तायुक्ततेचा विचार करून योग्य दिसल्यास व ते खरेच सूज्ञ व विचारी पुरुषांचे असल्यास मी आभारपूर्वक मान्य करून या निबंधांत ग्रहण करीन यांत अन्यथा नाहीं.

शिवाय या निबंधांतील विषय निःपक्षपातानें व स्पष्टोक्तीनें प्रतिपादन केला असल्यामुळें एखाद्यास प्रमाद होईल, तर मुद्दाम कोणाची मानहानी किंवा निंदा करावी या हेतूनें यांत एक अक्षर लिहिलें नाहीं. तत्रापि प्रमाद मानणारास नमस्कार करून व क्षमा मागून कळवितों कीं, त्यांनीं लिहिलेल्या श्रुतिस्मृत्यांचें खंडण करावें, परंतु "**शेषंकोपेणपूरयेत्**" या न्यायानें मजवर कोप करूं नये. माझ्या अज्ञानानें किंवा चित्त व दृष्टि विभ्रमानें प्रमाणांतील भिन्नार्थ अथवा हस्तदोषांचीं अशुद्धें तीं मात्र दुरस्त करण्याचें त्यांचें सूचनापत्र यावें.

याशिवाय आणखी असेंही कळवितों कीं, निरालस्यांतःकरणानें या चक्षुषी सुदर्शनाविरुद्ध श्रुतिस्मृति प्रमाणभूत अबालवृद्ध, गृहस्थ, भिक्षुकांस समजण्यासारखा लेख प्रसिद्ध करावा ह्मणजे ब्राह्मणावर उपकार होऊन मी त्यांचे आभार मानीन.

हा निबंध गीर्वाण भाषेंत लिहावयाचा होता, परंतु विप्रपन्नावांचून अन्यांची गैरसोय होणार आणि आमचा तर हेतू हा विषय अबालवृद्ध, गृहस्थ, भिक्षुकास अवगत असावा यास्तव याची रचना अगदीं प्राकृत भाषेंत केली आहे.

आतां मंत्रारंभ कोणापासून व्हावा हा मूळ विचार आहे; तर याविषयींचे शास्त्रार्थ सालमजकूरच्या महाराष्ट्रमित्र वर्तमानपत्राचे अंक ४२।४३।४४ यांतील चक्षुषी देवतेच्या प्रतिपादनांत श्रुतिस्मृत्यादि प्रमाणानें छापून जगप्रसिद्ध केले असल्यामुळें पुनः पुनः तोच विषय आणि तींच वाक्यें प्रदिपादन केल्यानें प्रमाणदारिद्र्याचा दोष येतो; जाणून त्याच्या दृढिकरणार्थ आणि अन्य श्रुतिस्मृत्यादि वाक्यानें विषय यांत प्रतिपादन करून विद्वज्जनांस सादर केला आहे. वर्तमानपत्राचे अंक वर लिहिलेले शोधीत बसावे लागतील. सबब त्याचा उतारा दुरस्त करून पृथक् या सोबत ठेविला आहे. याशिवाय वेदमूर्ति राजमान्य राजश्री **वामन नारायण दहुल्कर** व **नीलकंठ बापूजी मुळे** कसबे **धांदरफळ** यांनीं परम श्रमानें ग्रंथ शोधन करून गीर्वाण प्रबंध केला तोही विप्रपन्नांकरितां पुढें घेतला आहे.

**महादेव गंगाधर मुळे,**
कसबें धांदरफळ रहाणार सातारा.

ग्रंथ संग्रहालय नं. २८ ता. आ. क्र.

॥ श्री ॥

# आशीर्वादमंत्राविषयीं चक्षुर्पी सुदर्शन.

श्री योगेश्वरोजयति.

## मंत्राशिर्वाद केव्हां कोणाचा घ्यावा.

॥ मंगलाचरणं. ॥

नत्वाविघ्नेश देवं कृत नत विभवं वेदवेदांत वेद्यं
प्रत्यूहारंण्यदावं वृजिन भवभय ध्वंस शुंड स्व शुंडं ॥
नित्यंत्वां प्रार्थयेहं सदय सुमुखतां भारती संपदं मे
देयाशीषः प्रकारः श्रुतिगुरस तया येयथा नंददायी ॥१॥

**तात्पर्य**—हे सदय सुमुख वेद वेदांत वेद्य विघ्नविनाशका या अभिधानानें नित्य आपकी प्रार्थना करून नमस्कार करितों. याचा हेतु आपण निश्चयानें तसें कार्य करते आहांत तर प्रथम माझा त्रितापाग्निसह षड्रिपु आदिकरून वैरीवर्ग शांत करा. नंतर या दुस्तर भवसमुद्रांत मी बुडत आहें तो आपल्या शुंडेनें काढा आणि वेदशास्त्रांत गती होण्यास सरस्वतीची संपत्ति योजा. याशिवाय मंत्राशीर्वादाच्या निश्चयाविषयीं उत्तम श्रुतिवाक्यं दृश्य करून अखिल जगासह दासास आनंद द्या, हें मागणें आहे.

**॥ कर्मांते मंतु आशिषः इतिस्मृतिः ॥**
**॥ कर्मणां परंपरया मोक्षसाधन मिति शतपथव्याख्यः ॥**

कोणत्याही कर्मांतीं आशीर्वादाचा काल व कर्मानें मोक्ष प्राप्त होतो, असा अभिप्राय आहे. मात्र कर्म शब्द सामान्य असून कर्म शब्देंकरून जीवाच्यामागें अनंत

उपाधी व कर्मावांचून प्राणिमात्र मोकळा नाहीं. याजवरून ईश्वराच्या अगाधत्वाचें आश्चर्य मानावें लागतें.

॥ भगवत्‌गीता अ० १५ श्लोक ७. ॥
॥ ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥

**तात्पर्य**:—संपूर्ण जीव ईश्वरांश सृष्ट्यारंभीं जाहले असें स्वमुखें भगवाने अर्जुनास सांगतात. आणि जगांतील जंतुमात्राकडे लक्ष दिलें असतां शास्त्रनियमानें चौऱ्याशीं लक्ष योनींत व नानाप्रकारच्या चित्रविचित्र देहांत व नानाप्रकारच्या कर्मांत रोध पावलेले प्राणी गोचर होतात. त्यांपैकीं थोडे उदाहरणानें पहा. मुंगी, मूषकाचें संग्रही कर्म, टोळाचें उदास, कोणाचें दिवा कर्म, रात्रौ विश्रांत व कोणाचें रात्रौ कर्म, दिवा विश्रांत आहे. तसेंच कोणी जल अहारी, कोणी मल, काष्ट, पाषाण, तृण, धान्य, मांस, मृत्तिका, अग्नि, वायु भक्षून व शीतोष्णादि सहन करून नानाप्रकारचें कर्म भोक्तृत्व भोग भोगीत आहेत तें आपण पहात आहों. याजवरून असें कां ह्मणूं नये, कीं जलचर जे जलांत जन्म घालवितात ते ईश्वराचे जलविहार कर्म व अखिल योनींतील अखिल कर्म भोक्तृत्वाचा अनुभव जीवरूपानें परमेश्वरच ग्रहण करीत आहे. असें समजून समाधान मानावें तर पुन्हां त्याच अध्यायांतील द्वितीय श्लोकांत कथन करितात कीं, **कर्मानुबंधीनि मनुष्यलोके** या ठिकाणीं कर्मसंबंध जीवाकडे लावून उत्तम कर्माच्या योगानें मनुष्य योनींत अथवा नरदेहांत प्राप्त होतो असें सांगितलें.

तत्रापि नरदेहांतही मोकळें सोडलें नाहीं. त्याच्या मागें विशेष नानाप्रकारचें कर्म नियम लावून ठेविले आहेत.

## मोरोपंत आर्या.

नरदेहीं यम नियम व्रत दान तप स्वधर्म हे कांहीं ॥
याचें मुख्य-फल मनोनिग्रहचि ज्ञान वेगळें नाहीं ॥ १ ॥

नरदेहीं यम, नियम, व्रत, दान, तप, स्वधर्म आदिकरून धर्मावर मनाच्या निग्रहानें फल प्राप्ति होते. यांत व्रत म्हणून जें पद आहे, तें केवळ एकादशी आदिकरून व्रतार्थी नाहीं. ( व्रत ) वैदिक निघंट अध्याय २ खंड १ वाक्य ७.

व्रतं कर्मनामानि तसेंच प्रयोग कारिकायां
अश्वलायनः व्रत, नियम, जप, तप स्वाध्याय,

कृतु, शम, दम, दान, विशिष्टानां सर्वेषां ब्राह्मणानां मनः समाधीयतां ॥ व्रते तवानागसो इति श्रुतेः ॥

व्रतं कर्म नामानीति नैरुक्त व्याख्यः ॥

अस्तु. याप्रमाणें नरदेहांत, त्यांतून ब्राह्मणांस आखिल कर्मनियम सांगून शिवाय त्याजवर आस्तिक्यानें निष्ठा ठेवावी तरच त्याचें फळ प्राप्त होणार आहे. याजवरून आस्तिक्य नाहीं तर नास्तिक्य निष्ठा नाहींतर अनिष्ठा तसेंच सत्यानृत सुकर्मदुष्कर्म पापपुण्य असें द्वंद्व करून ठेविलें.

॥ वाजसनेय संहिता अ० १ मंत्र ५ अग्नेव्र० ॥

भाष्य ॥ अग्निमनुष्ठीयमानकर्मरूपेण प्रत्यक्षमिति मत्वा न इदमिति विशिनष्टि । अनृतं मनुष्यजन्मशीघ्रविनाशित्वात् । यथास्वप्नगजादयो बोधमात्रेण शीघ्रं निवर्तमाना अनृता उच्यंते । सत्यं देवजन्म बहुकाळं स्थायित्वात् यथा जागरण गजादयः । श्रुतिरपि । इदमहमनृतात्सत्यमुपैमीति तन्मनुष्येभ्यो देवानुपावर्तत इति । यद्वा लोकप्रसिद्धे एव सत्यानृते ग्राह्ये । नानृतं वदेदिति कर्मण्यनृतनिषेधात् । अनृतवदनादुर्गत्याहमिदं सत्यवदनमुपैमि । अत इदं सत्यवदनं कर्मांगत्वात्कर्मकाळे पाळनीयमित्यर्थः ॥ ५ ॥

या मंत्रांतील तात्पर्य—नरदेह स्वप्नवत, अल्पायुषी तो अनृत आणि देवजन्म चिरकाल राहणारा तो सत्य, या दृष्टांतानें सत्यानृत हे उभय धर्म सिद्ध करून कर्मकालीं अनृत भाषण करूं नये असा उपदेश केला आहे.

या श्रुतींतील सत्यानृतादि नियम अग्निहोत्री ब्राह्मणाचे आहेत. याचा दोष आपणाकडे नाहीं असें कोणी समजूं नये.

कोणत्याही कर्मांत सत्यानृतादि नियम सर्वांनीं पालन करावे. मंत्रार्थांत ( अग्निच व्रतपती ह्मणजे कर्माधिप आहे अग्निहोत्री कर्माधिपती किंवा अग्रयाधिपती नाहीं ) त्या मानानें आपण अग्निहोत्री अहों **जाठरोभगवानग्निः** अथवा **अहं वैश्वानरो भोक्ता प्राणिनां देहमाश्रितः** या प्रमाणाच्या प्रत्यंतरास प्राणिमात्राच्या शरीरांत अग्नीचा अनुभव पहा. प्रत्येक दिवसांच्या अन्नहवीचा परिपाक होतो, मुख नाशिकांतून उष्ण श्वास येतात तेच परिपाककर्म नाहींसें जाहले किंवा मुखनासिकांतील श्वासवायु शांत आला कीं, आयुष्याची परमावधी जाहली असें लोक अनुमान करितात. तस्मात् प्राणिमात्रांच्या शरीरांत अग्नि आहे तोंपर्यंत आयुष्य आहे.

( अग्नेराधिपत्य ऽआयुर्मेदा इतिश्रुते )

तात्पर्यः—शरीरांत अग्नीचें कर्म आहे ह्मणून कर्माधिप अग्नि व आपण अग्निहोत्री आहोंत. आपणास एकाग्नि आणि अग्निहोत्र्यास पंचाग्नि आहेत असें मनांत आणूं नका.

ऐ० अ० २ अ० खं.

भाष्य ॥ प्राणः प्रणयनात् मुखनासिकावृत्ति हृदयस्थानो १ पानयनात् मूत्रपुरीषादेरपसर्पणैश्च नाभिस्थानीयवृत्तिः २ व्यानो व्यायमन कर्मा प्राणापानयोः संधिः व्यायनतः शरीरस्य ३ उदानो सर्व शरीरस्थान ऊर्ध्वारोहणादि कर्मा ४ समानः समनयनादशीतपीतादीना मुदरस्थानो-न्नपक्ता ५ एवं पंचविधः सर्व क्रिया हेतुः सएषयज्ञः पंचविधः अग्नि-होत्रंदर्श पूर्णमास चातुर्मास्यानि पशुसोमः ॥

या ऐतरेय श्रुतीनें शरीरांतील पंचवायु वृत्ति स्थानें होणाऱ्या पंचकर्मास पंचयज्ञ कथन केले व त्या यज्ञांच्या हेतूनें या पंच वृत्तिच्या क्रिया चालू आहेत असा सिद्धांत करून प्रथम वृत्तिक्रमानें प्राणाग्निहोत्र १ दर्शपूर्णमास २ चातुर्मास्य ३ पशु ४ सोम ५ हे पंचयज्ञ नित्यशः शरीरांत होत असल्याविषयीं स्पष्ट सांगितले आहे.

या श्रुति प्रमाणानें आपण पंचाग्निमान अग्निहोत्री आहोंत आणि पशुसोमापर्यंतचे यज्ञफल नित्य प्राप्त होत आहे. याशिवाय स्मृतिकारांनींही आणखी पंचाग्नि सांगितले आहेत.

पंचाग्निपूतस्तादृशः इति । **यमः ॥ पंचाग्नयो मनुष्याणां परिचर्या प्रयत्नतः ॥- १ माता २ पिता ३ चाग्नि ४ रात्मा ५ गुरुस्तर्षभपंचम ॥१॥ महाभारतोक्तः ॥** पंचाग्निः पंचाग्निव्रतचारीति कश्चित् ॥ उपनिषत् ईशावास्यादी उपनिषद् पठ्यपान-पंचाग्निविद्यावेत्यन्वयः ॥ पंचाग्निरेकाग्नेरुपलक्षणं ॥ **मनुः ॥** * त्रिणाचिकेतरेकाग्नि—रिति ॥ स्नातकः । व्याख्याचरः ॥ इह पुनस्तद्ग्रहणं चांद्रायणादि व्रतचारी प्राप्त्यर्थः ॥

---

* त्रिणाचिकेतकोर्थः । तत्राहुः ॥ तउशन्हवैवाजः श्रवसः सर्ववेद संददावि-त्यादावनुवाके कचश्रुतौ पठ्यमाने त्रिणाचिकेतनाम्नो मुनिपुत्रस्य प्रश्नत्रयविषयोत्रो-च्यत इति ॥ व्युत्पत्या त्रिणाचिकेतस्तत् पाठतदर्थाभ्यां ब्राह्मणो विचानाचिकेत इति ॥ त्रिश्चितोनाचिकेतोग्निर्येन स इत्यन्वयः ॥ तन्नोचितं । तृणाचिकेतशब्दस्य यौगिकस्य परिभाषिकस्य वात्र विवक्षितत्वात् ॥ तथा हि श्रिङ ज्ञाने धातुः । व्रतातिशयेन तपो-विशेषण च तृणवत्सर्वमाचिके जानातीति तृणाचिकेतः ॥

तथा च यमः चांद्रायणव्रतचरः सत्यवादी पुराणवित् ॥ निष्णातः सर्वविद्यासु शांत विगतकल्मषः ॥ गुरूवेदाग्निपूजासु प्रसुक्तो ज्ञानतत्परः विमुक्तः सर्वदा धीरो ब्रह्मपूतो द्विजोत्तमः ॥ अनमित्रो न चामित्रो मैत्रआत्माविदेवच ॥ स्नातको जाप्यनिरतः सदा पुष्पवलीप्रियः ॥ ऋजुर्मृदुः क्षमी दांतः शांतः सत्यव्रतः शुचिः ॥ वेदज्ञः सर्वशास्त्रज्ञ उपवासपरायणः ॥ गृहस्थो ब्रह्मचारी च चतुर्वेदविदेवच ॥ वेदविद्याव्रतस्नातापंचाग्निः पूतयो द्विजः ॥

या विवेचनाधारें आपण पंचाग्निमान असल्यामुळे अग्निहोत्राप्रमाणें ( उद्यत्वादि ) व सत्यानृतादि अखिल नियम अखिल कर्मात सांभाळणें आहेत आणि त्याचें फलही त्याप्रमाणें प्राप्त होत आहे.

( बृ. अ. ५ ब्रां. ३ कं. १ ) श्रुतिः चि व्याख्या )

यथावघातेन व्रीहीणां तुषनिवृत्तौ गम्यमानायामग्निहोत्रादि नित्यकर्मकार्या दृष्टा न करोति तुषनिवृत्तिः तद्वदज्ञाननिवृत्तिरपि नित्यकर्मकार्या दृष्टा न कल्पते इति ॥ मोक्षस्य कर्मसाध्यस्यापि नित्यत्वमिति चेन्नेत्याह ॥ नित्यानां कर्मणां सर्वमेधाश्वमेधादिनां च ब्रम्हत्वादीनि फलानि येषां पुनर्नित्यानि निरभिसंधीन्यात्मसंस्कारार्थानि क्रीयंते तेषां ज्ञानोत्पत्यर्थानि तानि ॥ ॥ शंकराचार्य ॥ नित्यानि कर्माणि श्रौतानि स्मार्तानि

---

* ब्रह्मपुराणे ॥ अचिवेतियोर्विश्वं तृणवत्सर्वनिस्पृहः तृणाचिकेतसगृही रागद्वेषविमत्सर इति । पठंतिच । फलमूलदधिक्षारगोमयांबुघृताशनः ॥ तृणाचिकेत उक्तोसौ यान्त्यजति नित्यश इति ॥ यमः ॥ अध्वर्युवेदभागज्ञ सद्व्रते नियतो द्विजः ॥ तृणाचिकेत स ज्ञेय स्तद्योगात्युषितोपिय इति ॥ अध्वर्युवेदभागिनः ॥ याज्ञवल्क्यान्वयी ॥

॥ प्राणमध्वर्युरित्यथर्वश्रुतिः ॥
॥ प्राणोवायुरित्यथर्वश्रुतिः ॥
॥ श्वेताः वायव्याः इति यजुश्रुतिः ॥
॥ शुक्लो हि वायुरिति सामश्रुतिः ।
॥ प्राणाश्वेतवर्णा इति तैतिरीय श्रुतिः ॥

अस्यार्थः ॥ एतैः श्रुत्यभिप्रायैः शुक्लप्राणवायुमध्वर्युः ॥ अनेन प्रमाणेन शुक्लयजुर्वेदभागज्ञः पंचाग्निमानतृणाचिकेतरिति चेत्सत्यं ॥

या धर्मशास्त्रसंमतानें व श्रुतिस्मृति प्रमाणानें याज्ञवल्क्यवंशोद्भव सदैव अग्निमान व तृणाचिकेत म्हणजे तृणवत् विश्वमानणारे योगी ठरतात हे विशेष गोचर जाहले ते प्रकाशित केले आहे.

चाग्निहोत्रसंध्योपासनप्रभृतीनि निरभिसंधीनि फलाभिलापविकलानि परमेश्वरार्पणबु-ध्याक्रियमाणानि ॥ आत्मशब्दोमनो विषयः ॥ तथाचस्मृतिः ॥ महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राम्हीयं क्रियते तनुः ॥ कर्मणां चित्तशुद्धिद्वाराज्ञानोत्पत्यर्थत्वेप्रमाणमाह ॥ ब्राम्हिति ॥

कर्मात प्रवर्त जाहले ह्मणजे आखिल नियमाचा निग्रह होत जातो.

## ( वा. सं. अ. १९ मंत्र २८ व्रतेन दीक्षा )

भाष्यांचा भावार्थ, व्रत ह्मणजे कर्म त्या कर्मात सदैव तत्पर राहणें ही दीक्षा, त्या दीक्षिताला वरील नियमानें कर्मात दक्षता राखणें ही दक्षणा, त्या दक्षतेनें पुढें श्रद्धा उत्पन्न होऊन सत्यत्वानें कर्माचरण घडतें.

तात्पर्य, एकापासून एकाची उत्पत्ति होत जाऊन शेवट श्रद्धा व सत्य उत्पन्न होतें.

या भागानें कर्माचा विचार करतां आरंभीं नित्यस्नानसंध्यादिकर्म देव पितृ कर्म नित्य नैमित्तिककर्म श्रौतस्मार्तकर्म अखेरइष्टानिष्टकर्म आहे. तात्पर्य कर्मात सृष्टि व्यापून गेल्यानें या भूमीससुद्धां कर्मभूमि अभिधान प्राप्त जाहले. याप्रमाणें ईश्वरानें स्वांशभूतच परंतु जीवांच्या आणि त्यांतून मनुष्य देहांत ब्राह्मणांच्या मागें हे जगड्वाळ कर्म लावून त्या उपाधींत त्यास मोहित करून सोडलें आहे. एवढेंच नाहीं, या कर्मजालांत त्यांनीं सदैव राहून उदास न होतां मोठ्या आनंदानें व हुरूपानें कर्म करण्याकरितां केलेल्या सुकर्मापासून मोठमोठी फलप्राप्ती सांगून ठेविली आहे.

## ( वा० सं० अ० ४० मं० ११ विद्यां० )

( उवट भाष्ये ) विद्यां। विद्यांच आत्मज्ञानंच। अविद्यांचकर्मच।
यस्तदुभयं वेद जानाति। सहएकीभूतं कर्मकांडस्य गुणभूतं। अथ
कर्मकांड ज्ञान कांडंच। एकीकृत्य। अविद्यया कर्म कांडेन मृत्युंतीर्त्वा
उत्तीर्य कृतकृत्योभूत्वा। विद्यया ब्रह्मपरिज्ञानेन अमृतत्वंअश्नुते॥ १ ॥

तात्पर्य, विद्यांच परमेश्वरज्ञानसंपंनः। अविद्यांच कर्मच। हे उभय धर्म वेदाविहित असून यथोक्त कर्माचरण घडल्यानें तो नर यमपुरीस न जातां मृत्युपासून उत्तीर्ण होऊन ब्रह्मलोकांस अथवा स्वर्गलोकांस किंवा पितृलोकांस गमन करितो. ( **कर्मणः पितृलोक इतिश्रुतेः** ) ( स्मार्ते ) अहन्यहनिपंचमहाय-ज्ञानामनुष्टानंगृहस्थानां प्रत्यहंक्रीयमाणस्यपंचसूनालक्षणस्य पापस्य शांतीदं नाशकं **स्वर्गलोकफलदाइति बृहदारण्य श्रुतिः** व्याख्यः ( ग्राह्ये ) ब्रह्मलोकावाप्त्यै कन्यादान प्रयोगेप्यपिउदितः ॥ **निर्ण०** ॥ गर्भाधानादिसंस्कारै विवाहांतैःसमानतः ॥

गच्छेत्सायुज्यत्तांविप्रोमुनीनांचसलोकता ॥ १ ॥

ही कर्माची फलप्राप्ति सांगितली आहे. आणि विद्याशब्दें करून ईश्वरज्ञान जाहल्यानें जन्ममरणापासून मुक्त होतो असा मंत्रार्थ आहे.

## ( कर्मांतेततोब्रांम्हण भोजन मिति कात्यायन स्मृति )

॥ ब्राह्मणभोजनस्याशीर्वादोपलक्षणत्वमक्षतं ॥

तात्पर्य कोणत्याही कर्मांती सांगतेस ब्राह्मणभोजन करून मंत्राशीर्वाद ग्रहण केला पाहिजे असा स्मृत्यभिप्राय आहे.

आरंभीच्या आणि या स्मृत्यर्थानें आशीर्वाद कर्मास अवलंबून सांगितल्यामुळें जसें कर्म अगणित आहे तद्वतच आशीर्वादाचीही गणना करतां येणार नाहीं. ज्या ज्या भागानें पहावे त्या त्या भागास पदोपदी कर्माची व्याप्ति व त्या त्या कर्मांती आशीर्वादाचा कालही उत्पन्न होत आहे.

याजवरून जगांतील परिभाषा सर्वथैव खरी आहे. कीं देव ब्राह्मणांचे, साधुसंतांचे, वडिलाचे, मातापित्याचे, गुरूचे आशीर्वाद घ्यावे. याप्रमाणें जगांत भाषा ऐकण्यांत येते. ही सामान्य नाहीं. बोधपर, सखोल, कल्याणप्रद आहे. वरील व्यक्तीचे आशीर्वाद प्राप्त करून घेण्याचे मुख्य साधन तर होईल त्या रितीनें त्यांचा संतोष ठेवणें व त्यास सौख्य देणें होय. अर्थात (पोट भरल्यावर ढेकर द्या ह्मणावें लागत नाहीं) ह्मणजे देवब्राह्मणादिकांस सौख्य दिल्यावर पुढें आशीर्वाद द्यावा असें ह्मणण्याचें कारण नाहीं. असा या भाषेत गर्भितार्थ आहे.

या एकंदरीचा सारांश गृहीत करून वाक्यकर्त्यानें वाक्य केलें कीं, ( **परोपकाराय पुण्याय पापायपरपीडणें** ॥ ) हा प्राकृत आशीर्वादाचा प्रकार जाहला. याहून पुढें पहात गेलें ह्मणजे आशीर्वादाची योग्यता व देणाराची योग्यता उदयास येत आहे.

( योगरत्नेज्वरचिकित्सायां )
चलदल तरु सेवा होममंत्र स्त्रिनेत्र
द्विजगुरु सुर पूजा विष्णुनाम्नासहस्त्रं
मणि अपि अदि दानै राशिषैस्तापसानां
हरति सकल मरिष्टं दुष्ट मष्ट ज्वराणां ॥ १ ॥

तात्पर्यः—चिकित्सकास औषध देणें शास्त्रानें मना केलें अशा दुष्ट अष्टज्वराच्या संकटास दानार्चनादि प्रयोग तर योजिलेच परंतु विशेषतः तपस्वी लोकांचे आशीर्वाद

ग्रहण करावे असें अगस्त्यानें सांगितलें आहे. यांतील उद्देश पहातां त्यांच्या तपोतेजांच्या आशीर्वादानें तरी प्राप्त झालेलें संकट दूर व्हावें अर्थात हा आशीर्वाद तपास अथवा योगास किंवा तेजास ह्मणजे सामर्थ्यास अनुसरून आहे.

याहूनही पुढें विचार करितां श्रौतस्मार्तादिकर्मास आधारभूत वेद असल्यामुळें ते वेदविहित कर्म मानलें गेलें ह्मणून तीं कर्में वेदमंत्रावाचून होत नाहींत याचें कारण त्या मंत्रांत देवता वास करितात सबब देवतेच्या अधिवासनादिहवनार्चनास तेच मंत्र घेऊन शेवटीं कर्मसांगतेसही त्या मंत्रानें आशीर्वाद घ्यावा असें आहे. या विषयींच्या प्रमाणदरुत्यापुढें थोड्या अवकाशांत येणार आहेत, त्या पहाव्या. हा आशीर्वाद वेदमंत्राचा व मोठ्या महत्वाचा आहे खरा परंतु वेदांत मुख्य चार व अंतर्गत अनेक भेद असल्यानें या आशीर्वादास पदोपदी हरकती व कांक्षा उत्पन्न होणार त्या दूर करून हा आशीर्वाद सिद्ध करण्यास वरीच व्याख्या होणार आहे.

कोणत्याही कर्मारंभीं अंतःकरणाच्या प्रसन्नतेस्तव आपल्या मंगळाचे, विजयाचे व कल्याणाचे शब्द श्रवण करावे असे राजनीतींत आहे ह्मणून कीर्तिकार भाट लोक राजसंग्रहांत असून ते नित्य राजेलोकांची मंगलप्रद कल्याणवाची शब्दानें कीर्ति वर्णन करितात.

तद्वतच श्रौतस्मार्तादि कर्मारंभीं मंगलप्रद असे आपल्या कल्याणाचे स्वरितकृत् शब्द श्रवण करावे असें शास्त्र आहे.

त्याप्रमाणें कर्मादौ आणि कर्मांतीं स्वस्ति वाचन करण्याविषयीं आश्वलायन कारिकोक्ती असून त्या उक्तींत ( **ऋग्यजुः सामाशीर्वचनं बह्वृचपिमतं** ) अशी फाकिका आहे त्यावर अश्वलायन प्रभृति वैदिकांची दृढतर समजूत होऊन गेली कीं, कव्हांही आशीर्वाद मंत्र होणें तर या वेदक्रमानें व्हावा. या समजुतीनें अभिमानास व द्वेषास आणि अशास्त्राचरणास कारण जाहले आहे.

याविषयीं ते खरा विचार करतील तर कर्मकालीं या क्रमानें मंत्राशीर्वाद व्हावा अशी ती उक्ती नाहीं. जर कर्मास अवलंबून ही उक्ती असती तर कारिकोक्ति प्रमाणे आणि वेदत्रयी क्रमानें ब्राह्मणसमूह एकत्र जाहल्याशिवाय वेदचतुःष्टयांत स्वस्ति वाचनादि मंत्राशीर्वाद व त्या पुढील अखिल कर्में बंद राहिलीं असतीं तर तसें दिसून येत नाहीं.

जगांत पाहिलें असतां एकाच यजमान शाखेच्या ब्राह्मणद्वारां वेदचतुःष्टयांत तमाम ( **ऋग्यजुः सामाशीर्वचनं** ) या वाक्याचें पठण करून स्वस्ति वाचनादि मंत्राशीर्वादानें अखिल कर्में होतात तीं आपण पहात आहों. याजवरून या उक्तीनें कर्मकालीं वेद क्रमानें मंत्र व्हावा असें होत नाहीं.

यांतील भावार्थ खरा तो वेगळा असावा कीं, आशीर्वाद कोणत्या वेदाचा ग्राह्य व कोणत्या वेदाचा अग्राह्य ही पात्रापात्रता दाखविण्याचे हेतूनें ऋग्वेद १, यजुर्वेद २, सामवेद ३, अशी वेदत्रयीच पात्र असल्याविषयीं बहुऋषिमत आहे.

या त्रयीवांचून चतुर्थ अथर्वण आशीर्वादास पात्र नाहींत. कारण वेदत्रयीप्रमाणें अथर्वास स्थानादि कर्मदेवता नाहींत, ह्मणून कारिकेंत गृहीत केले नाहींत.

वेदत्रयीचें महत्व पहातां

**अम्हभूर्भुवस्वरोम**

या श्रुतिप्रमाणानें मूळ वेदत्रयी प्रणव ब्रह्मांतर्गतच्या मुख्य त्रयव्याहृत्युद्भव असून

**भूरिति ऋग्वेदः १, भुवरिति यजुर्वेदः २, स्वरिति सामवेदः ३,**

अशी श्रुति आहे. शिवाय,

**भूःभूर्लोक पृथिवी १, भुवः भुवर्लोक अंतरिक्ष २, स्वः स्वर्लोक आकाश ३,**
याप्रमाणें त्रयव्याहृती तींच त्रिभुवनें व त्या त्रय पीठावर त्रय वेदाचीं स्थानें आहेत.

त्यापैकीं पृथिवी स्थानच्या ऋग्वेदाची अग्निदेवता व अंतरिक्ष स्थानच्या यजुर्वेदाची इंद्र वायुदेवता व द्युलोकच्या सामवेदाची सूर्यदेवता आहे.

आणि याच देवतेंच्या स्तवरूपमंत्रानें वेदत्रय ग्रंथाचे आद्यमंत्र असून याच देवतेस अखिल कर्मांत चक्षुषी देवता मानल्या आहेत.

तसेच, त्रयस्थानच्या वेदास क्रमानें अग्नि १, जातवेदाग्नि २, वैश्वानराग्नि ३, असे कर्माग्नि व अष्टवसू, अष्टकपाल १ एकादशरुद्र एकादशकपाल २, द्वादशादित्य द्वादशकपाल ३ अशा अभिधानानें कर्मदेवता आहेत.

* या चक्षुषी देवतेचें वेदचतुःष्टयांत किती महत्व आहे व कसकसें कर्म चालू आहे हें सर्व लक्षांत येण्याकरितां या सुदर्शनाच्या शेवटीं चक्षुषी देवतेच्या विवेचनाचा उतारा घेतला आहे तो पहावा.

असें कर्मसाधन अथर्वास नाहीं. सबब कारिकेंत त्यांचा उच्चार न करतां आश्वलायनांनीं वेदत्रयीचाच उच्चार केला हें वैदिकानी लक्षांत आणावें. आणि याच कारणानें जगांत कर्मकालिक स्वशाखेचा मंत्रक्रम चालू असलेला यथार्थ आहे असें समजावें.

या व्यवस्थेवरूनही जर वैदिकाची समजूत न होईल तर ते केवळ वैदिक समजले पाहिजेत. वैदिकास मंत्रावांचून शास्त्र अवगत नसल्यामुळें क्रमव्युत्क्रमाचा अभिमान दृढ करावा, इतकेंच माहीत असतें.

बरें, शास्त्रव्यासंग करणारे तरी वैदिकाप्रमाणेंच एकदेशी आहेत. पहा, शास्त्र

माहीत आहे तर मंत्र अवगत नाहींत. कदाचित वेदशास्त्रसंपन्न असले तर श्रौतस्मार्तादि याज्ञिक विषय अवगत नसावयाचा. मिळून कोणत्याही बाजूनें कमीपणा राहून शेवटीं वैदिकांच्या ऱ्हासास आणि वेदाभिमानास प्रवर्त व्हावयाचें. अशी शास्त्रवेत्त्यांची स्थिति गोचर होत आहे.

वेदविषय समजण्यास मूळ वेदमंत्र व त्यापुढें त्या मंत्राच्या छंदऋषि देवता जाणून त्या त्या देवतेच्या हवीसह व्यवस्था व क्रम समजण्यास श्रौतस्मार्तादिक याज्ञिक विषय माहीत पाहिजे, आणि या उभय विषयांतील अंधधर्म नष्ट होण्यास सत्यवादी शास्त्रज्ञ शिवाय भाष्यादिकांचें व उपनिषदादिकांचें अवलोकन पाहिजे तेव्हां हा विषय लक्षांत येऊन तमनाश होणार आहे.

तूर्त या गोष्टीची गैरसोय जाहल्यानें वडिलपणाच्या किंवा प्रथमत्वाच्या अभिमानांत ऋग्वेदी निमग्न आहेत. तसेंच श्रेष्ठत्वाच्या व अयातयाम वेदत्वाच्या तेजास अवलंबून अभिमानांत शुक्लयजू निमग्न आहेत परंतु वरील गैरसोय दूर जाहल्याशिवाय उभयतांचा हा अभिमान नष्ट होणार नाहीं हें खरें आहे.

जगांत पाहिलें असतां जन्मास आलेला प्राणी अभिमानांत मी मी ह्मणतच इहलोकची यात्रा करितो हेंही आपण पहात आहों. बरें या कृत्यास दूषण द्यावें तर तेंही वेद विहित असल्यामुळें सर्वथैव खरें आहे.

कारण जोंवर देहाची अभिमानिनी देवता जागृत आहे तो पर्यंतच देहबुद्धि राहून सृष्टयक्रमादि अखिल कर्में चालू आहेत. देहाभिमान नष्ट जाहल्यावर देहबुद्धयादि सृष्टय कर्में नष्ट होणार. तद्वतच वेदाभिमान आहे तोंपर्यंत वेद व वेदधर्म आहेत. अर्थातच वेदाभिमान नष्ट जाहल्यावर वेद व वेदधर्म नष्ट होणार हें सांगणें नकोच. तस्मात् उभय ब्राह्मणास वेदाभिमान असणें उचित आहे.

## ( वा. सं. अ. ४, मंत्र १७ हिरण्मयेन ) त्याचें भाष्य

( उव्वट भाष्य ) पुनरादित्योपासन माह । हिरण्मयेन इदानीमादित्योपासनमाह । यद्यपि हिरण्मयेन हिरण्यरूपेण पात्रेण पिबंत्यस्मिन अवस्थितान्रसान्रश्मयइति पात्रंमंडलं मंडलेन सत्यस्याविनाशिनः पुरुषस्य अपिहितं अंतर्हितं । मुखं शरीरं । तथापियः असौ आदित्येपुरुषः योगिभिरुपलभ्यते ! असौ अहमस्मिएतांवोपसनांकुर्यात् ॥१७॥

तात्पर्य.—या हिरण्मय पात्रांचाठायीं ह्मणजे ब्रह्मांडाचा किंवा शरीराचे ठायीं राहणारा आपल्या रश्मि करून मंडलस्थित असुन सर्व रसांचा उपभोक्ता तो मी सत्यनामे करून अविनाशी असा आदित्यपुरुष आहे.

यहा ईश्वरी अभिमान आहे म्हणून ब्रह्मांड उभें आहे.

याजवरून हा अभिमान आज नूतन उत्पन्न जाहला म्हणण्यास मार्ग नाहीं. हो प्रथम उत्पन्न जाहल्यावर अखिल सृष्टि उत्पन्न जाहली म्हटलें तरी युक्तच आहे. अभिमान अनादि असल्यामुळें ज्या ज्या शास्त्रेंत जे जे ऋषि किंवा ग्रंथकर्ते झाले अथवा आचार्य होऊन गेले त्यानीं त्यानीं आपआपल्या अभिमानास अवलंबून मतें, किंवा ग्रंथ अथवा अन्यसाधनें करून ठेविलीं असावयाचींच हें उघड दिसत आहे, आणि तशी दृष्टीसही पडत आहेत.

तत्प्रमाणें किंवा ते ग्रंथ अथवा तें महत्वाचें वर्णन परस्परांनीं परस्परांस दाखविलें असतां कार्यभाग न होतां स्वमुखें स्वतःचा स्तुतिस पात्र किंवा स्वकल्पाच्या व्रताचें स्वतःच वर्णन केल्याचा आरोप येणार. हा दोष उत्पन्न न होतां कार्यभाग होण्यास हेंच वर्णन स्वमुखावांचून अन्यत्रांनीं केलें असतां जसें भूषणास्पद होऊन महत्वाची कीर्ति होते, तद्वतच हा विषय प्रतिपादन जाहला पाहिजे म्हणजे परस्परांचा अभिमान कायम राहून समाधान होण्यास हा मोठा राजमार्ग आहे.

याजकरितां ज्याची त्यानीं आपआपल्या अभिमानाचीं किंवा अर्वाचीन साधक ग्रंथाचीं साधनें वाजूस ठेवून प्राचीन ग्रंथाच्या प्रमाणानें अथवा अन्य शास्त्रेचा किंवा परस्परांनीं परस्परांच्या वेदांतील श्रुति प्रमाणानें आपआपलीं मतें सिद्ध करून दाखविल्यास भूषण होईल एवढेंच नाहीं; स्वतःचे वर्णन अन्यानीं केल्याच्या पूज्यतेसह महत्वाची कीर्ति जगप्रसिद्ध होणार आहे. शिवाय या मार्गानें गेल्यास विशेष असेंही होईल कीं, ज्यांच्या वेदाची प्रमाणश्रुति त्यांच्याच समोर ठेविल्यास धरलेल्या वेदाभिमानानें त्या श्रुति शास्त्रमार्गें मुकाट्यानें खालीं मान घालून त्यास मार्गस्थ व्हावें लागणार आहे आणि असें जाहल्यानें अभिमान राहून परस्परांनीं परस्परांचे समाधानही करावयाचें कारण राहत नाहीं. सबब उभयतासही या मार्गें जाणें सोयीकर आहे.

**प्रथम प्रकर्ण समाप्तः**

श्री योगेश्वरार्पणमस्तु

# प्रकर्ण २ रें.

## श्री योगेश्वरोजयती.

---

या राजमार्गे जाण्यास प्राचीन ग्रंथाचा व अन्य शाखेच्या श्रुतिस्मृति प्रमाणाचा शोध केला पाहिजे.

याकरितां तसें ग्रंथ शोधून श्रुति वाक्यांचें मनन करण्यांत ( **ऋग्यजुःसामाशीर्वचनं** ) याच कारिकेचें शाकलाच्या शिष्यानें खंडण केल्यासारखें दिसून आलें, ह्मणजे ज्या ऋषीनें वेदाविषयीं अति सूक्ष्म विचारानें वेदचतुष्टयांची व त्यांतील देवतेची व मंत्राच्या पात्रापात्रतेची उत्तम समजून घेऊन यज्ञांतील द्वारासह द्वारसूक्तादिकाचे अखिल शास्त्रार्थ वेदोक्तीनेंच प्रतिपादन करून अभिनंदनीय सिद्धांत केला कीं त्याजवर कोणाची कोणत्याच विषयांत उक्ति प्रवेश होऊं नये असा निरुक्ताभिधानाचा जातुकर्ण्यानें षडंग ग्रंथांत ग्रंथ स्थापित केला आहे त्या आचार्यानें कारिकेचें असें खंडण केलें कीं प्रथम या कारिकेंतील वेदत्रयी पैकीं सामवेदास कर्ममुक्त समजून कर्मासह आशीर्वादांतून मुक्त केले आहे.

ह्मणजे सामवेद हा कर्म वेद नसून अध्यात्मपर असल्यामुळें त्यास एक देशी अभिधान देऊन कर्मश्रुतींतून त्याज्य केला. त्याप्रमाणेंच स्मृतिंत व आदित्य पुराणांतही आहे. ( **सामास्त्वेकदेशितः** ) यांतील एकदेशी पदाचा भावार्थ आणि सामवेदास कर्म का नाहीं हें वाचकांच्या लक्षांत आणून देण्यास अध्यात्मपर शारीरकांचा दृष्टांत पुढें केला पाहिजे तेव्हां हा विषय लक्षांत येणार आहे.

आरंभीं आपल्या शरीरांत होणाऱ्या कर्मावर सूक्ष्म लक्ष द्यावें कीं, नित्य आपण जे जे सेवन करितों ते पदार्थ जठराग्नि पाचन करितो हें ऋग्वेदाग्नीचें कर्म होय. तसेंच त्या परिपाकार्थ व शरीराच्या जीवनार्थ मुखांतून नाभीपर्यंत रात्रंदिवस सदैव सारखा वृष्टिरूप जलप्रवाह चालू आहे हें यजुर्वेद इंद्रदेवतेचें कर्म होय. याशिवाय यजुर्वेदाच्या वायुदेवतेचें तर शरीरांत श्वासोश्वास कर्म असून त्या प्राणवायूच्या पंचवृत्ति कर्मानेंच शरीराची धारणा स्थिरत्वादि कर्म होत आहे.

याप्रमाणें या ऋग्यजुच्या कर्मदेवतेंचा शरीरांत उपयोग आहे तसा सामवेदेदेवतेंचा नाहीं ह्मणून सामवेदास कर्म नाहीं असें सिद्ध केलें आहे.

याशिवाय अध्यात्मावर लक्ष ठेविला असतां सामवेद हा अध्यात्म पर कां मानला हेंही लक्षांत येण्यासारखें आहे. ह्मणजे सामवेदाची सूर्यदेवता असून त्या सूर्याची शरीरांत आत्मस्थानीं स्थापना केली आहे. ( सूर्यऽआत्माइति श्रुतेः ) अर्थात अखिल कर्मदेव-

सेंच्या कर्मास साक्षीभूत आत्मा असून आत्मा तर शरीरांत कांहींच कर्म करीत नाहीं, आणि त्या आत्मावलोकनाकरितां वेदवेदांतादि व योगवासिष्ठादि अध्यात्म ज्ञाते एकाग्र होऊन गेले आहेत ह्मणून सामवेदास एकदेशी आणि अध्यात्मवेद मानिला गेला.

तसेंच त्या आत्म्याच्या चिरंजीवित्वाकरितां आशीर्वादादि अखिल कर्में होत आहेत याचा प्रत्यय नित्य आपला संकल्पच आहे कीं, ( मम त्मनः श्रुतिस्मृति पुराणोक्त फल प्राप्त्यर्थं ) ह्मणजे वेदशास्त्र व पुराणादि अनाचारांत उत्पन्न होणारें श्रेय माझ्या आत्म्यास प्राप्त होऊन तो चिरंजीव राहावा याप्रमाणें आत्म्याच्या चिरंजीवितेकरितां अखिल कर्में होत असल्यामुळें सामवेद हा वरील कारिकेंतून व कर्मश्रुतींतून सोडून नैरुक्त श्रुतीनें ऋग्यजुच प्राह्य केले आहेत.

( नै० पू० अ० १ खं० १९ )

॥ अर्थवंतः शब्दसामान्यादेत द्वैयज्ञस्य समृद्धं यद्रूप समृद्धं यत्कर्म

॥ क्रियमाण मृग्यजुर्वाभिवदती तिच ब्राह्मणं क्रोकंतौ पुत्रैर्नप्तृभिरिति

॥ यथे एनाविंद्रत वाचोयुक्तयोनियता नुद्र्यामवंतीतिलौकिके प्यपेतद्य

॥ ऐंद्राग्नी पितापुत्राविति तिसथो एतद्ब्राह्मणेन रूपसंपन्ना विधीयंत

॥ इतिश्रुतिः ॥

या श्रुतींत ऋग्वेद आणि यजुर्वेद या उभय वेदाच्या वर्णनांत, वेदाच्या कर्मदेवते सहित ब्राह्मणानें वर्णन केलें आहे व या उभय वेदातच यज्ञकर्म असून त्या यज्ञकर्माविषयीं उभयवेदाचे ब्राह्मण तत्देवतारूप व क्रियासंपन्न आणि यजमान जणो अर्थात शब्दप्रवृत्त व नित्य भाषण सत्यवादी आणि पवित्र आहेत असे वेदाचें व ब्राह्मणांचे महत्व वर्णन करून पुढें देवतेचें वर्णन केलें आहे.

देवता वर्णनांत ऋग्वेदाची अग्निदेवता आणि यजुर्वेदाची इंद्रदेवता आहे. त्या उभयदेवतांचा इतका निकट संबंध असून पोहोंचविला आहे कीं, हे पितापुत्रच असून परस्परांचे हितकर्ते आहेत.

या स्थळीं या उभयदेवतेंत पितापुत्राचें नातें कसें उत्पन्न जाहलें हें वाचकांस समजून दिलें पाहिजे. परंतु या विषयीचा कोठें संबंध गोचर नसल्यामुळें ब्रह्मांडारंभापासून तपास करणे भाग आले.

या विराटाच्या उत्पत्तिकडे पाहिले असतां हें ब्रह्मांड प्रणवरूप आणि एक समयावस्थेकरून एकाच काळांत उत्पन्न जाहल्याविषयीं वेदचतुःष्टयासह अष्टादशपुराणे भागवत भारतादि उपनिषदें कथन करितात ( अणुरात्माचेतसा इतिश्रुतेः )

तात्पर्यः—अणुप्रमाण परमात्म्याच्या सुषुप्त्यवस्थेंत हृदयाकाशांतून ( स्फोट ) मात्रे ओं असा प्रणवोच्चारध्वनी उत्पन्न जाहला तो हा विराट पुरुष ब्रह्मांड बिंदू उभा आहे या आरंभावर एक नाथाचें काव्य आहे ( मुंगी व्याली शिंगी जाहली तिला दुध किती ॥ अठरा रांजण भरून उरले व्याले चारी हत्ती ॥ तात्पर्य, अणुप्रमाण परमात्म्यापासून ब्रह्मांड होऊन त्याच्या यशानें अष्टादशपुराणे व वेदचतुःष्टय ग्रंथ भरले आहेत.

( भाग० स्कं० २ अ० ११ श्लो० ४१ )

तदाहुरक्षरं ब्रह्म सर्व कारणकारणं ॥
विष्णोर्धाम परं साक्षात्पुरुषस्य महात्मनः ॥ ४१ ॥
॥ टि० ॥ सर्वेषां कारणानां कारणं धामरूपं ॥ शेष सुगमं ॥

यांतील तात्पर्य पहातां प्रणवरूप जें ब्रह्मांड उत्पन्न जाहलें तेंच संपूर्ण सृष्टींतील अखिल कर्मास कारण होऊन श्रीविष्णूचें नांदतें घर मानलें व त्या देवतारूप महास अक्षर ब्रह्म ह्मटलें आहे.

( भा० स्कं० १२ अ० ६ श्लो० ३९ )

ततो भूत्रिवृदोंकारो यो व्यक्तः प्रभवः स्वराट ॥
यत्ते लिंगं भगवतो ब्रह्मणः परमात्मनः ॥ ३९ ॥

टि० ॥ त्रिवृत् त्रिमात्रः कंठोष्मोमादिभिः उच्चार्यमाणस्योंकारस्याक्षरसमाम्नायांतर्भावात् ॥ सूक्ष्मत्वयातं विशिनष्टि ॥ अव्यक्तः प्रभवो यस्य सः तदेवाह स्वराट् स्वतः एव हृदि प्रकाशमानः तमेव कार्येण लक्षयति ॥ यत्तदिति ॥ नपुंसकत्वं लिंगशब्दविशेषणत्वात् लिंगगमकं ॥ ३९ ॥

तात्पर्यः—अकार उकार मकार त्रैमात्रा तिच पृथ्वी अंतरिक्ष आकाशादि त्रिभुवनें व भूःर्भुवस्वः व्याहृती व तेच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद तेच सत्व, रज, तमगुण तेच ब्रह्मा, विष्णु, महेश देवता या प्रमाणें या त्रयींत अखिल वेद व सृष्ट देवतासह एक समयावच्छेदे करून स्वराट स्वयंभू प्रणवरूप हें ब्रह्मांड उत्पन्न जाहलें आहे.

( नै० उ० अ० १ खं० ६. )

॥ अथाकारचिंतनं देवतानां पुरुष विधास्युरिति० ( तत्रैव खंडे ) पुरुषविधानामेव सतां कर्मात्मान एते स्युर्यथा यज्ञो यजमानस्यैव सचाख्यानसमय इति श्रुतेः ॥

तात्पर्य—अकार चिंतन ह्मणजे सृष्ट्यारंभीं त्या परमात्म्यानें विराट पुरुष रूप धारण केल्या नंतर अंतरगत वास करणाऱ्या देवताही प्रथक प्रथक आकारल्या गेल्या. त्यातच आपण कर्मात्मा होऊन कर्म संबंधांत यज्ञ यजन यजमानरूपानें कर्म चालूं केलें आणि त्या कर्मांत निष्पन्न होणारें श्रेय ग्रहण करित आहे.

( नै० उ० अ० १ खं० १ )

॥ तिस्र एव देवता इति नैरुक्ता अग्निः पृथिवीस्थानो वायुर्वेंद्रावांतरि
॥ क्षस्थानं सूर्योद्युस्थानस्तासां महाभाग्यादेकैकस्यापि बहूनि नामधे-
॥ यानि भवंत्येपि वा कर्म पृथकद्यथा होताध्वर्युब्रह्मोद्गातेत्यप्येकस्य
॥ सतोपि वा पृथगेस्युः पृथक्कधिस्तु तयो भवंति तथाभिधानानि य-
॥ थो एतत्कर्म पृथक्त्वादिति बहवोपि विभज्य कर्माणिकुर्युरिती
॥ श्रुतेः ॥

या श्रुतित या विराडांतर्गत विभागे करून स्थानं परत्वें त्रिभुवनें व त्या त्या भुवनांतील कर्म वेद व कर्मे व त्या त्या अखिल कर्मांच्या देवता व स्थानें प्रकाशीत केलीं आहेत त्या पैकीं प्रथम पृथिवीस्थानीं अग्निदेवतेसह ऋग्वेद पीठ स्थापन केलें.
द्वितीय अंतरिक्ष स्थानीं इंद्र १ वायु २ या उभय देवतेसह यजुर्वेद पीठ स्थापन केलें.
तृतिय अकाशस्थानीं सूर्य देवतेसह सामवेद पीठ स्थापन केलें.

या प्रमाणें प्रथम त्रिस्थलींत वेदत्रयीची स्थापना करून त्या वेददेवता मार्गें त्या त्या भुवनांत जें कर्म चालूं केलें त्या कर्माची प्रथक प्रथक व्यवस्था अशी लाविली कीं, त्या देवतेनीं प्रलया पर्यंत सारखे तेंच कर्म करीत असावें ह्मणेज अग्निनें परिपाक करावा इंद्र वायुनें वृष्टिद्वारें अन्नोत्पादनानें जंतु मात्रांचें जीवन करावें. सूर्यानें उदयास्तभ्रमणें करून रुतु भेदादि कालक्रमणा करावी या क्रमानें या देवता मार्गें चिरंतन अखिल कर्मे चालूं केलीं.

त्या कर्मांतरगत ही स्थूल सूक्ष्म अगणीत कर्मे होत गेलीं तरी त्याच देवतेनीं अनेक रूपें किंवा अनेक देवता होऊन कर्म करित गेल्याच्या कर्तुत्वानें त्या देवतेचें असें भाग्यवर्धमान जाहलें कीं या पंचभूतवेददेवतेबाह्य या ब्रह्मांडांत परमाणू इतकेही स्थल रिक्त राहिलें नाहीं.

या अनेक कर्मानें त्या देवतेस अनेक अभिधानें प्राप्त जाहलीं त्यांपैकीं उदाहरणार्थ थोडीं सांगितलीं आहेत कीं—ऋग्वेदाग्निस होता अभिधान यजुर्वेद इंद्रवायूस अध्वर्यू अभिधान सामवेद सूर्यास उद्गाथाभिधान आणि अथर्वणवेद उदकास ब्रह्माभिधान

प्राप्त जाहलें. याप्रमाणें अनेक कर्मानें अशीच अनेक अभिधानें होत गेलीं आहेत तशीच त्या त्या कर्मपरत्वें त्या त्या देवतेंच्या प्रथकत्वानें व स्तुति करणाराच्या प्रथक बुद्धीनें त्या अखिल देवतेंच्या स्तुतिचे अनेक मंत्र होऊन त्या स्तुति स्तोममंत्रानं वेदचतुष्टय ग्रंथ भरले गेले असा श्रुत्यभिप्राय आहे.

( नै० उ० अ० १ खं० ४ )

॥ तद्येनादिष्ट देवता मंत्रा स्तेषु देवतोप परीक्षा यद्देवतः
॥ सयज्ञो वा यज्ञांगवा तद्देवता भवंति० अचारो बहुलं
॥ लोके देवदेवत्य मतिथी देवत्यं पितृदेवत्यं याज्ञदैवतो
॥ मंत्र इत्यपिह्य देवता देवता स्तूयंते यथाश्व प्रभृति
॥ न्योषधि पर्यंता इतिश्रुते ॥ ( तत्रैवखंड० )॥ अथातो
॥ दैवत त्तद्यानि नामानि प्राधान्य स्तुति न्सदैवतानां तद्दैवत
॥ मित्याचक्षते सैषादेवतो पपरीक्षा यत्काम ऋषि यस्या-
॥ देवता यामार्थं यत्य मिच्छस्तुति प्रयुंक्ते तद्दैवतः समं-
॥ त्रोभवती तिश्रुतेः ॥

या श्रुतींत आरंभी अनादि इष्ट पदानें असें दाखविलें कीं, ज्यास आदी ह्मणजे जन्म नाहीं अशा स्वयंभू व इष्ट ह्मणजे कल्याणप्रद ज्या कर्मदेवता आहेत त्याच यज्ञ व यज्ञांगें होऊन कर्म करितात हें वर सिद्ध जाहलेंच आहे परंतु त्यांच्या नानाप्रकारच्या कर्मानें जगामध्यें अगणीत धर्म व अगणित अचारही होऊन गेले आहेत.

त्या धर्माचारानें अतिथीपासून अश्व वनस्पती आदिकरून देवताच देवता ज्या होऊन गेल्या त्याचें उदाहरण दाखविलें आहे कीं, देवपूजेचे देव तर मृत्तिका पाषाणादिकापासून धातू आदिकरून अगणीत आहेतच परंतु एखादा अन्नार्थी जरी द्वाराशीं प्राप्त जाहला तरी त्या अतिथास देवच समजून त्याचें अतिथ्य करावें.

हा तर सजीव प्राणी आहे परंतु जे गतप्राण जाहलेले आपले पूर्वज ते देखील पितृदैवत्य मानले आहेत तसेच यज्ञ साहित्य व यज्ञ ह्या देवताच मानल्या गेल्या. तात्पर्य, याप्रमाणें अश्वआदिकरून पशु जाति व वनस्पती आदिकरून स्थावर जंगम असें सर्व देवतामय ब्रह्मांड होऊन गेलें तत्रापि त्या अखिल देवतेंचे श्रुतिरूपमंत्र वेदांत असून त्या देवतेंच्या परिक्षेकरितां अशी खूण सांगितली आहे कीं, ज्या मंत्रांत ज्या देवतेची प्राधान्य स्तुति आहे त्या देवतेचा तो मंत्र ऋषींनीं दृष्ट केल्यानें त्या मंत्रांत अगर तो मंत्रच ती देवता आहे असें समजलें पाहिजे.

( तथा च पराशरस्मृतिः )

॥ यस्मिन्मंत्रेतु योदेव स्तेनमंत्रेण चिन्हितं ॥
॥ मंत्रत द्दैवतं विद्या त्संति तत्रातु देवताः ॥ १ ॥

या स्मृतीचें तात्पर्य वरील श्रुतीप्रमाणें आहे या कारणानें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

( नै० उ० अ० खं० )

॥ ब्रांह्मणा नानिंदेत व्रतमे तेवै देवा प्रत्यक्ष यद्ब्राह्मणा इतिश्रुते. ॥

तात्पर्य—व्रत ह्मणजे कर्म त्या कर्मांत जे जे ब्राह्मण असतील ते त्या कर्मदेवते-समान असतात कारण मंत्राधीन देवता असल्या विषयीं वर श्रुति सिद्ध जाहले आहे आणि ते मंत्र जर ब्राह्मणांच्या मुखांत वास करितात तर अर्थात प्रत्यक्ष कर्म-देवतारूप ते ब्रांह्मण सिद्ध होतात. सबब त्यांची निंदा करू नये. ब्राह्मणाची निंदा तीच देवतेची निंदा होते असा श्रुत्याभिप्राय असल्यामुळें जगांत ब्रांह्मणास भूदेव ह्मणण्याची परिभाषा चालू आहे.

भृगु विरोचनाच्या विवादांत प्रल्हादाचें वाक्य.

॥ देवाधीनां जगत्सर्वं मंत्राधीनांच दैवतं ॥
॥ तेमंत्र ब्राह्मणाधीनं ब्राह्मणोममदैवतं ॥ १ ॥

या वाक्याचा उत्तानार्थ असून वरील श्रुतिस अनुसरून आहे.

एथपर्यंत विराटांतर्गतच्या वेदाचा व मंत्राचा व देवतेंचा स्थूल विचार प्रसिद्ध केला आहे.

प्रकर्ण द्वितीय समाप्तः

॥ श्री योगेश्वरार्पणमस्तु. ॥



दक्षिण.
यजुर्वेद.
ॐ कार
प्रणव.
जीव
शीव
विष्णु
ब्रह्मा
पूर्वदिशा.
ऋग्वेद.
सामवेद.
पश्चिम.
अथर्वणवेद
उत्तर.

# प्रकर्ण ३ प्रारंभ.

श्री योगेश्वरोजयती.

---

आतां वरील विषयाचा सूक्ष्म विचार लक्षांत येण्यास प्रथम हा प्रणवरूप विराट-पुरूष अथवा हिरण्यगर्भ प्रजापतिरूप ब्रह्मांड किंवा हेंच आपलें शरीर समजा आणि या वेदपुरुषांच्या अंतरगत अवलोकन करा कीं, एका शरिरांतच अनंत कर्मांच्या अनंत वेद शाखा व तेहतीस कोटि यज्ञदेवता अक्षरसंज्ञे करून गोचर होतात. ह्या पाहून ठेवा. कारण ( यस्तंवेद सवेदवित् ) असे गीतेंत स्वमुखें भगवान कथन करितात तर हें समजल्यानें वेदवित् या योग्यतेस याल याची व्याख्या पुढें आहे. या प्रणवरूप शरिरांत श्रुतीनें प्रथम दोन विभाग दाखविले त्यांपैकीं पाया पासून नाभी-पर्यंतच्या विभागांत सप्तपाताळें व नाभीच्या उर्ध्व विभागांत सप्तस्वर्ग कल्पिले आणि या उभय विभागाच्या मध्यवर्ति नाभी ही पृथिवी सिद्ध केली आहे. ( वालखिल्य-श्रुतिःपरार्धान् पृथिव्यैसमुद्रपर्यंताया इति ) यास्थलीं समुद्र ह्मणजे आकाशास अभिधान आहे अथवा अंतरिक्ष वै० नि० अ० १ खं० ३ वाक्य ६।२३।२६ पहावें आणि ( पृथिवीस्त्वा नाभौ सादयामीति श्रुतेः) नाभी ही पृथिवी मानिली आहे.

उर्ध्व परार्धांत पुढें तीन विभाग कल्पिले तीच त्रिभुवनें व त्या भुवनावर वेदत्रयीं पीठें व देवता स्थापित केल्या आहेत. त्यांपैकीं, प्रथम नाभी ही पृथिवी तर सिद्ध झालीच आहे.

ऋग्यजुः सामवेदांत असलेला मंत्र.

॥ आयंगौः प्रश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः । पितरंच प्रयंत्स्वः ॥ ४९

(भाष्य) गौः गमनशीलः प्रश्निः प्राष्टवर्ण्यः व्याप्ततेजाः अयं सूर्य आक्रमीत् ॥ आक्रान्तवान् । उदयाचलं प्राप्तवानित्यर्थः ॥ आक्रम्य च पुरः पुरस्तात् पूर्वस्य दिशि मातरं सर्वभूतजातस्य निर्मात्रीं भूमीम्आसदत् आसीत् इति प्राप्नोति । सदेच्छान्दसो लेट् । लदित्वात् । च्लेरंगादेशः । ततः पितरं पालकं द्युलोकंचशब्दादन्तरिक्षं प्रयन् प्रकर्षेण शीघ्रं गच्छन् स्वः सुअरणः शोभनगमनो भवति । यद्वा पितरं स्वर्लोकं प्रवर्तते ॥४९॥

तात्पर्य, सूर्योदय ज्या भूमीच्या भागीं होतो त्या भागास पूर्व दिशा कल्पिली आहे. इतकाच यांतील भावार्थ घेणें आहे. कारण (सूर्य आत्मा) शरिरांत ठरला असून नाभी ही पृथिवी सिद्ध झाली आहे, आणि त्या स्थानीं आत्मा प्राप्त जाहला.

ह्मणजे उदय होतो; मग नाभिस्थान पूर्व दिशा सिद्ध केली आहे. यापुढें जसजसा ऊर्ध्व गमन करतो त्या उच्च दिशेला दक्षिण सिद्ध केली व तेथून पुढें परावर्त झाला ती पश्चिम सिद्ध केली आहे, याप्रमाणें छांदोग्यश्रुतींतही कथित आहे. अस्तु.

त्या नाभीस श्रुतीनें पूर्व दिशा सिद्ध करून तीच भूःव्याहृती भूर्लोकमानिला असून व ती व्याहृतीच ऋग्वेदही मानिला आहे व या स्थानचा जो पाचकाग्नि आहे, तोच ऋग्वेदाची मुख्य चक्षुषी देवता ह्मणवीत आहे.

या शिवाय त्या नाभीच्या आसमंतात्‌भागीं सूर्य १ सोम २ अग्नि ३ मंडलें जीं आहेत त्यासच प्राणोदानोव्यान अशा वायूच्या त्रय वृत्तिरूप त्रिवृत्‌स्तोमानें वागादि ऋग्वेदकर्म चालू केलें आहे. या प्रमाणें हा प्रथम पिठाचा विभाग दाखविला आहे ( वा० सं० अ० १४ मं० २८ पैकीं भाष्य महिधर ) एक या० वाग्वा एका वाचैवं स्तुवते तिश्रुतेः तिसृभिः त्रिवृत् त्रयोह प्राणाः प्राणोदानव्यानास्तैरिति ( ऋचंवाचंप्रपद्येतिश्रुतेः ) वै० नि० अ० १ खं० १० वा० ३४।२८ ॥ २८ ऋक वाणि नामानी घोष रूपिणे

यापुढें द्वितीय विभागास ( पृथिव्यामुर्वंतरिक्षमन्वेमीतिश्रुतेः ) ह्मणजे नाभीच्या ऊर्ध्व शिरापर्यंतचा जो भाग आहे त्यास अंतरिक्ष सिद्ध करून त्या भागास श्रुतीनें दक्षण दिशा मानिली आहे तीच भुवः व्याहृती भुवर्लोक व ती व्याहृतीच यजुर्वेद मानिला आहे व या अंतरिक्षांतील वृष्ट्यादि कर्मांच्या ज्या इंद्रवायुदेवता आहेत, त्याच यजुर्वेदाच्या मुख्य चक्षुषी देवता ह्मणवीत आहेत.

याशिवाय त्या अंतरिक्षाच्या आसमंतात भागीं असलेल्या अवयवरूप शरिरास यजुर्वेदाच्या कर्माचे पंचदश स्तोम कल्पिले आहेत. वा० स० अ० १४ मंत्र २९ पैकीं भाष्य महिधर ( पंचदशभिः। दशहस्त्या अंगुलय श्चत्वारि दोर्बाहवाणि वदूर्ध्वंनाभेस्तत्पंचदश मितिश्रुतेः ) मनोयजुः प्रपद्येतिश्रुतेः याचा भावार्थ पंचदशस्तोम त असे कीं, उभय हस्ताचीं अंगुलें १० व कोंपरापर्यंतचे भाग २ तदूर्ध्वबाहूपर्यंतचे भाग २ व नाभ्यूर्ध्व शिरापर्यंतचा भाग १ मिळून या पंचदश संख्या भागास पंचदश स्तोम करून या देवतेच्याद्वारें यजुर्वेदाचें यजन कर्म चालू केलें आहे. (यजुरेव शिरइति तैत्तिरीय श्रुतिः ) याच्या ऊर्ध्व जें शून्य आहे तेंच शून्य ब्रह्म ह्मणजे कांहीं दिसत नाहीं तें आनंदब्रह्म कल्पिलें आहे. ( ओंखंब्रह्म इतिश्रुतेः ) ( उवट भाष्य ) ओं खंब्रह्मेतियजुषि। ओं मितिनामनिर्देशोब्रह्मणः खंब्रह्मेत्याकाशरूपमंते ब्रह्मध्यायेत्। यद्यपि ब्रह्मचेतन माकाशस्त्वचेतन स्तथापि येकदेशसाम्यत्वं। नभो वद्व्यापकं ब्रह्म ओं इति जपनध्यायेत इत्यर्थः ॥ याप्रमाणें हा द्वितीय पिठाचा भाग दाखविला आहे.

यापुढें तृतीय भागास ( **शीर्ष्णोद्यौः इतिश्रुतेः** ) ह्मणजे शिरास स्वःव्याहृतीचे स्वर्लोक सिद्ध करून ती व्याहृतीच सामवेद मानिला आहे व त्या स्थानचा जो सूर्य आत्मा तीच सामवेदाची मुख्य चक्षुषी देवता ह्मणवीत आहे. त्या स्थानीं त्या सामदेवता

रूप आत्म्याचें आगमस्थान मानिलें असून कर्माची पश्चिम दिशा ठरविली आहे.

त्या पश्चिमेची मर्यादा शारिर भागांत नाभ्यधस्थ पश्चिमद्वारासह पायापर्यंत मानिली आहे. त्या दिशेस सामवेद आदित्य देवतेस वैश्वानराग्निरूपानें गर्भाशयांत स्थान दिलें आहे.

याशिवाय त्या स्थानच्या आसमंतातभागीं असलेल्या अवयवरूप शरीरास सामवेदाच्या कर्माचे सप्तदशस्तोम कल्पिले आहेत वा० स० अ० १४ मं० २९ पै० भाष्य म० सप्तदशभिः। दशपाद्या अंगुलय श्चत्वार्यूर्व ष्ठीवानि द्वे प्रतिष्ठे यदवाङ्नाभे स्तत्सप्तदश मितिश्रुतेः सामप्राणं प्रापद्येतिश्रुतेः) भावार्थ सप्तदशस्तोम. ते असे कीं, उभय पादांचीं अंगुलें १० व जानुपर्यंतचे भाग २ व जानू २ उरू २ आणि तेथून उर्ध्व नाभीपर्यंतचा भाग १ मिळून या सप्तदशसंख्या भागास सप्तदशस्तोम करून या देवतेच्या द्वारें सामवेद प्राणन कर्म चालू केलें. याप्रमाणें तृतीय पीठाचा भाग दाखविला आहे.

अस्तु यथपर्यंत प्रणवांतर्गतच्या त्रयविभागानें त्रिभुवनें व वेदत्रयीची स्थापना जाहली. यापुढें उभय परार्धांत दोन दोन आणि मध्यवर्ति एक अशा पांच विभागी ते स्थानावर कर्मदेवतेचें अधिवासन केलें आहे.

( पद्मोत्तरभागे वेदरहस्ये )

॥ आधारस्तु चतुर्दले रुणरुचिर्वासांतवर्णाश्रयं स्वाधिष्ठानमनेक-
विद्युतनिभं बालांतषट्पत्रगं ॥ रक्ताभं मणिपूरकं दशदलं
डाद्यंतु फारांतगं पत्रैर्द्वादशभिस्त्वनाहतपुरे स्थेमकंठान्वितं ॥१॥
मात्राषोडशपद्मपत्रसहितं ज्योतिर्विशुद्धांबुजं हंक्षंत्यक्षरपद्मपत्र-
सहितमुक्ताह्यमाज्ञापुरं ॥ तस्मादूर्ध्वमधोमुखं विकसितं पद्मं
सहस्त्रच्छदं नित्यानंदमयं सदाशिवपुरीं संचिंतयेभासुरं ॥ २ ॥

ते असे कीं, प्रथम प्रणवरूप विराट पुरुषाच्या उभारणीस ऊर्ध्वारोहणाचें साधन जो उदान वायू त्या कंठस्थानीं जीवदेवतेच्या जिवलग स्वरदेवता जीवास अवलंबून षोडश संख्येनें वास करतात. या मूळ शब्दाचा अपभ्रंश होऊन तूर्त जगामध्यें जिवलग सोयरा असा शब्द चालू आहे.

या षोडश संख्या स्वरानें ह्मणजे अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः या अक्षरानें कंठस्थानीं जीवदेवतेस वेष्टन करून हे प्रणवांश स्वर सर्वत्र व्यापक व सर्वांचें एकच कर्म जाणून सर्व मिळून एक देवता मानली आहे.

तसेच द्वितीय हृदयस्थानीं शिवदेवतेस वेष्टन करून द्वादशसंख्या व्यंजनाभिधानानें हृदयकमळाच्या वरपासून आरंभानें व सव्यप्रदक्षणा क्रमानें क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ हीं द्वादशाक्षरें आहेत.

तद्वतच पुढें मध्यवर्ती नाभीपाशीं तृतीय स्थानीं विष्णुदेवतेस वेष्टित ड, ढ, ण, त, थ, द, ध. न, प, फ हीं दशाक्षरें आहेत.

त्यापुढें उपस्थानीं चतुर्थ भागावर ब्रह्मदेवास वेष्टित ब, भ, म, य, र, ल, हीं षडाक्षरें आहेत.

त्याप्रमाणेंच पंचम भाग गुदाश्रित गणपती देवतेस वेष्टित व, श, ष, स हीं चार अक्षरें आहेत.

या शिवाय ह, क्ष या दोन देवता ब्रह्मस्थानीं प्रतिष्ठित केल्यात.

याप्रमाणें हीं ३२ अक्षरें व प्रणवांश षोडश स्वर मिळून एक अशीं ३३ अक्षरें त्याच ३३ यज्ञदेवता या पंचस्थानीं प्रतिष्ठित केल्या व त्या देवताद्वारें बाह्यांभ्यंतरिक्षांतील अखिल कर्में चालू केलीं आहेत. ह्मणजे शरिरांतील प्राणाग्नि होत्रादि अखिल कर्मे जशीं होत आहेत तशींच आणि त्या प्रत्यंतरानें ब्रह्मांडांतील वेदचतुष्टय ब्राह्मणाची अग्निहोत्रादि अखिल कर्में होतात.

एवढेंच नाहीं या देवतेंच्या द्वारां बालकाच्या लिपीपासून राज्यकारभारादि अखिल व्यापार चालू आहेत.

याप्रमाणें षोडशस्वर व क पासून क्ष पर्यंत व्यंजनें सप्रमाण देवतारूपानें वेद पुरुषाच्या अंतर्गत आहेत तसें ळ अक्षराविषयीं कोठें प्रमाण नसून व वेद पुरुषाच्या अंतर्गत नसतां आमच्या लिपींत व भाषेंत हें अक्षर अलीकडे सूत्रकारांनीं कोणत्या प्रमाणानें आणिलें याचा शोध अद्यापि लागला नाहीं. अस्तु या देवतेंच्या द्वारें हा विषय अजपा गायत्रीच्या व भूतशुद्धीच्या मार्गानें या अंतरबहिर मात्रका असल्याविषयीं सप्रमाण विद्वानांस माहीत आहेत तथापि तीं अक्षरेंच कर्मदेवता आहेत अशाविषयींचें प्रमाण दाखविलें पाहिजे.

( गीता अ० १५ श्लो० १८ )

॥ क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोक्षरमुच्यते ॥

जो भाग पृथिव्यादि पंचभूतांश देवतेपासून आहे तो क्षर ह्मणजे नष्ट होणारा आणि जो कधींही नष्ट होणारा नसून सृष्टयपरंपरा रहाणारा तो देवता भाग त्यास अक्षर ह्मटलें आहे.

( तथाच ऐ० अ० २ अ० २ खं० १० श्रुति )

॥ सर्वेभ्यो भूतेभ्यःक्षरति नचैनमतिक्षरंति तस्मादक्ष रंतस्मादक्षरमित्या

॥ चक्षते एतमेवसंततावाएत्तासर्वे वेदा सर्वे घोषा एकैयव्याहृतिः

॥ प्राण एव प्राणऋच इत्याच क्षतेतिश्रुतेः ॥

या अश्वलायन श्रुतीनें गीतेपेक्षां उघड करून विशेष इतकें सांगितलें आहे कीं, अक्षर संज्ञेकरून देवतारूपानें अखिल वेद व मंत्रादि गानवाचनादि घोषही अक्षरेंच असून त्या सर्वाक्षरांचें संपुष्ट एकच प्राणरूप प्रणवाक्षर ओं हा अक्षर ब्रह्म आहे.

( ऋ० ब्रां० पं० २ अ०२ खं०१८ श्रुतिः )

॥त्रयस्त्रिंशद्वैदेवाः सोमपास्त्रयस्त्रिंशदसोमपा अष्टौ वस-
व एकादशरुद्रा द्वादशादित्या प्रजापतिश्च वषट्का-
रश्चैतेदेवाः॥१८॥ (३३) अष्टवसू ८ एकादशरुद्र ११ द्वादशा-
दित्य १२ प्रजापति १, वषट्कार १, एकूण तेहतीस या यज्ञ देवता.

श्रौतस्मार्तादि यजन जनांची व्यवसायादि अखिल कर्मे करितात असा श्रुत्यभिप्राय आहे.

त्या देवतेच्या अधिष्ठानार्थ देवतपासून अंगउपांगादिलोमरंध्रापर्यंत प्रत्येक देवतेच्या कोटि कोटि संख्येनें जगांत परिभाषा चालू आहे कीं, या ब्रह्मांडांत तेहतीस कोटि देवता आहेत. पहा शब्द किती सरवोल आणि ब्रम्हापर आहेत ते? यांत शरीराच्या प्रत्यंतरानें श्रौतादि ब्रम्ह कर्मे, व बाह्य व्यवसायी कर्मे अर्थात देवतेच्या द्वारा होतात म्हणून श्रुत्यभिप्राय आहे. त्यापैकीं ब्राह्मणांच्या यज्ञ कर्मांच्या देवता याच असल्या विषयीं ब्राह्मण जाणत असून शरीरांतील प्रत्यंतरानेंच बाह्य कर्मे असल्या विषयीं दिग्दर्शन केलें गेलें आहे.

आतां व्यवसाय दाखविणें राहिला आहे (त्यापैकीं प्रथम परिभाषा प्राकृत भाषा) प्राक् शब्दानें सृष्ट्यारंभीची भाषा आहे (गोवर्धनाचार्य) वाणी प्राकृत समुचित रसा बलेनैव संस्कृतिनीता ॥ पाणिनी-यादि ऋषींनीं प्राकृत वाणीस व्याकरणादि संस्कारानें व नाना प्रकारच्या रसानें संस्कृतांत मंडीत केली. परंतु प्रथमची प्राकृत भाषा आहे. यापुढें (देवलिपी) आमच्या बालबोध लिपीस देव लिपी ह्मणतात. अर्थात देवता रूप ही लिपी आहे. ह्मणजे स्वयंभू प्रणवांतर्गत हीं अक्षरें देवतारूपानें सृष्टींत आलीं आहेत तीं अक्षरें आपण मुलांस प्रबोध करितो ह्मणून त्या लिपीस बालबोध आणि देव लिपी ह्मणतात पहा! हें ही भाषण किती सरवोल वेदाविहित ब्रह्मास अनुसरून आहेते!

बरें मुलांस बोध करते वेळीं लिपीच्या आरंभी प्रथम मंगलाचरणी (ॐ नमः सिध्धं) या शब्दांत वृत्ते गैरसमजुतीनें अपभ्रंश होऊन त्या जागीं पंतोजी (ॐ ना मा सी ध) अशा अक्षरांचा मुलांस बोध करितात.

या बोधांत सर्वाद्य सृष्ट्यारंभी जो ब्रम्ह पुरूष उत्पन्न जाहला त्या ब्रम्हास प्रथम नमस्कार करून नंतर तदंतर गत वास करणाऱ्या अक्षररूप देवतेचा अलोट करावयाचा असा सदैव परिपाठ आहे. आणि जरीपुढील कर्म देवतेच्या अभ्यासांत काल जाऊ लागला तरी आरंभीच्या ब्रम्हाचें विस्मरण नहोतां पदोपदीं ब्रम्हाक्षरांचा उच्चार होण्या करितां व ब्रम्हाच्या अलोटा करितां आमची भाषाच ब्रम्ह रूप करून ठेविली आहे. लिपी पैकीं विचारण्याचें कारण लागल्यास तो बालक सांगणारास (पंतोजी) पंतोजी ह्मणून हाक मारितो पंतोजी ह्मणजे अद्य ॐ कारस्थानीं त्यास मानून पंत विशेषणानें (पंत ॐजी) अशी हाक मारितो. पंतोजीनें मुलांस हाक मारली असतां (ॐ) उच्चार करितो. यावरून अखिल भाषा-ब्रम्हास अनुसरून आहे. ब्रम्हास सोडून एक अक्षर निरर्थक नाहीं.

यापुढें अक्षरांचें कर्म उदित करावयाचें तें जग प्रसिध्द आहे. तथापि कलावंतों कीं जीं अक्षरें अंतरगत

आहेत तींच पाठ करून त्या प्रत्येक अक्षरांची स्वरव्यंजनाच्या संयोगानें बाराबारा अक्षरें मिळून बाराक्षरी-अभिधान प्राप्त जाहलें आहे. त्याचा अपभ्रंश होऊन बाराखडी अशी परिभाषा चालू आहे.

या संयोगात बाराक्षरें करण्याचें प्रमाण शरीरांतील स्वरापैकीं ऋ ॠ ऌ ॡ हे च्यार नियोग वर्ज करून बारांच्या संयोगानें बाराक्षरी जाहली. तसेंच एका पासून नवा पर्यंत अंक अथवा दशम शून्य. तेंही-ब्रम्हरंध्र चिन्हाकार इंद्रियां प्रमाणें आहे.

तद्वतच एकावर शून्य देण्याचें कारण एक शून्य संख्या, एकावर दोन शून्य संख्या समजण्यास दोहोंवर शून्य द्यावयाचें. शून्याकृती ब्रम्हरंध्र आहे. या प्रमाणें अक्षरें व अक्षरांच्या बाराक्षऱ्या व अंक-साधन शारीरकांतील अत्यंतरानेंच बाह्य ब्रंम्हांडांत वर्तत आहेत. याचप्रमाणें त्रिगुणात्मक अक्षर देवता लिपी रूपानें अखिल व्यापार करितात. पहा! लिपी पासून वैदिक, शास्त्री, पंडित, वैयाकर्ण, न्यायमिमांसक, वेदांती आदिकरून योग्यतेस येऊन अखेर मोक्षादिकांचें साधनही याच साधनानें घडत आहे. तसेंच राजकीय अखिल कर्मे, व व्यापारादि अखिल व्यवसाय लिपीच्या साधनानें होत आहेत. येथ पर्यंत प्रणवांतर्गतच्या पंच विभागानें बाह्याभ्यंतरांतील कर्म देवतत्वें अधिवासन जाहलें.

त्या मुक्त शरीर रूप मापकयास मूळ आणि मुख्य सात छंदांचीं आच्छादनें कल्पिलीं आहेत.

## ( पिंगल छंदसूत्रें नाग श्रुतिः )

**गायत्र्युष्णिक् नुष्टुप्च बृहती पंक्तिरेवच ॥ त्रिष्टुप्**
**च जगती छंद सप्त छंदांसितानिह ॥**

गायत्री छंद १, उष्णिक छंद २, अनुष्टुप् छंद ३, बृहती छंद ४, पंक्तीछंद ५, त्रिष्टुप छंद ६, जगती छंद ७ हे सप्त छंद मुख्य मानले आहेत.

याला मुख्य मानण्याचें कारण या छंदानें विराट पुरुषाच्या शरीरास आच्छादनरूप वेष्टणें असल्यामुळें वेदांत गणले जाऊन मुख्यत्व प्राप्त जाहलें.

## ( भा० स्कं० ३ अ० १२ श्लोक ४५ । ४६ । )

**तस्योष्णिगासिल्लोमभ्यो गायत्री चत्वचो विभोः ॥**
**त्रिष्टुप् मांसास्नुतो नुष्टुप् जगत्यस्थि प्रजापतेः**
**॥४५॥ मज्जायाः पंक्तिरुत्पन्ना बृहती प्राण तो भ-**
**वत् ॥ स्पर्शस्तस्य भवज्जीवः स्वरोदेह उदा-**
**हृतः ॥ ४६ ॥ सुगमं ॥**

( तथाच ऋ० अ० ७ अ० १ वं० ६ श्रुतिः )

## तस्योष्णिग्लोमानि त्वग्गायत्री त्रिष्टुप् मांस मनुष्टप् स्नावान्यास्थि जगती पंक्ति र्मज्जा प्राणो बृहतीति. श्रुतेः ॥

उष्णिक छंद शरीरावरील केश, व गायत्री छंद शरीराची त्वचा ह्मणजे चर्म, व त्रिष्टुप छंद मदंतर्गत मांस, अनुष्टुप छंद स्नायु, जगती छंद अस्थि, पंक्ती छंद मज्जा या रूपानें शरीरास परिघ असून त्या अखिल पदार्थांतून चैतन्य रूप प्राण बृहती छंदानें प्रसारित जाहला आहे.

शरीरास छंदाच्या साह्या मुळें अंतर्गतच्या कर्म देवतेच्या कर्मांत उत्पन्न जाहलेलें रसरूप तेज प्राप्त होऊन हे छंद सरस, सतेज जाहले. याशिवाय या छंदास देव १ असुर २ प्राजापत्य ३ या त्रिविध देवतेंच्या तत्वांच्या संमीलनानें अत्यंत महत्व प्राप्त जाहलें. येवढेंच नाहीं. या छंदात वेदाचें मलन जाहल्यानें हे छंद वेद रूप जाहले गेले. हा छंद विस्तार चक्षुषी प्रबंधांत विवेचन केल्या मुळें येथें संमिलना पुरतें दिग्दर्शन केलें आहे.

## ( छंदाचें कोष्टक. )

| छंदांचीं नांवें. | गायत्रीछंद १ | उष्णिकछंद २ | अनुष्टुप्छंद ३ | बृहतीछंद. ४ | पंक्तीछंद. ५ | त्रिष्टुपछंद. ६ | जगतीछंद. ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऋषिगायत्रीछंद. | २४ | २८ | ३२ | ३६ | ४० | ४४ | ४८ |
| यजु छंद. | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| सामछंद. | १२ | १४ | १६ | १८ | २० | २२ | २४ |
| ऋग्छंद. | १८ | २१ | २४ | २७ | ३० | ३३ | ३६ |
| ब्राम्हीछंद. | ३६ | ४२ | ४८ | ५४ | ६० | ६६ | ७२ |

# ॥ पिंगल छंद सूत्र भाष्य. ॥

## तत्पादो यजुषां छंदः साम्नां तु द्वा-
## ऋचा त्रयः ॥

## ॥ हें कोष्टक पाहण्याची रीत. ॥

प्रथम कोष्टकांत मुख्य सात छंदांचीं क्रमानें नांवें लिहिलीं तीं पहावीं.

द्वितीय कोष्टकांत प्रत्येक छंदाच्या क्रमानें त्यात्या छंदातील अक्षर संख्येचे अंकडे लिहिले आहेत.

तिसरें कोष्टकांत यजु छंदाच्या नियमाचे अंकडे आहेत त्या नियमानें प्रत्येक छंदाच्या मंत्रारंभीचा प्रथम चरण यजुः छंद होत आहे. तद्वत द्वितीय चरणास साम छंद, आणि तृतीय चरणास ऋग्छंद असून त्यात्या वेदाच्या अभिधाना पुढें त्यांच्या अक्षर संख्येचे अंकडे आहेत.

त्या प्रमाणें कोणत्याही वेदाच्या प्रत्येक मंत्रांत यजु, साम, आणि ऋक या क्रमानें वेद त्रय छंदाच्या मेलनानें या सप्त छंदास वेदत्व आलें आहे.

प्रणव रूप शरीराच्या सापळ्यास या सप्त छंदांचीं हीं अशीं आच्छादनें असेलीं दर्शित केलीं.

## (भा० स्कं० ४ अ० २४ )

## सप्तोपरि कृता द्वारः पुरस्तस्यास्तु-
## द्वे अधः ॥ पृथक विषय गत्यर्थं त-
## स्यायकश्चनेश्वरः ॥ ४५ ॥

**टि०** ॥ द्वाराणि नवद्वार प्रदर्शन पूर्वकं जाग्रदवस्थां प्रपंच यति ॥ सप्तेति यावदध्याय-समाप्ति ॥ तस्याः पुरे उपरी कृताः द्वार सप्त वृताइति ॥ पाठे संवृताः ॥ नेत्रे नासिके श्रोत्रे मुखं चेति सप्त ॥ अधो द्वे द्वारौ गुद लिंगोपः कश्चनेति ॥ आत्मनः आत्मनः संपदा विज्ञाना दनियतत्वात् ॥ ४५ ॥

नें जर्सानिराज गाहंकार कार्याणींद्रियाणि: श्रोत्र त्वक् चक्षुर्जिव्हा घ्राण पाणि पादपायु गुह्यान्यधस्थानि: देवार्दधिशतारः दिग्वातार्क प्रचेताश्विनन्ही द्रोपद मित्र प्रजापतयो दशेन्द्रुषयत्र गंवर्धन ॥ मनोनक- र्ण मनो बुध्यहंकार चित्ताख्य चतुर्विन्तिं तदभिशर श्चंद्र ब्रम्ह रुद्र क्षेत्रज्ञाख्या देवाचिकारिका: सात्विका: इति श्रुति व्याख्याया कारिकः। म्हणून

शरीराच्या धारणाकाळीं अंतर्देवतेंच्या किंवा आत्याच्या कर्मा करितां दशेंद्रियाभिधानानें- ऊर्ध्व मूख १ नाशीक २ नेत्र २ श्रोत्र २ ब्रम्ह १ अशी अष्टव अधो गुदो पस्थ २ या प्रमाणें दश रं- ध्रे मंडीत शराराचा उभारणी जाहली. (ज्ञानेश्वरानें तीनपांच सात दशकाचा मेळ ) असा हरिपा- ठांत अभंग लिहिला आहे. त्याचा अर्थ या विवेचनानें उघड समजूनआंत **योवायुः प्राणनामा- सौमुखे गच्छति देहधृक् इतिवाभट्टः** ) तसाच वेदचतुष्टयांत वर्नन असलेला मंत्र ( **प्रा- कोहदेव॰ सर्वतो मुख**: ) ही शरीराची अचेतन मूर्ति तयार जाहल्यावर पश्चात शुक्ल यजुर्वे- दाच्या चैतन्य रूप प्राणवायू देवतेची मुख द्वारें शरीरांत प्राण प्रतिष्टा होती ; त्या वायूचा अखिल व्या- पार हा मुख द्वारेंच चालू आहे. याप्रमाणें पुरुषोत्पत्ती जाहली आहे. असा या स्थलीं थोडा विचार करा कीं, आपण या प्रणव रूप विराट पुरुषांच्या ब्रम्हांडाचें यथाशक्त्या शोधन केलें त्यात कोणापा- सून कोण उत्पन्न जाहला ! किंवा प्रथम अमूक उत्पन्न होऊन पुढें दुसरा जाहला असें तर कां- हींच दिसून आलें नाहीं. सर्व वेदांसह, व सर्व देवतेसह आणि श्रौतस्मार्तादि बाह्य व्यवसायी- कर्मासह एक समयावच्छेदें करून एकाच काळांत प्रणव रूप विराट पुरुषाची उभारणी स्वगट स्वयंभू जाह- ली असें दिसून आलें.

तसेंच त्या पुरुषाच्या अंतरंगतेनें जे वेद व स्तोम छंद आहेत ते च मंत्र रूपानें बाह्य वर्तत असु- न त्या स्तोम मंत्राच्या क्रम प्रमाणाची ( **स्तोमश्च यजुश्च ऋक्च सामच बृहच्च रथं- तरंच** ) अशी श्रुति आहे.

या श्रुतिनें ऋग्वेद सोडून प्रथम यजुर्वेदा पासून क्रम दाखविला. याचें योग्य कारण उ- घड आहे कीं, ( **सर्वेषु गात्रेषु शिर प्रधानं** ) या न्यायानें ( **यजुरेवसिर- इतितैतिरीयश्रुतिः** ) प्रणव पुरुषानें शीर यजुर्वेद असल्या मुळे स्तोम क्रमांत प्रथमस्थानें यजु- र्वेदाचा उच्चार केला.

एवढेंच नाहीं. या न्यायानें अखिल देवतेंचा क्रम दाखविला आहे. पहा प्रथम अंतर्गतच्या अ- क्षर देवता क्रम तर अबाल वृद्धाला माहीत आहे.

कारण मुलाच्या लिहिण्या पासून अश्वमेध नरमेध यज्ञा पर्यंतच्या साधनास यजुर्वेद स्थान- च्या ( अ आ ) स्वर, व ( क ख ) व्यंजनें, या आरंभीच्या अक्षर देवतेनें त्रीपीस आरं- भ होतो. तसा मध्य स्थानच्या ( ड फा ) क्षरानें आरंभ होत नाहीं. हें जगतास माहीत आहे. तद्वतच प्रत्येक वेद मंत्रांतील छंद क्रमांतही यजुः छंदा पासून च वेद चतुःष्टयांतील मंत्रारंभ होतो. हें छंद शास्त्र सर्वच जाणणारे नाहींत सबब सर्वांसा: लक्षांत येण्या सारखें थोडें या-

विषयानें विवेचन करतों.

पहा कोणत्याही वेदांतील कोणत्याही मंत्रांत क्रमानें यजू साम ऋक छंद आहेत. तसेंच-क्रमानें कोणत्याही वेदाच्या कोणत्याही मंत्रांत यजू १ साम २ ऋक् ३ नावाचें मंत्रही आहेत. या समजुती करितां (छंद हेच मंत्र) समजून पुढील विचार मनांत आणा.

मंत्राच्या आरंभीं यजुः छंद येतो असें छंद शास्त्रानें सिध्द केलें. याचें कारण यजुः छंद-हा कोणत्याही मंत्राचा प्रथम चरण ठरला गेला. तस्मात मंत्राच्या चतुर्थांशानें यजुः छंदाच्या-अक्षर संख्येची पूर्तता जाहली असें सहज लक्षांत येतें. तशी चतुर्थांशाच्या अक्षरानें ऋक् छंदाची पूर्तता होत नाहीं.

ऋक् छंद हा कोणत्याही मंत्राच्या तीनचरणापर्यंत असा विस्तीर्ण असल्या मुळें मंत्राचे तीन भाग उच्चारले जातील. तेव्हां ऋक् छंदाची पूर्तता होणार आहे. या कारणानें ऋक् छंदास प्रथमत्व देण्यास छंद शास्त्रास मार्ग राहिला नाहीं. सबब प्रथम यजू १ साम २ ऋक् ३ या क्रमानें ज्याज्या छंदाची पूर्तता होत गेली, त्या क्रमानें व त्या पूर्ततेनें यजू साम ऋक छंद क्रम सिद्ध केला आहे.

या प्रमाणास मंत्राचें प्रत्यंतर पहा ! आणि मनांत समजून घ्या कीं; **(यज) इषेत्वा) (उर्जेत्वा) (पवित्रेस्थो वैष्णव्यो) (विशि राजा प्रतिष्टित) अथवा (अग्निमीळे पुरोहितं)** या रीतीनें यजू मंत्र असल्या विषयीं सर्वानुक्रम व भाष्यें आणि सूत्र प्रयोगादि प्रमाणें असून शिवाय श्रौतस्मार्त कर्मांत या मंत्राचा असा मंत्रोच्चार होतो, हें गृहस्थ भिक्षुकांस माहीत आहे.

या प्रमाणें २।३।४।५।६। अक्षरांतच यजु मंत्राची पूर्तता होती तशी ऋकमंत्राची होत नाहीं. ऋक् मंत्रांत संपूर्ण ऋचा उच्चारल्या शिवाय ऋक मंत्राची पूर्तता होत-नाहीं. असा मंत्राक्षरांत ही ऋक् मंत्राचा विस्तार असल्या मुळें कोणत्याहि वेदांतील कोणत्याहि मंत्रारंभीं प्रथमयजुः छंद, व पुढें सामछंद, आणि मागाहून ऋक् छंद व ऋक् मंत्रारंभ आहे.

या प्रमाणें हा विषय असलेला लक्षपूर्वक समजून घेतला म्हणजे मनांत येईल कीं, छंद शास्त्रानें प्रथम यजू, व माहून साम, ऋक् या क्रमानें जी योजना केली ती यथार्थ आहे.

हे किरकोळ देवतेचे विचार बाजूस ठेऊन वेदाच्या मुख्य चक्षुषी देवतेचा जरी विचार केला तरी तोहि याच न्यायानें दृश्य होतो. तथापि चक्षुषी मुख्य वेद देवता ठरल्या त त्या देवतेचा-विचार करणें युक्त असून ऋग्वेदाची मुख्य चक्षुषी अग्निदेवता, व यजुर्वेदाची इंद्र देवता सर्वांसविदित जाहल्या आहेत त्या इंद्राग्नि देवतेंत पिता पुत्राचें नातें नैरुक्त श्रुतिनें संदिग्ध दाखविलें आहे. तस्मांत या देवतेच्या विचारांत प्रथमत्वा सह पिता पुत्राच्या नात्याची ही प्रसिध्दी होणार आहे.

## (अग्निर्वै देवानां प्रथमा इति श्रुतेः)

सर्व देवते पूर्वी अग्नि प्रथम आहे असा श्रुत्यर्थ दिसतो. तरी कोणा पासून कधीं जाहला ही शंका परिहार केला नाहीं.

## (मुखादिंद्रश्चाग्निश्च इतिश्रुतः)

ही विराट वर्णनाची पुरुष सुक्त ऋग्वेद श्रुति कथन करिती कीं, विराट् पुरुषाच्या मुखांतून प्रथमयजुर्वेदाची इंद्र देवता व मागाहून ऋग्वेदाग्नी उत्पन्न जाहला.

वरील आणि या श्रुक श्रुतींत द्वैकां असावी १ हा प्रथम विचार केला पाहिजे.

(**अग्निर्वै देवानां**) प्रथमा ही यजुःश्रुति असून या श्रुत्यज्ञेवरून यजुर्वेदी ब्राह्मण स्वकर्मांत अग्निचा आदर पूर्वक असा सन्मान ठेवितात कीं, कोणत्याही शांतीक, पौष्टीक, यज्ञकर्मांत प्रथम अग्नी स्थापन करून नंतर अन्य देवता स्थापन करितात.

तसेंच श्रौतादि कर्मांत प्रथम मंथनाग्नी उत्पन्न जाहल्या नंतर अखिल यज्ञ कर्म चालू होतें हें श्रौत, स्मार्त, जाणता विद्वानास माहित आहे.

असें श्रुत्युक्त कर्म किंवा अग्निचा सन्मान अन्य कोणत्याही शाखेत होत नाहीं. हें बाजूस ठेवून ज्या वेदाची मुख्य आधिष्टित चक्षुषी अग्नि देवता आहे, त्या अश्वलायन शाखेत सुद्धा अग्नीचा आदर सन्मान होत नसून अन्य देवता स्थापन जाहल्या नंतर, अग्नी स्थापन करितात. हें जगजग प्रसिध्द आहे.

या कर्म शास्त्रार्थ श्रुतिनें प्रथम अग्नि उत्पन्न जाहला असें दिसून आलें. परंतु ही अग्नीची उत्पत्ती कर्म संबंधी तात्कालिक कारणा पुरती सांगितली. आणि ऋग्वेद श्रुतिचें कथन मध्यवर्तीचें नसून ब्रह्मांडाद्य जो विराट पुरुष विराजमान जाहला. त्या वर्णनाच्या पुरुष सुक्तांतील देवतोत्पत्ती दर्शविणारी ही श्रुती इंद्राग्नी देवतेच्या जन्मस्थानासह क्रमाची पत्रिका वाचीत आहे.

या प्रत्यंतरास प्रमाण पहा. आपण सर्व ब्राह्मण तर एकच आहोंत परंतु ज्या वेदाचा जो उपासक ठरला गेला, त्या वेदांची नांवें त्या त्या ब्राह्मणास प्राप्त होऊन ऋग्वेदी १ यजुर्वेदी २ सामवेदी ३ अथर्व वेदी ४ असे वेद चतुःष्टय अभिधानांनें भेद पावले.

तसेंच देवतेच्या भेदानें व कर्मानें वेदास अभिधानें व अधिकार प्राप्त जाहले. त्या देवतेच्या आधिकारानें कर्म दिशा परत्वें यज्ञांतील द्वारें आदिकरून क्रमानें यज्ञ कर्मे चालू आहेत.

त्या कर्मा कडे लक्ष पोहोंचवा कीं, अखिल दिशेंत पूर्व दिशा प्रथमत्वानें आपण मानितों वतीऔंद्य आहेच. त्या अग्र दिशेला यज्ञ संबंधीच्या द्वारक्रमांत अग्र ऋग्वेदाचा अधिकार असल्या प्रमाणें पूर्व द्वारच्या ऋत्वीजाचा अधिकार ऋग्वेदास प्राप्त होऊन यज्ञ कर्मे चालू आहेत.

आता जर प्रथम अग्नि उत्पन्न जाहला असता, तर प्रथमत्वानें अग्र ऋग्वेदाच्या पूर्व दिशेस

स्थापन जाहला असतां. तसें नसून कोणत्याही ब्राह्मणांच्या कोणत्याही कर्मात दिक्पाल देवतेच्या स्थापनेंत प्रथम पूर्व दिशेस इंद्राची स्थापना जाहल्या नंतर मागाहून द्वितिय स्थानी आग्नेय कोनांत अग्नीची स्थापना करितात. याचें कारण ऋग्वेद श्रुति होय. या श्रुतिनें प्रथम इंद्र आणि मागाहून अग्नि उत्पन्न जाहल्याचें कथन केलें तें सर्वथैव खरें आहे. ही माहिती याज्ञिकी ब्राह्मणा वाचून अन्यास नाहीं. या कारणानें अबाल वृध्द गृहस्थ भिक्षुकास माहित असलेलें, आणि नित्य कर्मातील स्मरण देतो, म्हणजे सर्वांच्या लक्षांत येईल.

प्रातर्माध्यान्ह आणि सायान्ह संध्या शास्त्रानें आपणास सांगितली आहे. त्या पैकीं, निदान प्रातः साय संध्या तरी करणार आपण आहोत. त्या संध्या कर्मातीं दिक्पाल देवतेस नमस्कार करण्याची वहिवाट शास्त्रा प्रमाणें चतुः शाखेंत चालू आहे.

त्या नमस्कारात प्रथम पूर्व दिशेस प्राच्यैदिशे इंद्रायनमः नंतर अग्नये दिशे अग्नयेनमः असा नमस्कार करीत असता. याचें स्मरण करा म्हणजे प्रथम यजुर्वेदाची चक्षुषी इंद्र देवता उत्पन्न जाहली व मागाहून ऋग्वेदाची चक्षुषी अग्नि देवता उत्पन्न जाहली हें सर्वांच्या लक्षात येईल.

(नै० पू० अ० २ खंड २२ - )

देवानान्निर्माणे प्रथमा अतिष्टन्मध्यमिका
देव गणाः प्रथम इति मुख्य नाम प्रतमो भ-
वति कृंतन्न मंतरिक्षं विकर्तनं मेघा नां-
विकर्तनेन मेघाना मुदकं जायते त्रयस्त्त
पतिष्ट थिवी मनू पाः पर्जन्यो वायुरा-
दित्यः शीतोष्णा वर्षे रोषधीः नापि०

॥२२॥

तात्पर्य देवता क्रमांत (माध्यमिका देवगणाः प्रथमा इति मुख्य नाम) सहलें आहे. यावरून स्थान क्रमांत माध्यमिक स्थान यजुर्वेदाचें अंतरिक्ष आहे. व वेदत्रय क्रमांत माध्यमिक यजुर्वेद आहे त्या यजुर्वेदांतील शाखा क्रमांत माध्यमिक माध्यंदिन शाखा आहे.

या प्रमाणें जे गाधभिच ह्मणावेंतात त्यांच्या ज्या मुख्य चक्षुर्पी यजुर्वेद देवता आहेत त्या या अंतरिक्षांत व्यापार करितात त्यास मुख्य व प्रथम देवता ह्मटलें आहे त्यास मुख्य म्हणण्याचें योग्य कारण असें दाखविलें आहेकीं, पर्जन्यानें वृष्टी करून अन्नोत्पादनानें जंतुमात्राचें जीवन करणारा प्रथमइंद्र-ज्ञातान गुरदाता वायू ५ व उष्णतेनें ऋतुभेदादिकालक्रमण करणारा आदित्य आत्मा ९ या त्रय-देवता पृथिवीस पोषणादिकें करून सर्वपरी आधारभूत आहेत, सबब त्यास प्रथम व मुख्य ह्मटलें आहे.

असें या श्रुति बलवत्तर प्रमाण। थोरें नैरुक्त श्रुतिनें इंद्राग्नित पिता पुत्रांचें नातें दाखविलें असावें. कारण या देवता मुखांतून उत्पन्न जाहल्या आहेत. याजवरून आपल्या स्वतःच्या मुखाचा विचार करावा कीं, आपलें मुख कोठें आहे ? तर नाभीच्या ऊर्ध्व मस्तका पर्यंतच्या पोकळींत मुख नासीक नेत्र श्रोत्रादि छिद्रें आहेत.

तसेंच विराट पुरुषाचें मुख असावयाचें. विराटाची नाभी ही पृथिवी नेमिली गेली त्या पृथिवीच्या ऊर्ध्व अकाश पर्यंत पोकळीत अंतरीक्षांत मुख व त्या मुखांतून प्रथम इंद्र आणि मागाहून अग्नि उत्पन्न जाहला असा श्रुत्यर्थ आहे. या अंतरिक्षांतील हा इंद्राग्नि पहाल तर (**स्तनइत्नुरेवेंद्रः इतिश्रुतेः**) **स्तनइत्नु र्बलाहकः इत्यमरः** ) या उभय वाक्याधारें अंतरिक्षांतील इंद्र तो मेघ ठरत आहे.

त्या मेघ रूप इद्रास प्रतिवर्षी जेष्ट आषाड मासा पासून आश्विन कार्तिका पर्यंत आपण पहात आहों त्यात आरंभीं मेघरूप अभ्रें उत्पन्न होऊन नंतर त्या मेघा पासून विद्युल्लता रूप अग्नि उत्पन्न होतो. हें प्राणीमात्रास माहीत आहे. तसेंच उभयतांच्या योगानें जसें वृष्टी रूप हित होतें तसें त्या पैकीं एकाच्यानें होतनाहीं. ह्मणून योगाचें हित कर्म वर्णिलें आहे. आणि या क्रमानेंच नैरुक्त श्रुतिनें इंद्राग्नित पिता पुत्रांचें नातें व योगानें हित दाखविलें आहे. तद्वतच वरील भाग नवकारानें विराट हें धाम विष्णूनें आपल्यास केलें, असें लिहिलें तेंही या श्रुतिच्या आधारेंच आहे. ( **इंद्रोवैविष्णुरितिश्रुतेः** ) इंद्र तोच विष्णू त्यानें हें विराटांतर्गत उर्ध्वाधो ऋक्साम विभागानें घर बांधून मध्यवर्ति त्या धामांत इंद्र जो यजुर्वेदाधिप तो नांदत आहे. (**ऋक्सामयोः शिल्पेस्थस्ते इतिश्रुतेः**) या यजुर्वेद देवतेच्या धाम कर्मा वरून प्रस्तुत जगांमध्यें (**भोमे**) आणि (**सोमे**) यजुर्वेदी ब्राह्मणास देवतेच्या कर्म विशेषणानें धाम म्हणतात हें ही प्रत्यंतर श्रवणांत येत आहे.

एथ पर्यंत वेदाच्या मुख चक्षुर्पी देवतेचा विचार केला, त्यांतही ऋग्वेद श्रुत्यात यजुर्वेदाच्या मुख्य चक्षुपी देवतेस मुख्यत्वानें व महत्वानें प्रथमत्वाचें प्रतिपादन करितात. याजवरून यजुर्वेदाच्या देवता प्रथमत्वांत आहेत म्हणणें उचीत आहे.

हा विचार देवतेच्या प्रथमत्वाचा झाला. या पुढें प्रथम वेद कोणास प्राप्त जाहला, हा विचार ही वरील देवतें प्रमाणेंच गोचर होत आहे.

यदा प्रथमतः असलेले ऋग्वेदी ब्राह्मण त्या शाकलाचे देशात असतात व ज्या शाकल्याचार्याचे संहितादि ऋग्वेद ग्रंथ पठण करितात त्या शाकलाला ती ऋग्वेद संहिता प्राप्त होण्या पूर्वी किंवा त्याच्याहि वडिलांच्या पूर्वी ऋग्वेद संहिता ग्रंथ यजुर्वेदाचार्य याज्ञवल्क्यास प्रथम प्राप्त जाहला आहे

(भा० स्कं० १२ अ० ६ श्लोक)

पैलाय संहितामाद्यां बह्वृचाख्यामुवाच ह ॥
वैशंपायनसंज्ञाय निगदाख्यं यजुर्गणं
॥५२॥

॥ टि० ॥ एक समुदाय रूपत्वात बह्वृचाख्या ॥ नितरां अश्लेषेण गद्यमानत्वान्निगदाख्यं ॥५२॥

साम्नां जैमिनये प्रादात् तथाछांदोग्यसंहितां
अथर्वांगिरसीनाम स्वशिष्याय सुमंतवे ॥
॥५३॥

॥टि०॥ छंदः सुगीयमानत्वात् छंदोगाख्यं संहितां ॥ वाक्यार्थ हे व्यासांनीं ऋग्वेद बह्वृच संहिता पैल ऋषीस व निगद यजुर्गण वैशंपायनास व छंदोग्य सामगान जैमिनीस आणि अथर्व संहिता सुमंतुस दिली. ॥

या प्रमाणें चार वेदांच्या चार संहिता चार शिष्यास व्यासांनीं पठण करविल्या.

पैलः स्वां संहितामूचुः इंद्रप्रमितये मुनिः ॥
बाष्कलाय च सोप्याह शिष्येभ्यः संहितां स्व-
कां ॥५४॥

॥ टि० ॥ अत्र ऋग्वेद शाखाविभाग माह ॥ पैल इति स्वसंहितां द्विधा विभज्य ॥ इंद्रप्रमितये बाष्कलाय चऊचे ॥५४॥

चतुर्धा व्यस्य बोध्याय याज्ञवल्क्याय भा-

गैवै ॥ पाराशर्याग्निमात्रे इंद्र प्रमिति रात्म-
वान् ॥५५ ॥

॥ टि० ॥ सबाष्कलोपि संहितांचतुर्धान्यस्य वोध्याय याज्ञवल्क्यादिभ्यः आहेंद्र मार्गव ॥५५॥
या उभय वाक्यांतील तात्पर्य पैलास प्राप्त झाहलेल्या संहितेचा एक भाग वाष्कलास वाकरवतः स्मरु
ठेविला. त्या वाष्कलानी प्राप्त झाहलेल्या संहितेचे चार विभाग करून याज्ञवल्क्यादि च्यार शिष्या-
स पढण केले. त्या पुढें

अध्यापयत्संहितांस्वां मांडुकेय मृषींकविं
तस्य शिष्यो देव मित्रः सौ भर्यादिभ्य उवि-
वान् ॥ ५६ ॥

॥ टि० ॥ इंद्र प्रमति रपिस्वां संहितां स्वसुतं मांडुकेभ्यमध्यापयामास ॥ तस्य मांडुक्यस्य
शिष्यो देव मित्रः ॥ ५६ ॥

शाकल्यस्तत्सुतः स्यात्तु पंच धात्वस्य सं-
हितां ॥ वात्स्य मुद्गल शालीय गोकल्य-
शिशिरेस्व धात् ॥ ५७ ॥

॥ टि० ॥ तत्सुतः मांडुके सुतः ॥ शाकल्यो वात्स्यादिषुन पंचस्वधात् तानध्यापयामासे-
त्यर्थः ॥ ५७ ॥

जातुकर्णश्च तच्छिष्यः सनिरुक्तं स्वसंहि-
तां ॥ बलाकपैं जवताल विरजेभ्यो ददौ-
मुनिः ॥ ५८ ॥

॥ टि० ॥ तच्छिष्यः शाकल्यशिष्यः स्वसंहितांत्रेधा विभज्य चतुर्थं वैदिक पदार्थ व्याख्यान रू-
पं निरुक्तंच कृत्वा बलाकादिभ्य श्चतुर्भ्योददौ ॥ ५८ ॥

बाष्कलीः प्रतिशाखाभ्यो वालखिल्या-
ख्यसंहितां ॥ चक्रे बालायनि र्भुज्यः का-

शाखाश्चैवतांददुः ॥ ५९ ॥

॥ टि० ॥ बाष्कलिः पूर्वोक्तस्य बाष्कलस्य पुत्रः मनिशाख्यः उक्ता एवं शाखाख्यः बालायन्याद-
वस्था माददुः ॥ अर्थानंतरं ॥ ५९ ॥

बव्हृचां संहितां ह्येताणभि ब्रह्मर्षिभिर्धृतः ॥
श्रुत्वैतच्छंदसां व्यासं सर्व पापैः प्रमुच्यते ॥ ६० ॥

॥ टि० ॥ ऋक् शाखा पसंहार पूर्वकं तत् श्रवण फल माह ॥ बव्हृचा इति ॥ एतत् छंदसां एतेषां
संहितां ॥ ६० ॥

या पुढें याज्ञवल्क्यानीं निगद यजुर्गण वैशंपायना पाशीं पठण केलेला वैशंपायनाच्या माग-
ण्यावरून वमन केला. तो ब्राह्मणास अनुचित म्हणून तित्तिरी पक्षानें सेवन करतांच तैत्तिरीय
शाखा जाहली.

याज्ञवल्क्यानीं तत्काल सूर्याराधना करून पंचदश शाखा युक्त अयातयाम शुक्ल यजुर्वेद
सूर्यापासून संपादन केला. या प्रमाणें या स्कंदांतील याच अध्यायांत कथित आहे.

नवम स्कंदांत सामवेदाचार्य जैमिनीचे याज्ञवल्क्य पट्टशिष्यउसल्याचीं वाक्यें आहेत. तात्पर्य
याज्ञवल्क्यानी चारी वेद पठण केले. हीं सर्व वाक्यें येथें घेतल्यास विस्तार होईल जाणू-
न घेतलीं नाहींत.

श्री शंकराचार्यादि विद्यारण्यानी बृहदारण्य भाष्यांत व अश्वलायन ब्राम्हणांत तसेंच बृह-
त् पाराशर स्मृतींत तसें वर्णन आहे. त्यांतून स्मृतिवाक्य येथें घेतलें तें पहावें.

( पाराशरस्मृतिः )

सहस्रांपुरथे तिष्टन् योधीयाय चतुः श्रु-
तिः ॥ याज्ञवल्क्य समीक्षेतत् चीदृशा-
प्रोक्तवानपीति ॥ १ ॥

ऋग्वेद संहितेंतही हा आख्यान कथा भाग आहे.

असो आमचे मागील अवधान मागेंच राहिलें गेलें. पैलास प्रथम ऋग्वेद बव्हृच संहिता प्राप्त
जाहली. त्यांनी बाष्कलास एक व स्वतःला एक असे दोन विभाग केले बाष्कलांनी त्याचे
चार विभाग करून याज्ञवल्क्यादि च्यार शिष्यास पठण केले.

पैलानीं संहिता स्वपुत्र मांडुके यास पठण केली. मांडुके यानीं स्वपुत्र शाकलास पठण केली. शाकलानीं त्याचे पंच विभाग करून पंच शिष्यास पठण केले.

त्याचा शिष्य जातुकर्ण्य त्यानें प्राप्त जाहल्या विभागाचे तीन भाग वेद मंत्र रुपानें केले. ते तीन शिष्यास पठण करविले. आणि एक भाग वेद व्याख्या रूपानें निरुक्त ग्रंथ केला या प्रमाणें बव्हुच संहितेची व शाखेची व्यवस्था भागवत कारानीं केली आहे.

या विवेचनांत पैला पासून बाष्कलानीं जो दाय भाग घेतला आणि याज्ञवल्क्या दिकास दिला. या भागानें शाकलाच्या पूर्वीं याज्ञवल्क्यास ऋग्वेद प्राप्त जाहला आहे. असें पिता पुत्राचें नातें उदय पावल्याने प्रथमच्या नैरुक्त ऋत्पर्थाचें येथें पर्यवसान जाहलें, तसेंच ब्रंम्हांडांतील कर्म देवतेचें विवेचन समाप्त जाहलें म्हणणें यथार्थ आहे.

## प्रकर्ण तिसरें समाप्त:



# प्रकरण ८ प्रारंभः

## श्रीयोगेश्वरोजयती.

अर्थात कर्माच्या पुढें आशीर्वादाचा काल असल्यामुळें आशीर्वाद देवता प्रतिपादन जाहली पाहिजे ह्मणजे आशीर्वाद प्राप्त होणार हें खरें आहे. परंतु प्रणवांतरगत असलेल्या कर्म देवतेच्या विवेचनांत आशीर्वाद देवता गोचर जाहली नाहीं, याजवरून ही देवता ब्रंम्हांडांत नाहीं असें म्हणावें लागत आहे.

यास्तव प्रथम आशीर्वाद देवतेचा शोध करणें युक्त असून ती आशीर्वाद देवता कधीं, कोणापासून, कशी उत्पन्न जाहली ! आणि प्रथम कोणी कशाकरितां आशीर्वाद घेतला ? व त्याचें फल काय जाहलें ? या सहा प्रश्नांचा विचार जाहल्या शिवाय समाधान होणार नाहीं.

## ( बृहदारंण्यश्रुति )

## ॥ आत्मैवेदमग्रमासीत्‌इतिश्रुतिः॥

तात्पर्य प्रलया पूर्वीं अथवा ब्रंह्मांडा पूर्वीं फक्त एक आत्मा ह्मणजे परमात्मा होता. शिवाय कोणी नव्हतें. असा श्रुत्याभिप्राय आहे.

त्या परमात्म्याच्या मनांत अनंत ब्रंम्हांडीं अनेकत्वानें प्रापंचीक संपत्ती सह सृष्ट्य सुखाना इच्छास उत्पन्न होऊन या कार्यार्थ आणि आनंदांत स्वमनो धर्मानें आशीर्वादाची इच्छा तीच देवता उत्पन्न जाहली.

त्या अवकाशात त्या इच्छेप्रमाणें किंवा आशीर्वादानें तत्काल त्या परमात्म्याच्या हृदयाकाशांतून स्वयंभू आणि सर्व वेद व कर्म देवता आदिकरून सृष्ट्य साहित्या सह वर्तमान प्रणवरूप वेद पुरुष ॐ असा ध्वनीं उत्पन्न होऊन, ब्रंम्हांडतर जाहलेंच. परंतु तो परमात्मा स्वयमेव सजीव सदेह असे उत्तम स्वरूप धारण करून एकाचे दोन, दोहोंचे अनेक ( एवानो दूर्वे प्रतनु सह स्वेण शलेनच इति श्रुतेः ) या श्रुति प्रमाणें तनू साररवातनू उत्पन्न करून स्वांशभूत जीव रूपानें अनंत ब्रंम्हांडांत असंख्य प्रजा निर्माण कर्ता जाहला.

याविवेचनास विश्व कर्माभिधानें करून वेद चतुष्टयांत सूक्त आहे. पैकीं शुक्ल यजूच्या (१७) अध्यायांतील मंत्र(१७) आणि ऋग्वेद संहिता अष्टक(८) अध्याय(३) मंत्र(१६) त आहे त्या मंत्रापासून पुढें विश्वोत्पत्तीचे विवेचन असलें मुळें त्या सूक्तास किंवा अनुवाकास विश्वकर्माभिधान दिलें आहे.

या सूक्ताच्या प्रथम मंत्रांत वरील विवेचन असल्यामुळें त्या मंत्राचें दिग्दर्शन करून पुढें त्याचें भाष्य दर्शित करतों. म्हणजे या व्याख्येवर सर्वांची निष्ठा राहील.

## (मंत्र)

## (ःइमाविश्वा भुवनानि)

शाखा परत्वें निरनिराळ्या शीक्षा असल्या मुळें मंत्रांतील प्रथमाक्षरांचा उच्चार अन्य वेदांत (य) होत असून शुक्ल वेदांत (ज) होत आहे. परंतु अर्थ संबंधानें तो (य) घेऊन चालावयाचें आहे

## (महीधर भाष्य)

यःइमाःभुवन पुत्रः विश्वकर्मी वृ
ष्ठा। विश्वकर्मदेवत्या षोडशात्रि
ष्टुभा प्रजाः संहरतं सृजंतं वि
श्व कर्मानं पश्य नृषिः कथयति
।येविश्व कर्मा इमा इमानिविश्वाः
विश्वानि सर्वाणि भुवनानि भू
त जातानि जुव्हान् संहरन्

सन् न्यसीदत् निषंणः स्वयं-
स्थितवान्। कीदृशः ऋषिः अ-
तींद्रिय द्रष्टा सर्वज्ञः होतासंहार
रूपस्य होमकर्ता नोस्माकं प्राणि-
नां पिता जनकः। प्रलयकाले स
र्वलोकान् संहृत्यः यः परमेश्वरः
स्वयनेक एवासी दित्यर्थः। तथा-
चोप निषदः॥ आत्मएवाइदमे-
कएवाग्रः आसीन्नान्यत्किंचन-
मियत्। सदेवसो म्येदमग्र आ-
सीत्। एकमेवा द्वितीय मित्या-
द्याः। सतादृशः परमेश्वरः आ-
शिषाभिलाषेण बहुस्यां प्रजा-
ये येत्येवं रूपेण। पुनः सिसृ
क्षारूपेण द्रविण मिछमानोजे
गद्रूपं धनमपेक्षमाणो वराणा-

भिव्यक्तो पाधीना विवेशे। जीव-
रूपेण प्रविष्टः। कीदृशः प्रथम-
छत् प्रथमं एकमद्वितीयं स्वरू
पं छादयती ति प्रथम छत्। छा
द्यते: क्षिपित्हस्वः उत्कृष्टरूप-
मा वृणवन् सन् प्रविष्टः इच्छमा-
न इति इषेरात्मने पद मार्षं॥
साकामयत बहुस्यां प्रजाये-
यसतपो तप्यतः सतपस्तप्त्वाइ-
दं सर्व मसृजतय दिदं किंचते-
त्सृष्ट्वा तदेवानु माविशदित्या-
दि श्रुतेः॥१७॥

यांतील तात्पर्यार्थ वर नुकताच दर्शविला आहे. परंतु यांत विशेष आनंदकारक व-आश्चर्य मानण्या सारखें जें दिसून येतें तें कळवितों.

जसा येखादा दरिद्री मनुष्यसंपत्ती सुखाद्यभिलाषाच्या तर्कानें मनोराज्याची उभारणी करितो, तद्वतच यांतील भावार्थ दिसून येतो.

पहा परमात्मा येकाकी एकच अनेकत्वाच्या दारिद्र्यांत असतां त्यास अनेकत्वादि संपत्ति सुखाची प्रापंचीक अभिलाष बुध्दि होऊन, त्या सिध्दिस वरप्रदानार्थ मानसीक वेदाशिर्वादाच्या मनो राज्यानें या सृष्ट्यादि असंख्य जीवरूप प्रजेसह ब्रम्हांडाचा -

विभू उभारिता जाहला. असें याजवरून दिसून यते

(ऋ॰ ऐ॰ अ॰ १ अ॰ ३ खं॰ १०)

प्रतिपदी मिमनश्चवाचेभूयात्स
वै त्यस्मिन्कामाश्रिताः सर्वान
न्या कामान्दुहे मनसिवै सर्वे
कामाश्रिता मनसाहि सर्वान्का
मा न्ध्यायति सर्वहास्मिन्कामा
श्रयंते य एवं वेद इतिश्रुतिः॥

तात्पर्य या ऋग्वेद श्रुतिनें असा सिद्धांत कथन केला की. प्रत्येक पदा पदास वा भाषणास किंवा अखिल कर्मास मनाचा आश्रय लागतो मनाश्रया वाचून कोणचेंच कार्य घडत नाहीं

( तथाच शारीरके सत्वा
दियुक्तस्य मनसो गुणानाह)

आस्तिक्यं प्रविभज्य भोजनम
नुतापश्च तथ्यं वचामेधा बुद्धि
र्धृतिक्षमाच करुणा ज्ञानंच नि
र्दंभता॥ कर्मानिंदितमस्टह

श्व विनयो धर्मः सदैवादरा देते
सत्वगुणा न्वितस्य मन भोगीता
गुणाज्ञानिभिः ॥ १ ॥

टि० ॥ आस्तिधर्म मोक्ष परलोकादिक मिति ॥ बुध्याचरती त्यास्तिक स्तस्य भाव आस्तिक्यं ॥ अनुतापः अक्रोधः धृतिः ॥ भूत प्रेत स्मर क्रोध लोभाद्यावेशराहित्यं ॥ ज्ञानं आत्मज्ञानं ॥ निर्दंभना कपट भावः ॥ कर्म अनितं ॥ अस्पृहः निःकामः ॥ शेषं सुगमं ॥ एते सात्विकादयः ॥

(तत्र रजादयः)

क्रोधस्ताडन शीलता च बहुलं
दुःखं सुखे छाधिका दंभःका
मुकताप्यलीक वचनं चाधीर-
ता हंकृतिः ॥ ऐश्वर्याद्य भिमा
न्तातिशयिता नंदोधिकश्चाटनं
प्रख्याता हिरजो गुणेन सहि-
तस्यैते गुणा श्चेतसः ॥ २ ॥

टि० ॥ अलीक वचनं मिथ्या कथनं ॥ अटनं पृथिवी परिभ्रमणं ॥ सेवं सुगमं ॥

(तत्र तमादयः)

नास्तीका सुविषन्न ता तिश-

यिता लस्यंच दुष्टा मतिः प्रीति-
निंदित कर्म शर्मणि सदा निद्रा-
लुता हर्निशं ॥ अज्ञानं किलस-
र्वतोपि सततं क्रोधांधता मूढता-
मख्यातास्तु तमोगुणेन सहित
स्येते गुणाश्चेतसः ॥१॥

टि० ॥ सुगम ॥

( तत्र विचारमाह )

तत्र प्रभूत सत्वस्तु सात्विकः पु-
रुषस्मृतः॥ राजसास्ता मसश्चै-
व त्रिविधस्तेन मानवाः ॥१ ॥
ततो भवन्म हत्तत्वं बुद्धितत्वा-
पराभिधां ॥ त्रिगुणं सत्वबहु-
लं निर्मल स्फटिकोपमं ॥२॥
चिच्छाया प्राप्त चैतन्यं तदिच्छा
मयमीरितं ॥ ततः प्रकृतेः त्रि-

## गुणं त्रयो यत्र गुणा तत ॥ १ ॥

टि० ॥ तत्र सत्व बहुलं अत्राभिप्रायः ॥ यथा निश्चल ह्रदादौ वृहद्द्रव्य पातात्नदीयं जल वर्धते तथा चिद्रुप पुरुषेण क्रमणा त्तुल्य गुणत्रयात्मिकायाः प्रकृतेर्ज्ञान हेतु प्रकाशाः ॥ सत्व गुणो वृध्दः प्रवृध्द सत्व बहुलं बुद्धि तत्वम भवत् ॥ ५ ॥

## महत स्त्रिगुणा जातोः हंकारस्त्रि- गुणान्वितः ॥ सात्विको राजस श्चापितामस श्चेति सत्निधा ॥ १ ॥

टि० ॥ महतः बुध्दितत्वात् ॥ त्रिगुणात त्रयोगुणा यत्वततः ॥ सत्वं त्रिगुणादिति पुन र्विशेषणा दुक्तं सत्व बहुल मिति विशेषण मत्रनानु वर्तते नाहंकारो स्यादकं मह तत्व त्रिगुण मपिरजो बहुलं बोध्दव्य ॥ अहंकारस्य रजो गुणान्वित मन्ये धर्म त्वादहंकारोऽभिमान व्यापार लक्षणः ॥ ७ ॥

(तत्र अहंकार स्त्रिविधस्ता नाह )

## सात्विक इत्यादि ॥ ॥ तस्य- त्रिविधस्य कार्यमाह ॥ जाता- नि सात्विकातस्मादिंद्रियाणि स- राजसात् ॥ तानि श्रोत्रं त्वचा- नेत्रं रसना नासिका तथा ॥ १ ॥

वाग्घस्त चरणो पस्थ गुदाश्चे का-
दशंमनं ॥ पंच बुध्दिंद्रियाण्याहु-
पूर्वोक्ता नीवराणितु ॥ कर्मेंद्रिया-
णि पंचैव कथयंति विषयश्चिन-॥

टि० ॥ बुध्दिंद्रियाणि बुध्देराश्रयत्वात् ॥ कर्मेंद्रियाणि कर्माश्रयत्वात् ॥ सात्विकाहंकारजातत्वा-
दिंद्रियाणि प्रकाश लक्षणानि सत्वस्य प्रकाशकत्वात । ५

मनो बुध्दिंद्रियं विज्ञैः कर्मेंद्रियम-
पिस्मृतं ॥ मनोधिष्ठितमेवेदमिं-
द्रियं यत्प्रवर्त्तते ॥१॥ तत्रेंद्रिया-
णां विषयमाह ॥ ॥ शब्दः
स्पर्शश्च रूपंच रसोगंधाश्चनुः
क्रमात् ॥ बुध्दिंद्रियाणां वि-
षयाः समाख्याता महर्षिभिः
॥१॥ वाच्यं ग्राह्यंच गंतव्य मा-
नंदच्च त्याज्यमेवच्च ॥ कर्मेंद्रि-
याणां विषया ज्ञातव्यं विषयो

प्रकरण ४ थे

हे द : ॥१॥ टि० हद: मनसः श्रेष्ठ सगम ॥

व इंद्रें ऐसेना मनमें करविणे हा विषय या स्थळीं अप्रासंगीक असून विस्तार भया स्तव ... दिग्दर्शन केले आहे. या विवेचनाचा सूक्ष्म विचार केला असता वरील ऋग्वेद ऋच्यर्थान्वयें मनाचें कर्तव्य दिसून येत आहे. पहा सत्व रज तमादि गुण भेद करून आस्तिनास्तिक्यादि धर्मा पर्यंत कर्मे तसेंच जडाजडादि चतुर्विंशति तत्वात्मक व दशेंद्रिय सहवर्तमान अद्य परमेश्वराच्या देहाची रचना मना पासून होऊन, प्रथम देह उत्पन्न केला आहे; आणि त्या देहा पासून होणारे कर्म, व त्या कर्मा पासून होणाऱ्या विषयाचें ज्ञान तेंही मनाधीन ठरविलें आहे.

( शरीरं अस्यादौ भवतीति श्रुतिः )
( शरीरं यज्ञ ब्रह्म गीतितैत्तिरीय श्रुतिः )

तात्पर्य सर्व सृष्ट्यादौ परमेश्वराचें शरीर निरमाण जाहलें, हाच मोठा सर्वळ यज्ञ होय.

या ठिकाणीं शरीर हाच प्रथम यज्ञ सिध्द केला आहे, त्या मुळें अपान यज्ञाच्या ... वधाने ऋत्विजादि यजन कर्माची योजना केली आहे.

( शतपथ कां० १४ अ० ५ ब्रा० १ कं० ६ )

ब्रह्मणार्त्विजा मनसा चंद्रेण मनोवै यज्ञस्य ब्रह्मा तद्यदिदं मनः सोसौ चंद्रः सब्रह्मा ह.

ति श्रुतेः ॥ ६ ॥

(गोपथ पू॰प्र॰५ खं॰१८ अथ

र्वश्रुतिः)

वाचंवै होत्रे प्राण मध्वर्यवश्च-

क्षुरु द्गात्रे मनो ब्रह्मणे गानि हो-

त्र केभ्यः आत्मानं सदस्येभ्यः

एव मानंत मात्मानं दत्वानंत्य-

मश्नुते तिश्रुतेः ॥१८॥ ७ ॥

(गो॰ उ॰ प्र॰ ३ खं॰ ७)

(प्राणानेवतद्यजमानोदध-

तीति श्रुतेः)

या सर्व श्रुत्याचा समष्टीनें असा अर्थ आहे कीं, प्राण परमात्मा पासून किंवा तोच यजमान होऊन त्यानें जो हा शरीर यज्ञ चालू केला, त्यांत वाचा ही होता आहे. व प्राण वायु, अध्वर्यु, चक्षु उद्गात्र व मन ब्रम्हा आहे या प्रमाणें ऋत्विजांचो योजना करून शरीर यज्ञ सिध्द केला आहे. त्यांत आत्मा हा सदस्य कल्पून त्या अनंतात्म्याच्या शरीरात अनंत काल, अनंत यज्ञ आणि मखही होत असल्या विषयी श्रुत्यादि आहे. या प्रमाणें शरीर यज्ञांत प्रथम परमेश्वराचा एक च पुढें एकाचे अनेक देहानें ब्रम्हा डभर प्रजा निर्माण केली. या कर्मानें मनास ब्रम्हदेव कल्पिलें आहे आणि या यज्ञांतील ऋत्विजासह अखिल यजन कर्माचे सूत्र मनाधीन असल्या मुळे (मनो यजुः प्रपद्येति श्रुतेः) त्या मनास यजुर्वेद सिध्द केलें आहे, येथेंच नाहीं. आखिल

दिवसें व प्रजेचें सूत्र इंद्राधीन असल्या मुळें दक्षिण दिशेसह वर्तमान देवतेचें व प्रजापालनाचें आधिपत्यत्व यजुर्वेदाच्या आशिष्टित चक्षुषी इंद्र देवते कडे सोपविलें आहे

## पुत्रवती दक्षिणत : इंद्रस्याधिपत्ये प्रजां मेदाः इति श्रुतेः ॥

यावरून अर्थात आशीर्वाद देवता इंद्राधीन असून तो इंद्र मुखातून उत्पन्न जाहला असल्या मुळे ब्रम्हांडांतील कर्म देवतेंत आशीर्वाद देवता गोचर जाहली नाही. येथ पर्यंत आशीर्वाद देवतोत्पत्तीचें विवेचन जाहले. याप्रमाणें ब्राह्म वेदाक आशीर्वाद देवतेचा शोध केला पाहिजे. म्हणजे प्रत्यक्षानें व प्रमाणानें आशीर्वाद देवता सिध्द जाहली असे म्हणण्यास मार्ग होईल.

वरील नैरुक्त श्रुतिंत ऋग्यजूच कर्णित ग्राह्य केले गेलेत. याजवरून या उभय वेदांचा च आशीर्वाद घ्यावा असा तर्क होत आहे वास्तव आतां अन्य वेदाचा विचार करण्याचें कारण राहिले नाहीं. सबब आशीर्वाद देवतेचा तोच आशीर्वाचा शोध. फक्त ऋग्यजू यांस मंत्र वेदातच केला पाहिजे, हें प्रयोग आहे

(सथार्वैतितिरियश्रुतिः)

नमो नमो गंगा यमुन योर्मध्ये-
वसंति तेमे प्रसन्नात्मान श्चिरं-
जिवितं वर्धयंती ॥ नमो नमो-
गंगा यमुनयोर्मुनिभ्यश्च नमो-
नमो गंगा यमुन योर्मुनिभ्यश्च-
नमः इतिनाराय० श्रुतिः

---

या श्रुतिनें आरंभी ( ऋग्यजुः सामाशीर्वचनं ) या आरि केला अगदीं वेगळुन टाकली, येवढेंच नाहीं. कोणत्याच वेदाचा किंवा शास्त्राचा उच्चार नकरीतां मध्य देशवासी गंगातिरा पासून यमुना तिरा पर्यंतचेच ब्राम्हण आयुष्यांची वृध्दि करणारे आहेत. असें सांगितलें या संदिग्धतेनें शास्त्रा किंवा वेद यांतून कोणताच बोध होत नाहीं.

## ( तथाचमनुः )

गंगा यमुन योर्मध्ये मध्या देश-
प्र कीर्तितः ॥ तत्रोत्पन्ना द्विजा-
येवै साधवस्ते प्रशास्यते इति-
स्मृतेः ॥१॥

**भाष्य-** अथवा देश व्यतिरिक्ता देशस्थासद्भताः ॥ म्लेंछ देश निवासिनो वर्जयेदिति मत्स्य वचनात् ॥ जाति विवेक माधव प्रश्ने विस्तरो दृष्टव्यः ॥ कोंकण वासिनो ब्राह्मणास्ते-पूर्वं म्लेंछ सांसर्गिकावर्जयेदिति ॥

## (तथाच पाराशर स्मृतिः)

मध्यदेशावरा प्रोक्ता ब्राह्मणो-
वेंद वित्तमैः ॥ तेषांब्रूयुः स.
धर्मस्या स्वयंभू रित्य कल्पये-
त ॥ तद्गिरा परिपूर्णस्या न्नि-
ष्कृतिरर्थ हारिकामिति ॥१॥

या स्मृत्याही वरील श्रुतिसमानुकूल आहल्या मनुस्मृति खालील भाष्यानें मात्र देश भलें उद्धार केला, त्यांत मत्स्य वचनाधारें मुंख देशवासी ब्राम्हण वर्ज करावे या शब्दांत द्रवीड तैलंगादिक अर्थात वर्ज ज्ञाहले. त्या पुढें जाति विवेकाधारें कोकणस्थ वर्ज केले. राहिलेला आर्यिक देश या श्रुति स्मृत्यांनीं वर्ज करून गंगा यमुनेच्या मध्य देशाच्याच ब्राम्हणास ऋषी, साधू या विशेषणानें पूज्यता देऊन शेवटीं तेच ब्रम्ह देवा समान मानावेत असा उपदेश केला.

शिवाय असेंही सांगितलें कीं, त्या ब्राम्हणांच्या सुवाणीनें आयुष्याची वृध्दी होऊन मनोरथ पूर्ण होतात.

## ( मुक्तिकोपनिषद )

वेद विद्या व्रतस्नाता देशिकस्य मुखात्स्वयं ॥ गृहित्वाष्टोतर शतं ये पठंति द्विजोत्तमाः ॥ ४४ ॥ अष्टोत्तरशतं उपनिषदं ॥ सेषं सुगमं ॥

## (तथाच वसिष्ट संहितायां)

इष्ट्वा याश्चये मंत्राः स्वंब्रम्हात्याश्चये स्मृताः ॥ दश प्रणव संयुक्ता कार्यास्ते देशि-

कोविदः ॥१॥ विधानं कीदृशं ते
षां किं स्थानं कः क्रिया जपेत ॥
आदौ प्रणव मुच्चार्य व्याहृत्य-
प्रणवान्विताः ॥२॥ मंत्रादौ
प्रणवः कार्या मंत्रांते प्रणवः पु
नः ॥ ततो व्याहृति संयुक्तः
अंतेच प्रणवः सदा ॥ ३ ॥
विधिनानेन कर्तव्यो जपः स-
र्वार्थ सिद्धिदा ॥ ४ ॥

(पराशरः)

ॐ कारः त्रिगुणं प्रोक्तं स्व-
ब्रह्म त्रिगुणं तथा ॥ मध्यंदि
नीतु शाखायां यजुर्वेद पठेति
हीं ॥१॥

वरील श्रुति स्मृत्यांची संदिग्धता वसिष्ठानीं प्रगट केली कीं, इषेत्वारंभव स्वं-
ब्रम्ह समाप्तिस आणि मध्यवर्ति दश प्रणव, अशा साधनाचा ज्या ब्राम्हणाचा वेद ग्रं-
थ असेल, त्या ब्राम्हणास देशस्थ ह्मणावें. असें सांगून पुढें त्याच्या विधानाच्या खु-

णा सांगितल्या आहेत. त्यांतील उत्तानार्थ असल्यामुळें विवेचन केलें नाहीं. वसिष्ठानीं सांगितल्या खुणे प्रमाणें वेद ग्रंथारंभ, व पर्यवसान आणि प्रणव हें साधन शुक्ल यजु-माध्यंदिन शाखेच्या संहिता ग्रंथांत आहे. व वर्णन केल्या प्रमाणें विधानही त्यांच्यांत वर्तत आहे. असें पाराशर सिध्द करितात. तस्मात या स्मृति प्रमाणानें मध्य देशवासी शुक्ल यजु माध्यंदिन ठरले.

तथाच गुह्यमालायां ॥ माध्यंदिन यजुर्वेदः स्वंब्रम्हात उदाहृतः ॥ ॐकार पूर्वं हि त्रिगुणं नान्य शाखा सुमुख्यत इति ॥१॥ पराशरस्मृतिः ॥ ॐकार पूर्वं त्रिगुणं अक्षरंच त्रिदेवतं ॥ त्रि ब्रह्म सुच स्थानं त्रिकल्पं त्रिप्रतिष्ठितं ॥ सत्वं रजस्तमश्चेति त्रिगुणं तेन संस्मृतं ॥ ॐकारस्त्रिगुणः प्रोक्तः स्वं ब्रह्म त्रिगुणं तथा ॥ माध्यंदिनीय शाखायां यजुर्वेदं पठं-

तिहीति ॥

अस्तु वरील श्रुति स्मृत्यानी गंगा यमुनेच्या मध्य देशांतील ब्राम्हण इतकाच उच्चार करून स्तब्ध राहिल्या. त्या स्तब्धतेचा वशिष्ठ पराशरानी प्रसार केलाकीं गंगेच्या आणि यमुनेच्या मध्य प्रदेशांत जरी चतुःशाखेचे अगर अनंत वेदाचे ब्राम्हण राहत असले तरी ते आर्वाचीन समजावें त्या प्रदेशांत प्राचीन चिरस्थायी राहणारे अयातयाम वेदपारग शुक्ल यजू माध्यंदीन सतेज वीर्यवान आहेत.

(गो॰ ब्रा॰ उ॰ प्र॰ ४ खंड १८)

अथैह तदधीतरसं शुक्रियं-
छंदोयस्त्रिष्टुभायातयामस-
वनस्यैवतत्सर सतायैः स-
र्वैसमवनीभिः सर्वैसमवती-
भिरिती श्रुतेः ॥

या अथर्वण गोपथ ब्राम्हण श्रुतिनें प्रथम शुक्ल यजुर्वेदाच्या मंडणार्थ व ओळखीकरितां यजुर्वेद संबंधानें मुद्देज दर्शीत केले त्यांत प्रथम त्रिष्टुभ छंद घेऊन यजुर्वेद दाखविला आहे.

म्हणजे च्यार वेद च्यार छंदाच्या आभिदानानें वर्तत आहेत त्यांत प्रथम गायत्री छंदानें ऋग्वेद व त्रिष्टुभ छंदानें यजुर्वेद जगती छंदानें सामवेद आणि अनुष्टुभ छंदानें अथर्व वेद वर्तत आहे. त्यापैकीं त्रिष्टुभ छंदानें यजुर्वेद घेऊन त्या यजुर्वेदांत हीकृष्ण-ष्यादि भेद आहेत सबब तो संशय दूर करण्या करितां शुक्ल यजुर्वेदाचे मुख्य आणि महत्वाचे जे विशेषण ते आयातम दर्शित करून शुक्ल यजुर्वेद स्थापन केला. शिवाय त्या वेदांतील संहितेचा अध्याय २६ शुक्रीयछंद म्हणजे (ऋचंवाच) आहे. त्या आधीतरसानें हा शुक्ल यजुर्वेद आगतवीर्य सतेज सरस म्हणजे रसभरीत असे शुक्ल यजुर्वेदाचें मंडण करून पुढें यावाचून अन्यवेद सर्व सारखे आहेत असाद्विरुक्तिनें उच्चार केला.

यात एकाची स्तुति केल्यानें अर्थात त्या उलट अन्याची निंदा उत्पन्न होती हें जगप्रसिद्ध आहे.

(ऐ॰ अ॰ १ अ॰ २ खं॰ ६)

वीर्यं तेजसी प्रतिष्ठित स्त्रात्रि-
ष्टुभमभिसंपद्यं तेत्रैष्टुभो-
ह्मिमाध्यंदिनः ॥ ६ ॥

या अश्वलायन श्रुतिनें ही वरील गोपथ श्रुति प्रमाणें आरंभी त्रिष्टुप छंदाच्या मुखानें शुक्ल यजु माध्यंदिन गृहीत करून, याचें महत्व वर्णन केलें त्यांत त्यास सतेज वीर्यवान प्रतिष्ठित अशिं विशेषणें देऊन पुढें अशा तेजानें संपादीत असल्याचा उद्धार केला आहे

या प्रमाणें आतां तयाम शुक्ल यजुर्वेदाचे भागवत विष्णु, कूर्म, वायू आदित्य पुराणांत वर्णन असून तैत्तिरीय संहितेच्या सप्तम अष्टकांतील ६।७ अध्यायांत आहे.

हें असो अश्वलायन श्रौत[illegible] आहे हें विशेष मानिलें पाहिजे. या विशेषतेकरितां वरील सर्व ग्रंथाच्या प्रमाण वाक्यांचें विवेचन न करितां नूतन येथें अश्वलायन श्रौत श्रुतींतील आणि आदित्य पुराणांतील वर्णन सारखें असून उभयस्थळीं एकाच श्रुति मंत्रानें वाजसनीचें वर्णन केलें आहे. सबब या उभय ग्रंथांतील वाक्यासह श्रुति मंत्रांचें भाष्य पुर्वक येथें विवेचन करितों

(तथाच अश्वलायन श्रौ॰ सू॰
पू॰ ष॰ अ॰ २ खंड १६)

शन्नो भवंतु वाजिनो हवेषु वा-
जेवाजेवत वाजिनोनदत्यू-
र्ध्वजुरनवानं याज्यांग्ने विही

त्यनुवषड्कारो वाजिनस्याग्ने वि वीही-
तीति श्रुतेः)॥ तत्रैव अध्या-
य ५ खंड १० ॥ वषट्कारो य-
त्र क्वच प्रेषण यजे दथस्वि-
ष्टकृतोग्ने जुषस्वनो हवि-
र्माध्यंदिने जातवेदोग्न इ-
ति श्रुतेः ॥ १० ॥

या अश्वलायन श्रुतितील अन्यार्थाचें येथें कारण नाहीं फक्त वाजे वा-
जे वत वाजिनो या मंत्रानें वाजसनी चा स्तव केला एवढें पहाणें आहे.
हा वाजसनीच्या वर्णनाचा मंत्र या श्रुति प्रमाणें आदित्य वाक्यांत अर्थ स-
हित विवेचन केला आहे.

(आदित्यपुराणे उत्तर खंड
अ० १२ श्लो० )

वाजे वाजे वते त्यस्य मंत्रस्या-
र्थो मया श्रुतः ॥ यजूंषि ये-
षीतानि तानि विप्रे र्द्विजोत्तमैः
॥१०॥ वाजिनस्ते समारुपा-
ताः सूर्यस्य श्वो भवद्यतः ॥

श्रीकृष्णन्येषुविप्रेषुपित्र्ये दे-
वेच कर्मणी ॥ ११ ॥ तद्वा-
जिनां भावनाय ब्राम्हणानां
कृते भवेत् ॥ सौवर्णादिषु
बिंबेषु देवता भावना यथा
॥ १२ ॥ श्रीकृष्णन्नेषुविप्रे-
षु वाजिब्राम्हण भावना ॥
एतध्दर्मश्रुतेर्ज्ञात्वाऋषयः
सूत्रकृत्तमाः ॥ १३ ॥ पितृणां
वंदने केचित्केचिद्दुर्जे-
ने तथा ॥ केचित्प्रदक्षिणां-
च कुर्वाजि विप्रं परं विदुः
॥ १४ ॥

या अध्यायारंभीं शौनकादिऋषिनीं सूतास, व अरुणानें सूर्यास प्रश्नकेला.
कीं जनकास उपदेश करणारा जो याज्ञवल्क्य ब्राम्हण त्याचें महात्म्य म्हणजे विद्या,
तपोतेज, योग ब्रम्हत्व कसें आहेतें सांगावें?
या प्रश्नाचें उत्तररूप समाधान सूत शौनकाचे व सूर्य अरुणाचे करितात.
त्या कथानकाचीं हीं वाक्यें आहेत. त्यांपैकीं नऊ वाक्यांत अखिल शाखेच्या ब्राम्ह-

गाने पर्यायानें वर्णन करीत करीत अयातयाम वेदाचें वक्ता वेदपाठी ब्राह्मणांनें वर्णन करून विद्यमान असलेल्या वाजसनेयांसच हव्यकव्यादि यज्ञांत भोजनादिकानें तृप्त करावें असा क्रम सांगितला गेला

नऊ वाक्यां पुढें वरील वाजसनेयांच्या मंडणार्थ अश्वलायन श्रौत सूत्रांत घेतलेला (**वाजे वाजे**) हा मंत्र प्रमाणास घेऊन पुढील पांच वाक्यांत त्या मंत्राचा भावार्थ उत्तानार्थीनें प्रकाशित केला आहे.

त्यांत याज्ञवल्क्य वंशज वाजसनेयास यजुर्वेदी म्हणावे. आणि त्या यजुर्वेद्यास प्रत्यक्ष सूर्यच समजून देवपितृकर्मांत भोजनादि उपचारानें तृप्त करावें असा नियम सांगितला आहे.

**(तथाच तैत्तिरीय श्रुतिः)॥ माध्यंदिने प्रबलमथीयीतासौ खलु यावेषः आदित्यो यद्ब्राह्मणः इति श्रुतेः॥**

**(तथाचाश्वलायन श्रुतिः)**

**उच्चा दिवि दक्षिणावंतो अस्थुर्ये अश्वदाः सह ते सूर्येण॥ हिरण्यदाः अमृतत्वं भजंते वासोदाः सोम प्रतिरंत आयुः॥१॥**

वरील तैत्तिरीय श्रुतींत माध्यंदिनशाखी ब्राम्हण प्रत्यक्ष सूर्यच असा सिध्दांत केला. अश्वलायन श्रुतींत अष्ट दिशेहून उच्च अशी जी दक्षिणदिशा ती, किंवा शरीर भागानें दिविनाम आकाश.शीर तीच दक्षिण दिशा ठरली असून, त्या शिर स्थानचे दक्षिणादिशाधिकारी यजुर्वेदी असा भावार्थ दिला आहे.

**(माध्यंदिने सवने दक्षिणानीयंते-**

इत्यथर्वश्रुतिः )

शुक्र यजूनामक नांच्या यज्ञ देवतेनी यज्ञांतील दक्षिणदिक् द्वार किंवा दिशा रचपादून केली असा भावार्थ आहे.

(अश्वलायन श्रौत सूत्र पूर्वषट्क अ. ३

खंड १२ )

उग्रादिशामभिभूतिर्वयोधाः शुचिः
शुक्रे अहन्योजसीनां इद्राधिपतिः पि-
पृतादतोनो महिक्षत्रं विश्वतो धारये-
दं ॥ बृहत्सामक्षत्रभृद्वृद्धवृष्ण्यं त्रिष्टु-
भौजः शुभि तमुग्रवीरं ॥ इंद्रस्तोमे
नमध्यंमिदं वातेन सगरेणरक्ष इति श्रु-
तेः )

या श्रुतिचा भावार्थ असाकी उग्रादिशातील दक्षिणदिशा त्यांदक्षिण दिग्द्वारचे रक्षण करते शुचिः पवित्र किं-
वा ( शुक्ल शुभ्र शुचिः श्वेतइत्यमरः ) शुक्र म्हणजे

( महोपनि. श्रु. )

कस्मादुच्यते शुक्रो यस्मादुच्चार्यमाणमेवस-
र्वान्लोकान्शुधान्शुक्लान्करोति तस्मादुच्यते
शुक्रः इतिश्रुतेः )

याप्रकारचे शक्रते ॥ शुक्र जे अन्हारूप प्राणन कर्म करते किंवा ( अथीतरस शुक्री
षडद ) ( ऋचंवाने ) अध्याय ज्या यजुर्वेदांत नर्तत आहे ते संतज अपानगाममाध्यंदीन शारवीय कीं-
त्यांची सूक्ते सतत वीर्यवंत व जे इंद्रदेवताधिकारी असून त्या इंद्राचाही अधिकार सामान्य नाहीं पृथिव्यादिक
रून सर्व विश्वाचा राजा त्यानें सर्व विश्वाची धारणा केली. अशा देवतेच्या तेजानें व त्रिष्टुभ छंदाच्या वीर्यानें व तृ-

हस्ताग्राच्या प्रबलतेनें शोभन अशा यज्ञांतील ... ते रथवीर पराक्रमी असून इंद्रादिदेवतेच्या पंचदश स्तोमानें व वातादि सगर सूक्तादि ... दक्षिण झाले उत्तम रक्षण करीत आहेत. या प्रमाणें अश्वलायन सूत्र ऋषिचा भावार्थ आहे.

## वैदिक निघंट अध्याय १ खंड ३ वाक्य १९ (सगर) अंतरिक्षनामानी अग्राशरूपिणे)

तात्पर्य सगर नांवें करून अंतरिक्षदेवता यजुर्वेदाची असल्या विषयीं वर प्रतिपादन झालेंच आहे. तसेंच त्या देवतेच्या प्रार्थनेचे यजुर्वेदांत सगर मंत्रही आहेत.

येथें श्रौती यज्ञकी ब्राह्मणास स्मरण देतां कीं चातुर्मास्य सोमादि यज्ञांत कन्वीज आदिकरून यजमानानें यज्ञमंडपांत प्रवेश केल्या नंतर त्या मंडपाच्या औदुंबरी आदिकरून साहित्यास अंतरिक्षाच्या भावनेनें देवता समजून प्रार्थना करावी असें मत आहे. त्या प्रार्थनेचा वाजसनीय संहितेतील अध्याय ५ ( अग्रेस्तनूः ) आहे त्यांत (त्वंब्रह्मा त्वंविष्णुः) या अभिप्रायानें अग्नीच्या प्रार्थनेचा ३४ साव्या मंत्रे ( सगर ) लिंगवाची आहेत पहावा.

हा आखिल भावार्थ अश्वलायनांनीं ग्रहित करून सूत्र ऋषित दिग्दर्शन केलें येवढेंच नाहीं. या महत्वा मुळें याच सूत्रांत हेच अश्वलायन आपल्या पुढें होणाऱ्या वंशास बोध करितात कीं,

### ( अ० श्रौ० सू० उ० प० अ० ३ खं० १ )

### अनन्यभावो नित्यनैमित्तिका विकारा माध्यंदिने होतुः ॥

यांत असा उपदेश केला कीं, नित्य म्हणजे स्मार्त कर्मांतील हव्य कव्य नैमित्तिक म्हणजे अग्निहोत्रादि प्रकृति यज्ञ व विकारा म्हणजे त्या पुढील विकृति यज्ञ या सर्व हव्य कव्यादि श्रौतस्मार्त कर्मांत अनन्य भावें करून माध्यंदीनच हव्याधिकारी होते येणेंकरून असा पुढील आणि अखिल वंशास उपदेश केला आहे.

अस्तु. याप्रमाणें शुक्ल यजू माध्यंदिन दाक्षिणात्य आहेत. अशा अधिकाराच्या महत्वास व अथर्व श्रुतिस अनुसरून अश्वलायनानें वर्णन आहे. या महत्वाच्या विशेषणानें वर्णन करून पुढें त्या वाजसनीय दक्षिणा वंतास सुवर्णाच्या सूर्य प्रतिमे सहित हिरण्यवस्त्र अश्व दान दिल्यानें नव्हे जो मृत अशा अमृतात्म्याचा आत्म लाभ होऊन चंद्र सूर्या सह हा जग झाल ब्रह्मांड यज्ञ विभू उभा आहे तों पर्यंत आयुष्याची वृद्धि होईल असें फल सांगितलें आहे.

### ( तथाच तैत्तिरीयश्रुतिः )

### नो इतराणि । येके चास्मच्छ्रेयाᳬंसो ब्राह्मणाः । तेषां त्वयासनेन प्रश्वसितव्यं ।

**श्रध्दयादेयं । अश्रध्दयादेयं । श्रियादेयं । ह्रि-
यादेयं । भियादेयं । संविदादेयं । अथते
कर्मविचिकित्सा आ वृत्त विचिकित्सा वास्या-
त् ॥ ३ ॥**

**॥ अस्यार्थः ॥** नोदकशाखी कश्यासि अन्यांत अन्य ब्राम्हणान्न देयमित्यर्थः ॥ कर्मविचिकित्सा । कर्म विचिकित्सनान श्रौत स्मार्त सांहत कर्मज्ञान । कर्मानुष्ठान करण शीलान् स्वभाव निष्णातान् व्रतविचिकित्सेनान् ब्रम्हव्रतं ।

**तथाच नैरुक्त श्रुतिः । अथाव यमादित्य-
व्रतेनवाभिति श्रुतेः**

व्रत कर्मनाम । व्रती कर्मचारयतीति । आचारः । येश्रेयांसो ब्राम्हणाः अनन्य भावे भावपूर्वकं परमेश्वर स्थाना यथासि नत्यं । पूजनीयं । तेषां श्रध्दयापिदत्तं देयमित्यर्थः ॥ ३ ॥

तात्पर्य सशास्त्र कर्माचरण करणारा किंवा कर्म त्याग करून ब्रम्हीं लक्ष ठेवणारे जो असा ब्राम्हणास परमेश्वर स्थानीं असल्यें अर्चन करून शुध्द भावनेनें दान द्यावें तें श्रेयस्कर-आहे. कर्मांच्या ठिकाणीं अन्यास दान देऊनये असा श्रुत्यभिप्राय आहे.

अशाप्रकारें सर्व श्रुत्यांचा अभिप्राय समजल्या मुळेंच आदित्य पुराणांत वाजसनी ब्राम्हणाचें महात्म्य वर्णिलें असून शिवाय असेंही कथन केलें कीं, प्रत्यक्ष देवता नसल्या मुळें जसें सुवर्णादि प्रतिमेच्या ठिकाणीं देवतेचें अवाहन करून पूजन करावयाचें, तसेंच वाजसनी ब्राम्हण देव पितृ कर्मांत भोजनास न मिळाल्या मुळें अन्यशाखी ब्राम्हण भोजनास बसवून त्यांच्या ठिकाणीं वाजसनी ब्राम्हणाची भावना करावी. व त्यास पूजनादि भोजनोपचार द्यावेत. असा श्रुतिनें धर्म सांगितला असून, त्यांतच असेंही सांगितलें आहे कीं, पितृमिसे वंदन किंवा पूजनार्चनादि प्रदक्षिणादिक करून प्रत्यक्ष वाजसनीची आराधना घडल्यानें व त्यांच्या संतोषानें आणि त्यांच्या मुखानें आशीर्वाद प्राप्त जाहल्यास पितरादि पूर्वजास-मोक्ष प्राप्त होतो. असें वाजसनी ब्राम्हण परम ऋषि आहेत, असा वाक्यार्थ आहे. या वाक्यांत वाजसनीच्या भावनेनें अन्य ब्राम्हणास देव पितृ कर्मांत हवी देण्याची सवड ठेविली आहे त्या सवडीस अनुसरून किंवा वाजसनीच्या महत्वाच्या मत्सरानें म्हणा. परंतु अन्य शाखेंतील यजमानास हा श्रौत शास्त्रार्थ अगर हें वाजसनींचें महत्व न समजूं देतां ( **यथा कन्या तथा हविः** ) या स्मृति वाक्याधारें योन्यभिमानाच्या शास्त्रार्थाचा पोटार्थी परहव्याभिलाषी आग्रहानें उपदेश करून देव पितृ कर्मांत वाजसनीस हवी देऊनये असें यज-

गनानें अंतःकरणांत उलट आणून देऊन आपण आपल्या शरीर संबंधीची उपजीविका करावयाची, असें तन दृष्टांततीस येत आहे. परंतु असा विचार करीत नाहींत कीं, ग्रनदयाशा सुछक स्मृति वाक्यानें आपल्या वेदास गौणता येऊन आपलें सर्व कर्म सदोष होत आहे.

तें असें कीं, सूत्रांत सांगितलेलें सोडून स्मृतिप्रमाणें केल्यानें एकतर सूत्रोदित कर्म होत नाहीं. अशुध्द होतें. तसेंच अश्वलायनाचार्यांच्या अज्ञेचा भंग करून स्मृतिप्रमाणें केल्यास स्व आचार्यास गौणता येती. याशिवाय अशा आचरणांत सर्व कर्म वेद बाह्य होत आहे.

इतके हि दोष एका स्मृतिवाक्यां करितां स्विकारावे लागतात, त्यापेक्षां स्मृतिचाच त्याग केला असतां दोष होत नाहीं; आणि तसें करण्या विषयीं शास्त्र आहे.

## ( विंशति मतें स्मृतिः )

**स्मृतिर्वेद विरोधेन परित्याज्या यथा भवेत् ॥ तथैव लौकिकं वाक्यं स्मृति बाध्यं परित्यजेत् ॥ १ ॥**

तात्पर्य वेद वाक्या बाह्य स्मृति व स्मृति बाह्य लौकिक वाक्य आल्यास त्याचा त्याग करावा. - तर शाखेच्या भिक्षुकास उपाशी मरावें लागणार. तथापि अशा परद्रव्यभिलाषी ब्राम्हणांच्या उपदेशानें अल्पकर्णी अज्ञान यजमानाचें मन वळविलें गेलें. परंतु श्रौत स्मार्तादि सूत्र श्रुति वाक्यांधारें देवपित्र कर्मा विषयीं जे प्रयोग ग्रंथ तयार झाहले आहेत. व त्या प्रयोगांत वाजसनीचें महत्व वर्णन करणारे सूत्र श्रुति किंवा जे वेद मंत्र आहेत, ते मात्र फिरविले गेले नाहींत.

पहा कोणत्याही वेदांतील व कोणत्याहि शाखेंतील ब्राह्मणांच्या येथील देव पितृ कर्मांतील वेद मंत्रांत वाजसनीचें महत्व वर्णीत असून वाजसनीच्या भावनेनें विद्यमान असलेल्या ब्राम्हणांची प्रार्थना करितात. अशी वहिवाट व प्रार्थनेचा मंत्र पठीत होत असलेला चतुःशाखेंतील कर्मांतीं श्रवणांत येत आहे.

## ( वा० सं० अ० ९ मंत्र १८ )

**वाजे वाजे वत वाजि नोनो धनेषु विप्राः अमृताः ऋतज्ञाः ॥ अस्य मध्वः पिबत मादय ध्वन्तृप्ता यात पथिभिर्देवयानैः १८ ॥**

( उवटभाष्य ) वाजेवाजे विप्रय् । अन्ने अन्ने उपस्थिते । अवतपालयत । हे वाजिनो विप्राः मः ... उपस्थितेषु पाळयत् । हे वाजिनो विप्राः मेधाविनः । परिदृष्ट कारिणः इतियावत् । अमृता अमरण धर्माणः । ऋतज्ञाः सत्यज्ञा वायज्ञज्ञावा । किंच अस्य नैवारचरूलक्षणस्य मध्वः मधुनः पिबत मादयध्वं तृप्यध्वं नैवार चरू अवजिघ्रंत्यश्चास्तदभिप्रायमेतत् । तृप्ताश्च संतोषात । पथिभिः देवयानैः देवाश्यासितैः ॥१८ ॥

यांतील तात्पर्य यजमान निमंत्रीत वाजसनी ब्राम्हणास विनय पूर्वक प्रार्थीत आहे कीं, हे वाजगर्भीय विप्राः मेधाविनो ब्राम्हणाः मीं जीं नाना प्रकारचीं अन्नें व धनें संपादन केलीं आहेत, तीं आपण पहावीं आणि आपल्या तपोतेजें करून त्या माझ्या अन्नांचें व धनाचें आणि आयुष्याचें पाळन करावें अशी प्रार्थना आहे.

कारण आपण कसे आहात तर ( ऋतज्ञ सत्यज्ञ ) ह्मणजे यज्ञ कर्म कुशल असून सत्य वस्तू जो शुध्द ब्रम्ह त्या परमात्म्यास जाणत आहात यास्तव तुम्ही प्रत्यक्ष परमेश्वर रूप विप्र असल्या कारणानें माझ्या यथील चरू आदि करून म्हणजे भात आदिकरून जें सिध्दान्न आहे, त्या अन्न सेवनानें आपण तृप्त जाहला म्हणजेदेव व पितृगण तृप्त होऊन देवयानजें विमान त्यांत बसून ते स्वर्ग लोकास गमन करतील अशी मंत्रार्थांत प्रार्थना आहे.

चतुः शाखेच्या कर्मांतीं हा मंत्र ब्राम्हण पठण करितात आणि यजमान हात जोडून विद्यमान कर्मांत असलेल्या ब्राम्हणांची प्रार्थना करितात असें पाहण्यांत येत आहे.

याच्या प्रत्यंतरास जगांत वर्तत असलेलें उदाहरण येथें देणें युक्त वाटल्या वरून कळवितों कीं, पाचनशक्ती नसल्यामुळे पथ्य भोजन जाहल्यावर ( अगस्ती कुंभकर्णश्च. ) हा श्लोक व हें उदाहरण जग प्रसिध्द आहे कीं, पाचना करितां अगस्ती सारख्या तपोधनाचें व भीम कुंभकरणा सारख्या बलाढ्यांचें व अग्निसारख्या देवतेचें स्मरण करून आहाराचा परिपाक करावा लागतो आणि भोजनोत्तर पोटावरून हात फिरवून हे स्मरण वाक्य पठण करण्याची प्राचीन विद्वानांत वहिवाट आहे.

या उदाहरणा प्रमाणें कर्मांतील ब्राम्हणास त्या कर्मांना अधिकार किंवा योग्यता नाहीं. सबब कर्मांतीं कर्माधिकारी आणि योग्य अशा वाजसनीचें स्मरण व प्रार्थना करून कर्म सांग मानतात. असें या वहिवाटी वरून होत आहे.

**( महाभारते भविष्य कथा प्रसंगे व्यासः )**

**अयातयामानि तु भानु गुप्ता नन्यानि जाता न्यति नीर सानी ॥ यजूंषितेषा- मेश याज्ञवल्क्यो त्ययातयामानिरवेरवा-**

**प ॥ १ ॥**

या वाक्यानंतर व्यासांनी कोणाचाही पक्ष न धरितां अपक्षपातानें यथार्थ आणि उघड वर्णन केलें आहे.

त्यांत प्रथम असें प्रगट केलें कीं, जो शुक्ल यजुर्वेद गुप्तरित्या सूर्यापाशीं होता, तो निर्दोष सतेज अगतवीर्य अयातयामत्व पावला. आणि यावांचून अन्य राहिलेले सर्व वेद यातयाम दोषास पात्र जाहले (**गीता अ० १७ श्लोक १०) यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ॥** अर्जुनास स्वमुखें भगवान सांगतात की, पर्युषित आणि गतरस असलेल्यास यातयाम म्हणावें. याच दोषानें गतवीर्य निस्तेज निरस जाहले अशी स्पष्ट व्यासोक्ति आहे.

अर्थात अखिल वेद निस्तेज जाहल्या मुळें त्या मंत्रांतील देवता नष्ट जाहल्या. म्हणून शुक्ल यजुर्वेदाचार्य जो भगवान योगेश्वर याज्ञवल्क्य त्यांनी सूर्याराधना करून देवतेस प्रसन्न केलें पंचदशशाखायुक्त अयातयाम शुक्ल यजुर्वेद प्राप्त करून घेतला. या प्रमाणें भावार्थ असून याचा व्यानें वरील गोपथश्रुतीस दृढीकरण व शुक्ल यजुर्वेदाचें निर्दोषमंडण व अन्य वेदांच्या दोषा सहीत निस्तेज निरसता उघड कीरत आणून दाखविली आहे.

अस्तु जाहलें त्यारत्येंत ब्राम्हणाच्या व वेदाच्या पात्रापात्रतेच्या वादांत अयातयाम शुक्ल यजुर्वेद सतेज वीर्यवान ठरून त्या वेद पारगाच्या आणि गंगातीरच्या ब्राम्हणाच्या मुखानें मंत्राशीर्वाद घ्यावा असें श्रुतिस्मृति पुराणोक्तीनें सिद्ध जाहलें आहे.

या विवेचनानें अयातयाम म्हणजे सतेज वीर्यवान आणि यातयाम म्हणजे निर्वीर्य हा भावार्थ वेदाची व ब्राम्हणाची पात्रापात्रता लक्षांत आल्या वांचून राहणार नाहीं.

## ॥ चतुर्थ प्रकरण समाप्तः ॥

## प्रकर्ण ५

## श्रीयोगेश्वरोजयती

या पुढें सूक्ताची व आशीर्वादादि मंत्राची पात्रापात्रता प्रसिध्द करितो.

**नै० उ० अ० १ खं० ३**

**परोक्ष कृताः प्रत्यक्ष कृताश्चमं-
त्रा भूयिष्ठा अल्पशः अध्यात्मि
का अथापि स्तुतिरेव भवतीना
शीर्वाद इति श्रुतः ॥**

तात्पर्य वेद चतुःष्टयात अनेक देवतेच्या अनेक कर्मांचे अनेक मंत्र आहेत. त्यांत कांहीं देवतेच्या स्तुतीचे, व कांहीं अध्यात्मपर व कांहीं कर्म शास्त्राचे आहेत, ते आशीर्वादास उपयोगीं नाहींत, व त्यांत आशीर्वाद ही नाहीं.

जे स्तुति रूप मंत्र आहेत, त्यांतही परोक्ष प्रत्यक्षाच्या भेदानें महत्व न्युनत्वाची पात्रापात्रता दाखविली आहेकीं, ( **सुचक्षा अहमक्षिभ्यां भूयास सुवर्चा मुखेन दृ तिश्रुते:** ) यांतील तात्पर्य मी आपल्या डोळ्यानें देवता पाहून मंत्र रूप स्तोम केले. ते प्रत्यक्ष कृत मंत्र जाणावेत. आणि ( **सुश्रुत्कर्णा भ्यां भूयासं इति श्रुत:** ) म्हणजे देवता न पाहतां, कर्णानें किर्ति श्रवण करून जे मंत्र रूपस्तोम केले ते परोक्ष कृत मंत्र जाणावेत, अशी श्रुत्यक्ति आहे

या भेदावर व्यवहारीक दृष्टांत युक्त दिसल्या वरून कळवितों कीं, जन्मांधानें कधींही हत्ती पाहिला नसून, हत्ती सन्निध गेला तरी हत्तीची ओळख होण्या करितां अंधधर्मानें चापसून वर्णन करूं लागेल. तर ज्यानें पाय चापसला, तो पाया प्रमाणें, व ज्यानें पुछ चापसलें तो पुछा प्रमाणें हत्तीचें वर्णन करितो. आणि अंधास वागवि-

... डोळस तो प्रत्यक्ष हत्ती पाहिल्या प्रमाणें वर्णन करितो.

या प्रमाणेंच प्रत्यक्ष देवता पाहून जे मंत्रात वर्णन आहे तें देवतानपाहता अथा प्रमाणें जे वर्णन आहे, तें मंत्रार्थाने समजणार आहे.

याज करितां मंत्रार्थ पाहिल्याने प्रत्यक्ष परोक्षाची व अध्यात्म व आशीर्वाद मंत्राची खरी ओळख होणार आहे. किंवा याशिवाय या विषयीं स्मृति शास्त्राचे राज नीति पर जे उदाहरण आहे त्या उदाहरणाने प्रत्यक्ष परोक्षाची चागली माहिती होणार आहे.

राज नीतींत असें आहेकी, उभय राजाचा मध्यवर्ति वागणारा जो वकील असतो, त्यास नित्य अथवा पदोपदीं उभय राजाच्या भेटीचें कारण पडतें तेणें करून आणि सहवासानें उभय राजाचे स्वभावधर्म प्रकृती धर्म मनोधर्मादि गुणावगुण लक्षांत व अनुभवांत येतात तसे परस्पर राजाचे स्वभाव धर्म परस्परास माहीत नसतात.

मध्यवर्तिच्या वकिलाच्या मुखानें परस्पराचे श्रवणांत येऊन जी माहिती होईल, त्या माहितीनेंच परस्पर राजे परस्परांचें वर्णन करीत असतात् तें (**सुश्रुतकर्णाभ्यां**) या श्रुति प्रमाणें परोक्ष कृत वर्णन होतें.

आणि प्रत्यक्ष भेटीनें अनुभव घेऊन निकट सहवासी जो वकील तो जी उभय-राजाची स्तुति करितो ती (**सुचक्षा अहमक्षीभ्यां**) या श्रुत्यर्था प्रमाणें प्रत्यक्ष स्तुति होते.

या प्रमाणेच वेदत्रयीच्या मंत्राचा विचार आहे पहा! भूलोकचा राजा ऋग्वेद पृथिवी पती आहे. व द्यु लोक आकाशाचा राजा सामवेद आहे या उभय राजाचा अन्योन्यात कोणत्याही प्रकारानें प्रत्यक्ष सहवास नसून भूलोकच्या राहणारानें स्वर्गलोकांतील देवतेचे किंवा स्वर्ग लोकांत राहणारानें भू लोकच्या देवतेचें वर्णन केलें असता (**सुश्रुत्कर्णाभ्यां**) या श्रुत्यर्था प्रमाणें असावयाचें हें उघड दिसत आहे.

तेंच भू लोकच्या राहणारानें भू लोकच्या वस्तूचें किंवा देवतेचें वर्णन केलें असता तें मात्र (**सुचक्षा अहमक्षीभ्यां**) या श्रुत्यर्था प्रमाणें प्रत्यक्ष आणि यथार्थ होणार आहे.

तद्वतच, स्वर्गच्या राहणाराचे ही घडणार आहे. आणि अशा प्रकारचे उभय वेदांतील मंत्र असल्या विषयीं श्रुति साक्ष देत आहे.

**( तै॰ उ॰ अ॰ १ खं॰ ३ )**

**नविजानामि यदिमस्मी त्यथापिनिं·**
**दा प्रशंसे केवलाद्यो भवति केव·**
**लादी मोसस्येदं पुष्करिणींचवै**
**वे श्मेत्येव मक्षसूक्तेन द्युतनिंदा·**
**च कृषि प्रशंसा चैव मुच्चावचैर·**
**भिप्रायै ऋषिणा मंत्रा दृष्टयो भ·**
**वंती तिश्रुतेः**

तात्पर्य या वर्णना वरून हे भूलोकच्या वस्तूंचें वर्णन आहे असें कोणीही सांगू· शकेल कारण प्रथम पदात "**नविजानामि**" ह्मणजे मी जाणत नाही. या वरू· न पुढें ज्याज्या भूलोकच्या वस्तूंचें वर्णन आलें आहे, त्या जाणल्या आणि याशिवा· य ज्या वर्णनांत नाहींत, त्यास मी जाणत नाहीं असा " अर्थ दिसून येतो. किंवा· प्रत्यक्ष । दृग्गोचर वस्तू वर्णन करितो. आणि अदृश्य अशा 'स्वर्गस्थासनविजानामी ' मी जाणत नाहीं असा अर्थ होतो. पुढें 'यथापि' पद आहे या अक्षेपानें· सर्वथैव वरील कल्पनेस दृढी करण जाहले म्हणजे पुढें ज्या ज्या भूलोकच्या वस्तू व· र्णनांत आल्यात त्यांचेंच वर्णन करितों, असा भावार्थ या अक्षेपानें दिसून येतो.

तस्मात् स्वर्गस्थास मीजाणत नाहीं. आणि भू लोकच्या कृत्यांचें व वस्तूंचे स्तुति - रूप मंत्र व सूक्तें जीं कथित आहेत, त्यांत निंदा, प्रशंसा, धान्य, विहिरी, नद्या, घरें, द्यू- त, फासे टाकणें, कृषी आदि करून स्तुतिचे व याशिवाय उच्चावचा म्हणजे कमि· जास्त अभिप्रायाचे स्तुति रूप मंत्र ऋषिनीं दृष्ट केले असल्या विषयीं श्रुत्यभिप्राय - असून, ही प्रत्यक्ष पृथिवीपती राजाची राजविद्या असावी असें उघड दिसत आहे.

कारण जसा पृथिवीचा विस्तार असून त्या पृथ्वीवर उच्चावचा ह्मणजे वृक्षावाप· दांचें संगोपन आहे. त्या प्रमाणें अधिकाऱ्याचा ही विस्तार असून ज्याचा स्पर्श किंवा उच्चार होऊं नये (**ननीचोयवनात्परः**) अशाचे (**अल्लोपनिषदा**) सु·

ध्या त्यांत संग्रह आहे. मग सोंकट्या, बुदवाल्याचा संग्रह असल्याचें आश्चर्य काय मानावयाचें आहे ? अस्तु. याजवरूनही भूलोकवासी राजाची राजविद्या आहे म्हणणें यथार्थ होत आहे.

# ( तथाच पाराशरः )

# अस्यमंत्रस्य चार्थायमयंमन्त्रोत्र वर्तते ॥ तेतस्य ब्राम्हणं ज्ञेयं - मंत्रस्येति श्रुति क्रमः ॥ १ ॥

या भूलोकवासी वेदा प्रमाणें उच्चावचादि आचरण मध्य लोकच्या अंतरिक्षवासी यजुर्वेदाचें नसून सशास्त्र शुध्द आचरण असल्यामुळे, तों शुक्ल विशेषणानें पूज्यत्व पावला आहे व त्याचे स्तोममंत्रही ( **सुचक्षा १ अहमक्षोभ्यां** ) या श्रुत्यर्था प्रमाणें असावयाचे, आगर आहेत. असा निश्चय करण्यास प्रथम योग्य कारण वरील वर्णि... प्रमाणें भूलोकच्या व द्युलोकच्या राजाच्या मध्यवर्तिच्या अंतरिक्षास, रात्रंदिवस सारखा उभय लोकांचा निकट संबंध अथवा सलग्नि करण असल्या मुळें, या त्रय लोक्याचें - नित्य प्रिय कर्मच अंतरिक्षांतील यजुर्वेदाच्या अधिष्टित इंद्र राजाकडे असून, लोक त्र-यांतील देवतेचें **प्रत्यही** नित्य दर्शनानें व अनुभवानें आणि **सुचक्षा श्रुतिप्रमाणें** यजुर्वेदाच मंत्र आहेत. व या वेदांतच आशीर्वाद मंत्रही आहेत म्हणावें लागतें.

कारण प्रथम ऋग्वेदाग्निचा विचार करितां ( **अग्निं दूतं पुरो दधे** ) असी - श्रुति आहे. म्हणजे सर्व देवतेचे हविर्भाग ग्रहण करून ज्यांचे त्यास पावते करण्याचे दूत कर्म आहे. ... या दूतत्वानें त्याग सुवर्णकार, ताम्रकार, लोहकार आदिकरून नीचाच्या ताडणा सह सर्व भक्षता नाश जाहली, येवढेंच नाहीं. देवतेचे हवी - देवतेस पावते केल्यावर अवशेष फायदा, किंवा संग्रह काय. रक्षा. रक्षेवांचून अन्य - संग्रह नाहीं. तर तेथें संग्रहांत आशीर्वाद कोठून असणार आहे ?

यास प्रत्यंतर प्रमाण जगांत असें आहे कीं, ज्याच्या येथें जी वस्तु असते, ती प्रसिध्द होण्या करितां व्यवहाररित्या जाहिराति किंवा मोठ्या अक्षरांची पाटी प्रसिध्द करितात. त्या प्रमाणें यजुर्वेदांत आशीर्वाद मंत्र आहेत, म्हणून कात्यायनानीं कर्मांतीं आशीर्वाद घेण्याचा प्रादुर्भाव लेख लिहिला आहे. तसा अश्वलायनाचा कोठेंही लेख पाहण्यांत येत नाहीं. त्यानीं कर्मादौ आणि कर्मांतीं स्वस्तिवाचन करावें. असें कारिकेंत-

लिहिलें आहे. यांतील व्यग काय ! सर आशीर्वाद मंत्र संग्रह नाहीं.

आशीर्वाद मंत्र म्हणजे काय ? अशी विद्वानास शंका, शङ्का नये, म्हणून महिधरादि भाष्यकार लिहितात कीं, मंत्रांची देवता आशीर्वाद व मंत्रार्थ आशीर्वादपर असेल त्या मंत्रास आशीर्वाद मंत्र समजावा असें साधन नसून पाहिजे तो मंत्र म्हणून आशीर्वाद देणें हें मनःपूत कर्म होऊन फलदायक होत नाहीं.

हा विचार सोडून सूक्ष्म आणि बाह्य प्रसिध्द विचारानेंही दिसून येते, त्याचें उदाहरण.

जनक राजाच्या गृही शुक्ल यजुर्वेदाचार्य योगेश्वर याज्ञवल्क्याच्या आशीर्वादमंत्रांतक्षतेनें मचकाच्या शुष्क काष्ठास पल्लव निर्माण जाहल्याची कीर्ति महाभारतादि ग्रंथांतून व्यासा सारखे वर्णन करितात येवढें नाहीं ! जनक वंशादि सोम सूर्य वंश उध्दरल्या विषयीं भागवतांत वर्णित आहे.

**( भा० स्कं० ९ अ० १३ श्लो० २०।२७ )**

**कृतध्वजात्केशिध्वजः खांडिक्यस्तमित ध्वजात् ॥ कृतध्वज सुतोराजन् आत्मविद्या विशारदः ॥२०॥ एतेवैमैथिला राजन् आत्मविद्या विशारदाः ॥ योगेश्वर प्रसादेन द्वंद्वैर्मुक्तोभवत्विती ॥२७॥**

टि० गद्यस्था त्सुभाषणः योगेश्वरा द्याज्ञवल्क्या दयस्तेषां प्रसादेन वंशोपि मुक्तो भवती ॥ या वाक्यांत जनक वंश मुक्त केला आहे.

**(भा० स्कं० ९ अ० १२ श्लो० १।४ )**

कुशस्यचातिथिस्तस्मान्निषध-
स्तत्सुतोनभः ॥ पुंडरीकोथत
त्पुत्रः क्षेम धन्वा भवत्ततः ॥१॥

टि० कुशस्य श्रीरामचंद्रस्य पुत्रस्या तिथिः सुतो भवत् क्रमेण तत्सुतस्तत्सुतः ।, इत्यग्रेसं-
बंधः ॥१॥

खगण स्तत्सुत स्तस्मा द्विधृति
श्चा भवत्सुतः ॥ ततो हिरण्य
नाभो भूत् योगाचा र्यस्त जैमि
नेः ॥२॥

टि० हिरंण्यनाभः कथंभूतः जैमिनेः शिष्यो योगाचार्यः ॥२॥

शिष्यः कौशल्य अध्यात्मं या
ज्ञवल्क्योध्य गाद्यतः ॥ योगं
महोदयमृषिर्हृदय ग्रंथिभेद-
नं ॥४॥

टि० ॥ तदाहयतः सकाशात्कौशल्यो याज्ञवल्क्य ऋषि राध्यात्मं योग मध्या गात
तंविशिनष्टि । महांत उदयाः सिध्दयो यस्मिन् तं हृदय ग्रंथि भेदकंच ॥४॥
या वाक्यांत सूर्यवंश मुक्त केला आहे.

(भा० स्कं० ९ अ० १२ श्लो० २६।२८)

---------

जन्मेजयस्त्वां विदित्वा तक्षकात्रि-
धनंगतं ॥ सर्पान्वै सत्र यागेऽग्नौ स-
होष्यति रुषान्वितः ॥ ३६ ॥

टी० ॥ सुगमं ॥

कावषेयं पुरोधाय तुरं तुरगमेधराट् ॥
समंतात्पृथिवीं सर्वां जित्वा वक्षति चा-
ध्वरैः ॥ ३७ ॥

टी० तुरसंज्ञं पुरोहितं कृत्वा ॥ )

तस्य पुत्र शतानीको याज्ञवल्क्यात्र-
यीं पठन् ॥ अस्त्रज्ञानं क्रियाज्ञानं
शौनकात्परमेष्यति ॥ ३८ ॥

टी० भविष्यानाह ॥ तस्य पुत्र इति यावत्समाप्तिः ॥ याज्ञवल्क्यात क्रियाज्ञानं परंच मोक्षस्य-साधनं आध्यात्मज्ञानं शौनकात्प्राप्स्यति ॥ अस्त्रज्ञानंच कृपाचार्यादिति द्रष्टव्यं ॥ याज्ञवल्क्यात्त्रयी मधीत्य कृपा दस्त्राण्य वाप्ये ति वैष्णवोक्तेः क्वचित् अस्त्रज्ञानं च कृपाचार्यादित्येव पाठः ॥ ३८ ॥

पहा या ब्रम्हांडांत, आणि भारत भागवत रामायणादि व्यास वाल्मीक ग्रंथात, व सोम सूर्य वंशात याज्ञवल्क्याचे कीर्तिध्वज प्रदिप्त आहेत ते ! याचें योग्य कारण पाहतां वेदानीच कथन केलें आहे कीं,

## महिधर भाष्य

देवेषु क्षत्रजात्याभिमानींद्रा॥ दयो-
देवाः ॥ तदुक्तं ॥ बृहदारण्यके

## ॥ यान्येतानिदेवत्राणींद्रोवरुणःसो-
## मोरुद्र इतिश्रुतेः ॥

तात्पर्य क्षत्रीय ज्ञातीच्या अभिमानी ज्या इंद्रदेवता आहेत त्या शुक्ल यजुर्वेदाधिष्ठित असल्या मुळें क्षत्रियास शुक्ल युजर्वेदा पुरोहितत्वानें कोणत्याहि कर्मांत साफल्य आणि मोक्ष असल्या विषयीं श्रुत्यार्थ प्राय आहे. अस्तु असें अश्वलायनादि आचार्यांच्या आशीर्वाद मंत्राक्षतेनें आर्द्र वृक्षाला पल्लव निर्माण जाहल्याची कीर्ती महिम्ना सारख्या लहानशा ग्रंथांतून गंधर्वानें सुध्दा वर्णन केलेली श्रवणांत येत नाहीं.

तस्मात् आशीर्वाद देवता नाहीं हेंच खरें आहे. कदाचित् देवता असली, किंवा आहे असें समजून विचार केला तरी, त्यांच्या मुख्य देवतेच्या कर्माधिकाराच्या योग्यतेनें त्या आशीर्वादाचा किती उपयोग होणार हें उघड दिसत आहे.

असले कर्म किंवा अधिकार यजुर्वेदाच्या इंद्र देवतेचा नाहीं. इंद्राचा अधिकार मनांत आणाल तर प्राकृत जन सुध्दां मेघ राजा म्हणतात. आणि श्रुत्या तर या राज अधिकारास हे नाना प्रकारचें गीत गातात पहा.

## इंद्रो राजा जगतश्च ईशरिति तै-
## तिरीय श्रुतिः इंद्रोवै विष्णु रिति
## शतपथ श्रुतिः विष्णुर्वै यज्ञंय-
## ज्ञ पतिमिति तांडी ब्राह्मण श्रु-
## तिः

तैतिरीय श्रुतितर संपूर्ण जगताचा राजा इंद्र आहे, असें कथन करिती. तशीच शतपथ श्रुति इंद्रास प्रत्यक्ष परमेश्वर विष्णूच सिध्द करती. व अन्य ब्रांम्हण श्रुति त्या इंद्रास यज्ञ व यज्ञपती, कर्मपती असें सिध्द करती. या वरून हा इंद्र प्रत्यक्ष जगाचा राजा, व यज्ञ आणि यज्ञाचा, व कर्मांचा अधिपती असल्यामुळेंच अखिल वेदांची कर्म सूक्तें, व कर्ममंत्र व स्तोम साम आदिकरून सर्वच इंद्राचा स्तव करितात. हें वा-

चकांस दृढय होण्या करितां अन्यांचें नको अश्वलायनाचेंच रथंतर साम मंत्र सभाष्य-दाखवितो.

वा॰सं॰ अ॰ २७ मं॰ ३५।३६

हे ऋग्वेदाचे रथंतर साम असून इंद्र-स्तोम म्हणतात.

अभित्वा शूरनो नुमो दुग्धाइव धेनवः ॥ ईशानमस्य जगतः स्वर्द्दृशमीशान मिन्द्रतस्थुषः ॥३५॥

तथाच उवट भाष्ये

अभित्वारथंतरं दक्षिणपक्ष इति श्रुतिः। नान्याध्वर्यो गायेदितिपत् यतो एषां साम्नांयोनयः पठ्यते। तत्रैंद्र प्रगाथो रथंतरस्य योनिः। तत्र प्रथमा-बृहती द्वितीया सतो बृहती। अभित्वाशूर नोनुमः। अभि

॥ त्वामिद्धि हवामहे ॥ नमाम कथा मव अदु-
ग्धा धेनवः। वत्सा अभिनमंति। एवं त्वां
प्रति हविर्भिः स्तोत्रैः शस्त्रै-
श्चाभिमुख्येन नमाम। यद्वा
णु तौ। अयमत्र धातुः श-
ब्दसारूप्यात। अभिनोनुमः।
अभिष्टमस्तीकृत कृत्याः संतः
कृत स्तोत्राः कृत शस्त्र मंत्र ह-
विष्का। कृत कृत्याः अदुग्धाधे-
नवो वत्सान भिविष्टुयुरेवं। क-
थं भूतत्वां। अभिनोनुमः।
इशानस्य जगतः जंगमस्य
स्वर्दृशंस्वः पश्यतीति स्वर्दृक्
। तं स्वर्दृशं। यद्वा स्वरादित्यः
तद्वत्त्वोदृश्यते। सस्वर्दृक्।
तंस्वर्दृशं। ईशानंच। हेइंद्र

## तस्थुषः स्थितनतः स्थावरस्य· ईशानं । विश्वनियंतारं इत्यर्थः

॥३५॥

तात्पर्य या स्तोमाचे मंत्र वरेच आहेत. त्या पैकीं इंद्र स्तव दृश्य करण्या पुरता एक मंत्र येथें घेतला आहे.

यात इंद्र देवतेचें ऋग्वेद सामानें किती महत्वाचें आणि नमृतेचें वर्णन केलें आहे पहा! संपूर्ण स्थावर जंगमाचा, ईश व स्वर्गादि त्रैलोक्याचा ज्ञाता यज्ञपती, असें इंद्राचे वर्णन करून, अखिल वेदाचें स्तोम साम शास्त्रादिक नमस्कार पूर्वक प्रार्थना करितात. त्यांत हा इंद्र राजा शूर पराक्रमी आहे, असा अश्वलायनाच्या रथंतर साम ऋतिचा अभिप्राय आहे. अर्थात अशा महत्वाच्या देवतेच्या तेजाचा वीर्यवान असा आशीर्वाद फलदायक होणारा असून या राज संग्रहांत अथवा यज्ञाधिपति किंवा कर्मी ऋतीच्या कर्म संग्रहांत आशीर्वादही अभावयाचा यांत संशय नाही. आणि याच देवतेंच्या शुक्ल यजुर्वेदांत आशिर्वाद असल्या विषयीं कितीक ऋति प्रमाणें ही आहेत. पैकीं ऋग्वेदाचींच प्रमाणें घेतों.

## ऋ॰ स॰ मं॰ शूचीवोहव्या मरुत॰ यांतील प्रतीक आशीर्वान्ममतु इंद्र शुधो इतिश्रुतेः

शाकलाचें म्हणणे हा शुक्ल इंद्रच मला आशीर्वाद दाता आहे तसेंच जातुकर्णीनें नैरुक्त ऋतिंत तर सिध्दांतच केला आहे कीं, इंद्र वीर्या वांचून अन्यत्र वेदांत आशीर्वादच नाहीं.

## ( नै॰ उ॰ अ॰ १ खं॰ ३ ऋतिः )

## इंद्रस्यानुवीर्याणि प्रवोचमिति यथैतास्मिन् सूक्ते थाप्याशीरेव·

नस्तुति रिति श्रुतेः

पहा इंद्र वीर्य म्हणजे इंद्र देवतेंच्यासतेजतेजाचा असा जो शुक्ल यजूर्वेद आहे, किंवा शुक्ल यजुर्वेद भागच इंद्राचा असल्या मुळें शुक्ल वेदाची चक्षुषी अधिष्टित इंद्र देवता आहे. आणि या वेदांतील मंत्र सूक्तें ही प्रत्यक्ष कृत असून, तो कर्म वेद असल्यामुळें या शुक्ल वेदांत कर्मांतीचे आशीर्वाद मंत्र आहेत, असा श्रुत्यभिप्राय आहे. तुसता श्रुतिचा अभिप्रायच आहे. किंवा शुक्ल वेदांत आशीर्वाद मंत्र आहेत हीं शंका परिमार्जित केली पाहिजे.

( वा॰सं॰अ॰४मं॰ ५

आवोदेवा॰ यांचें महिधरभाष्य )

आवोदेवास इति वाचयतीति।
अध्वर्युयजमानं वाचयति। आ-
वो देवासः। दैवीत्र्यनुष्टुप् आ-
शीः। हे देवा सोदेवाः वयंवोयु-
ष्मान् वामं वननीयं भजनीयं
यज्ञ फलं आईमहे। साकल्ये-
न याचामहे। वन्यते भज्यते-
इति वामा वत्सं भक्तो मप्रत्य-
यः। इमहे याचति कर्म सुपठि-
तः। द्विकर्मकः। इकसाति। अ-

ध्वरे ऽस्मदीये यज्ञे प्रयति प्रवर्तमा-
ने सति । प्रयतीति प्रयन् तस्मिन् ।
प्रपूर्वा दिणः शतरिरूपं । किंच ।
हे देवासोदेवा वो युष्मान् वयं हवा-
महे । आव्हयामः । किंकर्तुं । य-
ज्ञियासः । यज्ञस्ये मायज्ञियास्ता-
यज्ञ संबंधी नीराशिषः फलानि
आ आने तुमित्यर्थः । उपसर्गेण-
धातुरध्याहर्तव्यः । यज्ञफलं प्रा
सं युष्माना व्हयाम इत्यर्थः ॥
५ ॥

यां॰ सं॰ अ॰ ८ सं॰ ५

(विवस्वन् याच्या पुढील अर्धलीचें भाष्य)

अदस्मै नर इत्येन मवेक्षते पत्नीति
॥ पत्न्येनं पूतभूतं पश्येत् ॥ अ-
दस्मै ॥ आशीर्देवत्या जगती ।

नरदेवत्वावा। द्वादशाक्षर चतुः
पादा जगती। पत्नी वदति। हे नरो
नेतारः ऋत्विग्यजमानाः आ-
शीर्दा। आशिषो ददतिते आशीर्दाः
। सुप्लोपश्छांदसः। आशिषां
दातारो यूयं अस्मै वचसे आशी
र्वचनाय श्रद्धातन॥ श्रदिति
सत्यनामसुपठितं। तप्तनप्त
नथनाश्चेति मध्यम बहुवचन-
स्य तनादेशः। श्रद्धां कुरुत॥
आस्तिक्य बुद्धिं कुरुते त्यर्थः।
मदुक्तमाशीर्वचनं भवद्भिः श्र-
द्धयाधारितं तथैवस्यादितिभा-
वः। किंतदाशीर्वचनमत आह
। यत् दंपती जायापती पत्नीय-
जमानौ वामं वननीयं संभज-

नीयं यज्ञफलं अश्नुतः प्राप्नुतः। किं-
च। इहैव पुमान् पुंस्त्वधर्मसंपन्नः
पुत्रो जायते। किंच सच पुत्रो वसु-
धनं विंदते लभते। अथ अथेत्य-
र्थे। निपातस्य चेति संहिता यांदी-
र्घः। अथा नंतरं विश्वाहा। विश्वा-
निचतान्यहानिच विश्वा हा। काला-
ध्वनोर त्यंत संयोग इति द्वितीया।
राजाहः सखिभ्यष्ट जिति प्राप्तस्य
टच प्रत्ययस्य वैकल्पे कत्वात्-
छांदसोवाऽभावः। अनंतरं धने-
लब्धे सति विश्वा हा सर्वदा अर-
पः पाप रहितः सन् गृहे स्वसदने-
एधते वर्धते। नारत्विर पोयस्या-
सात्वरपः। रपोरि प्रमिति पाप ना-
मनी भवत इति यास्कः। आ-

इतीद्दीं आशिषां दातारौ इति दंप- ति विशेषणं वा । विभक्तेराकारः दंपति यज्ञफलं प्राप्नुतां । तयोः पुत्रो जायतां स च धनं लब्ध्वानिः पापः स्वगृहे वर्द्धतामिति आशीर्व- चनें श्रध्दां कुरुतेति सर्वार्थः ॥ ५ ॥

या प्रमाणेच ( त्र्यायुषं जमदग्नेः ) आदि करून आशीर्वाद देवतेचे वाजसनीय संहितेत कित्येक मंत्र आहेत. ते मंत्र, अगर तसे आशीर्वाद देवतेचे मंत्र अन्य वेदाच्या संहितेंत नाहींत, असे मी खात्रीनें लिहितों. याजवर ही विश्वास न- सेल त्यांनीं आपापलें सभाष्य संहिता ग्रंथ, व सर्वानुक्रम पाहण्यास निरालस्य व्हावें.

ज्या कारणानें वेदचतुष्टयांतील श्रुति ग्रंथाचा अक्षरशः विचार केल्या शिवाय- इंद्र देवतेच्या शुक्ल यजुर्वेदांतच आशीर्वाद मंत्र आहेत, अशी प्रतिज्ञेचीं नैरुक्त श्रु- तीत अक्षरें लिहिलीं नाहींत. त्या आचार्यानें पूर्ण विचार करून श्रुति स्थापन के- ली आहे. त्या श्रुत्यर्था प्रमाणें या शुक्ल यजुर्वेदांत असेंच प्रत्येक यज्ञ कर्माच्या- समाप्तिस आशीर्वाद मंत्र असून त्या पैकीं, दोन मंत्र येथें घेतले आहेत.

यहा आरंभी मंत्राची देवताच आशीष आहे, व मंत्रही आशीर्वादार्थी असून आशीर्वाद ग्राहक कर्ता लीन व श्रध्दा युक्त, आणि अनन्य भावनेनें धर्मार्थ काम मो- क्षादि चारी पुरुषार्थ साधक पुरुष धर्मी पुण्यवान, सधन, आरोग्य पाप रहित - आणि आयुष्मान असा पुत्र स्वगृहांत वर्धमान होण्याविषयीं आशीर्वाद मागता- न त्या प्रमाणें अध्वर्यू आदि करून ऋत्विजांनीं आशीर्वाद देऊन हेतू पूर्ण केले आहेत.

या साधनाचे आशीर्वाद मंत्र अन्य वेदांच्या संहितेंत आहेत कीं नाहींत, या- विषयीं सर्वांचे संहिता ग्रंथ पाहून मी समाधान पावलो. तथापि ज्याचे त्यांनीं संहि-

तायथव सर्वानुक्रम पाहून, अशा साधनांचे आशीर्वाद मंत्र जगा पुढें आणावे. म्हणजे नैरुक्त श्रुतिस व शाकल मंत्रास मिथ्यत्वाचा दोषारोप करितां येईल तें. . . र्यंत या उभय श्रुतीच्या सत्यास भंग येणार नाहीं. अस्तु.

वरील विवेचनांत ज्या प्रमाणें वेदाची व ब्राम्हणांची पात्रा पात्रता . . . दाखविली, त्या प्रमाणें येथे नैरुक्त श्रुतिनें मंत्राची पात्रापात्र दाखविली आहे व आशीर्वाद मंत्राचा खुलासा केला आहे.

जाहले त्यावरून आशीर्वाद मंत्र शुक्ल यजुर्वेदावांचून अन्यत्र वेदांत नाहींत. तर अर्थात कल्याणा करितां जर आशीर्वादाची इच्छा असेल तर सतेज वीर्यवान् अशा अयातयाम शुक्ल वाजसनीय माध्यंदिन शाखी ब्राम्हणाच्या मुखानें वेदमंत्राचा आशीर्वाद घ्यावा. असें श्रुति स्मृति प्रमाणांनं सिध्द जाहलें आहे.

या ठिकाणीं थोडा विचार केला पाहिजे कीं, वर नैरुक्त श्रुतिनें सामा थर्वास कर्म मुक्त ठरवून कर्महीन केलें. परंतु त्यास न्यूनत्व स्थापिलें नाहीं. तद्वतच येथें पाहिलें पाहिजे कीं, जरी शाकलानें व नैरुक्त श्रुतिनें इंद्रवीर्य शुक्ल यजूवांचून अन्यास आशीर्वाद मंत्र नाहींत. असें सिध्द केलें तरी त्या पासून ऋग्वेदास न्यूनत्व येत नाहीं. कारण एक एक प्रकारचें ज्ञान एक एकास विभागिलें आहे. त्याप्रमाणें एक एक वेदांत एक एक महत्वाचा भाग ठेवूनच वेद चतुष्टयाची योजना केली असावी. या न्यायानें अश्वलायनाचें महत्व कमी आहे असें म्हणतां येत नाहीं. अग्निची पूज्यता व अश्वलायनाची श्रेष्ठता कित्येक ग्रंथ वर्णन करितात.

तथाच मनुः सं० अ० ९ श्लो० ३१७।३१८

विद्वांश्चैव अविद्वांश्च ब्राम्हणो दैवतं महत् ॥ प्रणितश्चा प्रणीतश्च यथाग्निर्दैवतं महत् ॥३१७॥ स्मशाने ष्वपि तेजस्वी पावको नैव दुष्यति ॥ हू-

# यमानश्च यज्ञेषू भूय एवाभि- वर्ध्दते तिस्मृतेः ॥ ३१८ ॥ अस्त-

या शिवाय कर्म काळीं कर्मांती जर आशीर्वाद घेणें जाहला, तर कर्म देवतेच्या कर्मी मंत्रांत कर्मदेवता वास करीत असून ते मंत्र कर्मांतील ब्राम्हणांच्या मुखात असल्यामुळें, ते ब्राम्हणच कर्म देवतास्वरूप असल्या विषयीं वरील विवेचनांत नैरुक्त श्रुति प्रमाणानें सिद्ध जाहलें आहे. तर आर्थांत ज्या देवतच्या तोषार्थ कर्म करावयाचें त्या कर्मांतीं त्या देवतेचा प्रसाद फलरूप आशीर्वाद घेणें युक्त असल्या मुळें, त्या कर्म देवतेच्या मंत्रानें व त्या कर्मीं ब्राम्हणाच्या मुखानें स्वशाखी मंत्राशीर्वाद घेतला पाहिजे. असें श्रुति प्रमाणानें निर्णायक जाहलें असून शिवाय तदर्थी स्मृति ही साक्ष देत आहे.

## ( स्मृत्यंतरे )

# सर्वत्र कर्मणा मंते मंत्राशीष मनुत मां ॥ दद्युर्विप्राः स्व शाखोक्ता मादौ तत्कर्म शा- खिन इति ॥१॥

तात्पर्य ज्या शाखेच्या मंत्रानें कर्म जाहलें असेल, त्याच शाखेच्या ब्राम्हणांच्या मुखानें मंत्राशीर्वाद घेतला पाहिजे. अशी स्मृत्युक्ति आहे.

या उभय मार्गा शिवाय अन्य प्रकारानें किंवा क्रमव्युत्क्रमानें अन्यांचा आशीर्वाद घेण्या विषयीं अद्यापि कोणत्याहि ग्रंथांत श्रुति स्मृति प्रमाण दृष्टीस आलें नाहीं. तथापी प्रणव रूप परमेश्वराचें वाचकास स्मरण देणें युक्त दिसतें. स्वराट प्रणवोत्पत्ती होऊन अक्षरब्रह्म स्थान परत्वें वेद व कर्म देवता विभागल्या त्याच त्या वेदाच्या कर्मांत अधिकार पावल्या विषयीं प्रतिपादन जाहलें आहे.

या प्रमाणें सृष्टीतकर्माची मर्यादा राहण्या करितां अशी धर्म शास्त्र कर्ते स्मृतिकार प्रभृतिकांनीं प्रतिबंध करून ठेविला.

**पारंपर्यागतो ऽयेषांवेदः सपरिबृंहणः ॥ तच्छाखं कर्म कुर्वीत तच्छाखाध्ययनं तथा ॥१॥**

या स्मृतिचा भावार्थ असा की. ज्याच्या वंशपरंपरें पूर्वज जो वेद पठण करीत आले ता त्यानीं पठण करून त्या शाखेंत जेंजें उक्त कर्म निबंध असतील, तेते केले पाहिजेत.

या नियमा प्रमाणें नित्य कर्माचें आचरणच काय परंतु कुलधर्म कुलाचार देखील लोकांत चालू आहेत. त्यात कोणी शक्ति मूर्ति रूपानें ईश्वराधन । व कोणी ज्योति मूर्ति व कोणी बहिरव, सटवाई, म्हसोबा, गणपति, शिव विष्णू मुर्ति रूपानें, परंतु परमेश्वराच्या सगुण धर्माचें आराधन करितात व पूर्वज जेंजें त्या कुल धर्मांत करीत आले, तेंतेंच त्यांचे वंशज करितात हें आपण पहातू आहों व करीत आहो हें काय? तर वरील वेद विहित वेद विभाग कर्म देवतेचें निबंधन आहे.

आणि अशा प्रकारें कर्म होण्या विषयीं परमेश्वराची इच्छा आहे म्हणून कर्म कांड वेद करून ठेविले. व त्याप्रमाणें कर्में चालू केलीं: व असें करण्याचें जगाच्या स्मरणांत राहण्या करितां नित्य कर्मांतील संध्यांती स्मृति पठणा सांगितलें आहे.

**आकाशात् पतितं तोयंयथा गच्छति सागरे ॥ सर्व देव नमस्कारः केशवं प्रति गच्छति ॥**

**॥१॥**

यांतील तात्पर्य काय? कोणताही मार्गें कोणताहि देवतेच्या आराधनेनें, भावनेनें जरी कर्म किंवा नमस्कार केला, तरी तो परमेश्वरार्पण होतो. ही कर्म मार्गाची उपासना आहे. हेंच निर्गुण धर्मांत ईश्वराराधन करणें तर आरंभीं कर्म व कु-

म वेद, व कर्म देवता व ईश्वराच्या सगुण ध्यानादि त्यागकरून **( वा० सं० अ० ४० मंत्र ८ ) ( सपर्यगा )** या मंत्रार्थाप्रमाणें परमेश्वरास हात,पाय, नाक, डोळे तोंड आदि करून अस्थिमांस स्नायू युक्त शरीरचनाही नाहीं तर मूर्ति कोठची असणार ? हें उघड दिसत आहे. हा वेदांत भाग या प्रमाणेंच आश्रम धर्म आहे. म्हणजे कर्माचरणाचें शिखा सूत्र तें त्याग करून परम हंस दीक्षा स्वीकारतेवेळीं वेदकर्मत्याग जाहल्याचा उच्चार असा होतो कीं, प्रणवांतर्गतच्या व्याहृति रूपानें प्रथक प्रथक वेदोत्पत्ती जाहली आहे सबब वेद त्याग दाखविण्यास व्याहृतिचा उच्चार करून पूर्ववर्त प्रणवांतर्गत व्याहृतिची स्थापना केली, अशी भावना करावयाची. आणि पुढें फक्त प्रणव पुरुष राहिला या भावनेनें आखिल कर्म व धर्म प्रणवरूप होऊन त्या आश्रमीच्या शुभाशुभांत प्रणवोच्चारावाचून अन्यवेद व्याहृति किंवा वेद मंत्र साधन नाहीं. असें होत असतें. हे याज्ञिकी ब्राह्मणास विदित आहे.

तात्पर्य कर्मत्याग करून परमेश्वराच्या निर्गुण धर्मांत साधन कायतर शून्य ब्रह्म.

तद्वत कर्म त्याग करून परम हंस धर्मांत परमेश्वराचें साधन काय तर प्रणवोच्चार ॐ याशिवाय अन्य मंत्रादि साधन नाहीं.

या स्थळीं श्रौत कर्मांतील उदाहरण युक्त आहे कीं, अष्टाकपाल, एकादशाकपाल, द्वादशकपाल या अभिधानानें कर्म देवतेस अग्नि आहेत, असें सिध्द जाहलें आहे. त्या प्रमाणें त्यात्या देवतेचें हवन त्याच्या अग्नीवर होतें आणि ज्या देवतेस कर्माग्नि नाहीं, त्या देवतेस **( द्वादश कपालान्निर्वपेत् )** अशी श्रुति आहे. या श्रुतिचा भावार्थ असा कीं, द्वादशकपालें वैश्वानराग्नि तो-( सूर्य आत्मा ) त्याची परमात्मस्थानीं योजना आहे सबब ज्यास कर्म देवता, कर्म मंत्र, कर्माग्नि असें साधन नाहीं, त्यास सर्व साधन परमात्मा आहे. असें समजून त्याची योजना परमेश्वर स्थानीं द्वादश कपालाग्निवर श्रुतिनें केली आहे.

या प्रमाणें आश्वलायनाची योजना आहे. म्हणजे स्वस्तिवाचनांतील कारिकेंत **( यं कृत्वा सर्व वेद यज्ञक्रिया कर्म कर्मारंभा प्रवर्तंते तमहमोंकार मादिं कृत्वा )** यापुढें ( ऋग्यजुः सामाशीर्वेन ) असें आहे याचें तात्पर्य काय ?

# (जैमिनी सूत्रे.)

---------

(२१)

# प्रणवश्चाथ शब्दश्च द्वावेतौ-
# ब्रंम्हणा पुरा ॥ कंठंभित्वा तु-
# निर्यातौ यतौ मांगलिकाउ-
# भौ ॥१॥

पूर्वी ब्रंम्हपरमात्म्याच्या कंठांतून प्रणवरूप ध्वनी उत्पन्न जाहला तो निर्गुण आणि तदनंतर गत शब्द म्हणजे वेद उत्पन्न जाहले. ते सगुण हे उभय आणी मंगलप्रद परमेश्वर धर्मी असल्या विषयीं जयमिनीचें मत आहे. हें मान्य करून आपणास आशीर्वाद मंत्र साधन नाहीं. तर आखिल मंत्रांचे व वेदाचें व वेदांताचें अखेर परम हंस दिक्षेचें साधन जो मंगलप्रद प्रणव ॐ त्याचें प्रथम स्मरण करून कर्मादी मंगल साधन करावें पुढें शब्द म्हणजे वेद त्याह्वेदत्रयीच्या आशीर्वादाच्या मंगलांत आशीर्वाद साधन करावें. या हेतूनें ती कारिका केली आहे. या प्रमाणें, आणि या कारिका आधारें हा मंगलाशीर्वाद साधन करणें असेल तर वेद क्रमानें म्हणजे ( ऋग्यजुः सामाथर्वाख्यान ) या भागवत वाक्याच्या वेद क्रमानें आशीर्वाद घ्यावा परंतु हा क्रम कर्मांतीं नाहीं. कर्मांतीं स्वशाखेच्या मंत्राचा प्रथम आशीर्वाद जाहल्यानंतर क्रमानें आशीर्वाद मंत्र जाहल्यास दोष नाहीं.

( नै० उ० अ० १ खंड १९ )

# हविर्भिरके स्वरितः सचंते सु-
# न्वंत एके सवनेषु सोमान ॥
# शचिर्मदंत उत्तदक्षिणाभिने-
# जिह्मायंत्यो नरकं पताम-

विश्रुतेः ॥

[illegible] त्या देवतेस जो हवी किंवा ज्या शाखेचा जो मंत्र कर्मांत अवश्यपा[illegible] [illegible] अन्योन्य म्हणजे अन्य हवी, किंवा अन्य शाखेचा मंत्र किंवा क[illegible] [illegible] घेतल्यास दुर्गती सांगितली आहे.

(तथाच यमः)

अक्रिया त्रिविधा प्रोक्ता विद्भिः कर्मकारिणा ॥ अक्रिया च परोक्ता च तृतीया चान्यथा क्रियेति स्मृतिः ॥१॥

अस्यार्थः अक्रिया त्रिःप्रकारा । उक्तस्य सर्वथा कारणं । उक्तं त्यक्त्वा यदंन्य करणं विपरीत करणंचेति । इत्यर्थक वचनेन बहुभिर्ग्रंथ कारै रुक्त विपरीत करणे न दुर्गत्यादिदोषश्रवणात् । यदंन्यथा हेतु वादैः कुर्वं गच्छं त्यधो गतिरि-

# तिदोष श्रवणात विपरीत न- कर्तव्य मित्यलं ॥

तात्पर्य अक्रिया तीन प्रकारची करावयाचें तें नकरणें १ नकरावयाचें तें करणें २ हेतुभूत अज्ञानानें अन्यथा करणें ३ या प्रमाणें अक्रिया घडल्यास नर्कवास सांगितला आहे इत्यलं.

जाहलें विवेचना वरून ईश्वराच्या अगाधत्वाचें आश्चर्य हेंच कीं, आपणच जीवांश असून नाना रूपानें नाना प्रकारचें कर्म करितात, आणि त्या कर्मांत त्या जीवास आनंदानें कर्म करण्या करितां सुकर्मांत मोक्षादि फलाशा दाखवून पुनः पुन्हा कर्मास प्रवर्त करितात. तसाच दुष्कर्मानें किंवा अक्रियेनें कर्म केल्यास अधोगतीचा दरारा मागें लाविला आहे, ते वेटेंच नाही. त्या जीवास कर्म भोग भोगण्यांत रोधून सोडलें आहे. हें आश्चर्य कां नह्मणावें? हें आश्चर्यच मानिलें पाहिजे.

अस्तु या कर्मभ्रमांत ब्रम्हादीक मोहित होऊन गेले आहेत. त्या कर्माचा व ईश्वराच्या अगाधत्वाचा मी यत्कश्चित मानवी प्राण्यानें व अल्प ज्ञानानें विचार करून कर्म जालांतून मुक्त होतो असें तर घडतच नाहीं. तथापि आपलें कर्तव्य कर्म करण्यास चुकूं नये. जाणून त्या ईश्वराच्या चरण कमलावर आपलें शिर कमल अर्पण करून या कर्म विषयास येथें पर्यवसान दिलें आहे.

या ग्रंथांत अद्यंतीं मंगलाचरणा शिवाय मीं कांहीं केलें नाहीं. गंगोत्रीचें उदक कावडींत भरून रामेश्वरास समर्पण करितात तदन्याय शुध्द गंगोदक वाहणारा मी कावड्या आहे.

अनादि असलेलीं वेदादि प्रमाण वाक्यें भरून हा ग्रंथ विद्वज्जनांस अर्पण केला. यांतील तथ्या तथ्यांचा विचार करण्याचें काम त्यांचें आहे। मजकडे फल-दोष कांहीं एक नाहीं.

अद्यंतीं मंगला चरणाचा शिष्ट सांप्रदाय असल्यामुळें आखिल वेदांच्या वक्तारेंच्या विद्वज्जनांस अनन्यांत करणें अष्टांग पूर्वक दंडपतनवत् चरणावर देह समर्पण करून प्रार्थना करितो कीं या ग्रंथांत जी परिभाषा जाहली आहे त्यांत अज्ञानानें किंवा अनवधानतेनें जीं अशुध्दें असतील, त्या विषयीं नीर प्रमाणें अशुध्द त्याग पूर्वक शुध्द क्षीर ग्रहणार्थी हंस होण्या विषयीं माझी आशा सह प्रार्थना आहे ती सकळ, सहृदय विद्वज्जन पूर्ण करतील.

# ॥ मंगलाचरण ॥

लक्ष्मी नृसिंह शशिशेखर-
चंद्रकांते शेषासन त्रिभुव-
नैक गुरोर्दयाब्ध ॥ ब्रह्मा-
दिदेव परिवेष्टित दीनबंधो
मद्बुधि लेखित मिदं स-
सफलं विधेही ॥१॥

आसीच्छुक्लयजुः प्रकाशाबल
सन्माध्यंदिनाम्नायको ग्रामे-
श्रीप्रवरा तटोत्कट फलेधांदर-
फळाख्ये पुरा ॥ ज्योतिर्विज्जग
रामभट्टइतियो मूलो पना मा-
ततस्तत्पुत्रः प्रथितः शुभैर्गुणा
भैर्गंगाधरो मूर्तिमान् ॥१॥
तत्सूनुर्भिषगुत्तमः प्रतिनि-
धे श्रीश्रीनिवासप्रभो र्मान्यो-
वाजसनीय संसदि महादे-

वाभिधः संप्रति ॥ सप्तर्षि स्थ...
शाहुराज नगरे श्रीयाज्ञव...
यी सारस्तेनचतुः श्रुतिस्थ अक्षिलक्ष
क्षोः प्रबंधाभि धः ॥ २॥ श्रीरामचं-
द्रार्पणमस्तु ॥ श्रीयोगेश्वरभास्कर -
ल्क्यार्पण मस्तु ॥
इति जयराम भट्टात्मज गंगाधर सूनु
महादेवेन विरचिते चतुर्थी प्रवेश-
त्राशीष व्याख्यायां सुदर्शन अभिधानो
त्राम प्रबंधोयं समाप्तः ॥ शुभंभवतु ॥
दशोर्ध्वमष्टा शतशालि वाहनो शाकेतथा-
वच्छर सर्वधारी ॥ नभस्य कृष्णा दश-
मी रवौच माध्यान्हकाले लिखितं समा-
प्तं ॥ १॥ विद्वानेव विजानाती वि-
द्वज्जन परिश्रमः ॥ नहिवंध्यावि
जानाति प्रसूती रिववेदना ॥ १॥

विविधानंद दायिनी आर्या ॥ कम-
लिनि मलिनि करोषि तः किमिति बकैटक-
हलिन्न नभिज्ञेः ॥ परिणत मकरंद मार्मि
कास्ते जगवि भवंतु चिरायुषो मिलिन्दाः
॥१॥ नितरानी चोस्मितित्वं स्वेदं कूपमा-
कदापिवृथाः ॥ अत्यंतसरस हृदयोय-
तः परेषां गुणग्रहीतासि ॥२॥ अयिम-
लय जमहिमायंकस्या गिरामस्त विषय
स्ते ॥ मुद्गिरतो यद्गरलं फणिनः पुष्णा-
सि परिमलोद्गारैः ॥३॥ नीरक्षीरविवेक
हंसालस्यं त्वनेवतनुषे चेत् ॥ विश्वस्मि
न्न धुनान्यः कुलव्रतं पालयिष्यतिकः ॥
४॥ ॥इत्यार्या आर्य जनार्पणमस्तु॥

॥ शुभं ॥

॥ श्री ॥

# ॥ चक्षुषीदेवतेची व्याख्या ॥

## ( ऋ॰ ब्रा॰ पं॰ २ अ॰ ४ खं॰ ३२ श्रुतिः )

॥ भूरग्निर्ज्योतिरग्निरिति प्रातः सवनस्य च-
॥ क्षुषी १ इंद्रो ज्योतिर्भुवो ज्योतिरिंद्र इति-
॥ माध्यंदिनस्य चक्षुषी २ सूर्यो ज्योतिः-
॥ स्वःसूर्य इति तृतीय सवनस्य चक्षुषी ३

"या खंडांत वेद चतुष्टय ब्राम्हकुळाच्या अखिल कर्माचा आभिनंदनीय सिध्दांत करून ठेविला आहे कीं या श्रुति शास्त्रानेच कोणत्याहि वेदाच्या कोणत्याही शाखेतील ब्राम्हणांचें कोणतेंही कर्म जहालंच पाहिजे, आणि त्या नियमानेच अखिल वेदाच्या ब्राम्हणांचें कर्महि होत आहे.

हा विषय कर्म संबंधीं असल्या मुळें याज्ञिकी विद्वाना वांचून अन्याच्या लवकर लक्षांत येणार नाहीं. असा गूढ आहे तत्रापि समजण्या सारखा लिहून वाचकांपुढें ठेवितों.

यांत प्रथम वेदत्रय देवता ज्या दर्शित केल्या त्या देवते पासून वेद व वेदकर्मारंभ दाखविला आहे.

भूः व्याहृती पृथिवी १ व तिचा ठायीं जो अग्नि वर्तत आहे तो २ या उभय देवतेच्या ज्योतीनें, व चक्षुषी नामें दर्शक तेनें, व प्रातः सवनानें ऋग्वेद देवता कर्म जाणावें.

भुवः व्याहृतीतें अंतरिक्ष १ व त्याचा ठायीं जो मेघ रूप इंद्र वर्तत आहे तो २ या उभय देवतेच्या ज्योतीनें व चक्षुषी नामें दर्शक तेनें व माध्यंदिन सवनानें यजुर्वेद देवता कर्म जाणावें.

स्वः व्याहृतीते अकाश १ व त्याच्या ठायीं जो सूर्य वर्तत आहे तो २ या उभय देवतेच्या ज्योतीनें चक्षुषी नामें दर्शक तेनें व तृतीय सवनानें सामवेद देवता कर्म जाणावें.

या प्रमाणें यांतील स्थूल भावार्थ असलेला वरील व या व्याख्येने आता व्याहृती च्या उच्चारांत सहज आणि तत्काल लक्षांत येणार कीं, त्रय व्याहृती क्रमाने हीं त्रिभुवनें व हीच वेदत्रयी असून त्या त्रयभुवन पीठावर क्रमानें अग्नि १ रुद्र २ सूर्य ३ या त्रय वेदाच्या अधिष्ठित देवता आहेत. व त्या देवतेचे छंद व ज्योती वर गेले त्या विवचनानें उपंह - लक्षांत येणार आहे.

फक्त चक्षुषी १ व सवन २ हीं दोन पदें अनभ्रुत असल्या मुळें प्रथम चक्षुषी. या पदाचा विचार करितो चक्षुषी विशेषणानें वेद देवता दर्शित हें पद आहे म्हणजे वेद चतुःष्टयातील ब्रह्म वृंदाच्या षोडश संस्कारादि आखिल यज्ञ कर्मेव कर्मातील हवन वेदी सन्निध आचार्यानें हवना पूर्वी देवतोच्चार करावा लागतो. त्यास प्रयोगांत देव ताभिध्यान म्हटलें आहे. त्या देवताभिध्यानांत वेद चतुष्टयांच्या व यज्ञांच्या आखिल देवतेंच्या उच्चारा पूर्वी ज्या वेदाची जी चक्षुषी देवता आहे, त्या वेदांतील ब्राम्हणानें त्या देवतेचा प्रथम उच्चार करून नंतर अन्य वेद देवतेंचा व यज्ञ देवतेचा उच्चार करावा. असा या ऋग्वेद ब्राम्हण श्रुतींतील चक्षुषी पदानें शास्त्रार्थ असून तो वेद चतुःष्टयांत गृहीत असल्या मुळें वेद चतुःष्टयांच्याही आचार्यांनीं म्हणजे ऋषीनीं या श्रुति नियमानें प्रत्येक वेदांत कर्म संबंधीं कर्म सूत्रें बांधून त्या सूत्रा प्रमाणें त्या त्या वेदांचीं कर्में आद्य काला पासून जी चालू केली ती आजपर्यंत अविछिन्न चालू आहेत.

ती गृह्यादि कर्म सूत्रें गूढ असल्यामुळें कर्क १ गर्ग २ गदाधर ३ हरिहारादि हे भाष्य कारांनीं गूढत्वे मूढास समजण्या सारखें करून ठेविलें आहे.

त्या कर्म सूत्रांत आणि षोडश संस्कारात उपनयना नंतर ब्राम्हणास मुख्य वेदारंभ संस्कार मानिला आहे, तो या चक्षुषी देवतेस अनुसरून होत आहे.

पहा प्रथम ऋग्वेदाची चक्षुषी अग्निदेवता असल्या मुळें त्या देवतेच्या स्तवाचा ऋग्वेदाद्य मंत्र ( अग्निमीळे असून त्या मंत्रानें प्रथम ऋग्वेदी ब्राम्हणास वेदारंभ होऊन नंतर द्वितीय यजुर्वेद (इषेत्वा) तृतीय सामवेद (अग्न आयाहि) चतुर्थ अथर्वणवेद ( शन्नोदेवी ) या क्रमानें मंत्रारंभ होतो.

यांत मुख्य इतकेंच लक्षांत आणेलें पाहिजे की प्रथम स्ववेद मंत्र पठण झाल्या नंतर वेद क्रमानें वेदाचे मंत्र पठीत होतात. हा संस्कार अज्ञानावस्थेंत होतो. त्या मुळें याज्ञिकी विद्वाना वाचून गृहस्थ भिक्षुकांच्या स्मरणांत जरी हा क्रम नसला तरी त्या वेदारंभ संस्कारांतील मंत्र क्रमानें वयोवृध्द गृहस्थ भिक्षुकांच्या ब्रह्मयज्ञांत मंत्र पठित होतात, त्याचें तर वेद चतुष्टयांतील ब्राम्हणास नित्याभ्यासानें स्मरण असावयाचें हें सांगणें नको. असो. प्रथम ऋग्वेदास ऋग्वेदाद्य मत्रानें

वेदारंभ संस्कार होऊन यजु साम अथर्वण वेद मंत्रानें संस्कार जाहल्या प्रमाणें ऋग्वेदी ब्राम्हणाचा नित्य ब्रंम्ह यज्ञ होत आहे

ऋग्वेदास वेद क्रमात प्रथमत्व असल्या मुळें ऋग्वेदा प्रमाणें वेद मंत्र क्रमाची मोघअन्य यजू आदि करून वेदास नाहीं.

कारण यजुर्वेदाची चक्षुषी इंद्र देवता असल्या मुळें त्या देवतेच्या स्तवांचा यजुर्वेदाद्य मंत्र असून (इषेत्वा) या मंत्रांत (इंद्राय भागं) असे इंद्राचें आधिपत्यत्व दर्शविलें आहे. यास्तव त्या मंत्रानें प्रथम यजुर्वेदी ब्राम्हणास वेदारंभ होऊन नंतर द्वितीय स्थानी ऋग्वेदाद्य (अग्निमीळे) तृतीय सामवेदाद्य (अग्नः आयाहि) चतुर्थ अथर्वण वेदाद्य (शन्नोदेवी) या क्रमानें मंत्रारंभ होतो.

ज्या प्रमाणें या यजुर्वेदी ब्राम्हणास वेदारंभ संस्कार होतो, त्या प्रमाणें व त्या-क्रमानें नित्य त्यांच्या ब्रंम्ह यज्ञांत मंत्र पठित होतात.

म्हणजे प्रथम स्वशाखेचा (इषेत्वा) मंत्र पठण केल्यावर ब्राम्हण ग्रंथाची आद्य कंडिका (व्रतमुपै) म्हणून नंतर ऋग्वेदाचा (अग्निमीळे) मंत्र व त्या पुढें सामवेदाचा (अग्न आयाहि) मंत्र व त्या पुढें अथर्वण वेदाचा (शन्नोदेवी) मंत्र पठित होतो. हें सार आबाल वृध्द यजुर्वेदी गृहस्थ भिक्षुकांस नित्य कर्मानें माहित आहे. तव्दतच-साम वेदाची चक्षुषी आदित्य देवता असल्या मुळें त्या आदित्य देवतेच्या स्तवांचा सामवेदाद्य मंत्र (अग्नः आयाहि) असून त्या मंत्रानें प्रथम सामवेदी ब्राम्हणास वेदारंभ होऊन नंतर द्वितीयस्थानीं ऋग्वेद (अग्निमीळे) व तृतीय स्थानीं यजुर्वेद (इषेत्वा) व चतुर्थ स्थानीं अथर्वणवेद (शन्नोदेवी) या क्रमानें मंत्रारंभ होतो.

आणि ज्या प्रमाणें साम वेदी ब्राम्हणास वेदारंभ संस्कार होतो त्या प्रमाणें व त्या क्रमानें नित्य त्यांच्या ब्रंम्ह यज्ञांत मंत्र पठित होतात.

तव्दतच अथर्वण वेदाची चक्षुषी आपोदेवता असल्या मुळें त्या आपोदेवतेच्या स्तवांचा अथर्वण वेदाद्य मंत्र (शन्नोदेवी) असून त्या मंत्रानें प्रथम अथर्वण वेदी ब्राम्हणास वेदारंभ होऊन नंतर द्वितीयस्थानीं ऋग्वेद (अग्निमीळे) तृतीय स्थानीं यजुर्वेद (इषेत्वा) चतुर्थ स्थानीं सामवेद (अग्न आयाहि) या-क्रमानें मंत्रारंभ होतो.

आणि ज्या प्रमाणें वेद क्रमानें वेदारंभ संस्कार होतो त्या क्रमानें नित्य त्यांच्या ब्रम्हयज्ञांत मंत्रहि पठित होतात.

येवढेंच नाहीं. ज्या क्रमानें ज्या वेदांतील ब्राम्हणाचा वेदारंभ व ब्रम्हयज्ञांत मंत्र पठीत होतात त्या क्रमानेंच त्यांच्या कर्मातील देवताभिध्यान ही होत आहे.

